मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. ना. रा. शेंडे स्मृती व्याख्यान माला

कै.ना.रा. शेंडे स्मृती व्याख्यानमालेकरता त्यांचे निकटवर्ती व शिष्योत्तम, विदर्भाचे ज्येष्ठ नेते श्री. नाशिकराव तिरपुडे यांनी विदर्भ साहित्य संघात झालेल्या श्रद्धांजली सभेत २१ हजार रुपयांची देणगी जाहीर केली असून या सभेतील अन्य सहभागी वक्ते वि.सा. संघाचे सन्माननीय सदस्य डॉ. भाऊ लोखंडे, माजी उपाध्यक्ष डॉ. तु. वि. गेडाम, श्री. ताराचंद्र खांडेकर व डॉ. श्री. गो. काशीकर यांनीही कै. ना. रा. शेंडे स्मृती कार्यार्थ सहकार्याची आश्वासने दिली आहेत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

श्री. भाऊजी दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय वि. सा. संघ, नागपूर

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी
प्रबंध संपादक : केशव जोशी

॥ भाषा, साहित्य, संस्कृती, संवाद व कलाविषयक अभिरुचीचे जोपासन–संवर्धन–संशोधन ॥

वर्ष अठ्ठेचाळीसावे / अंक ४८–५/६ मे–जू - १९९२
मूल्य–१० रु./वार्षिक वर्गणी : ५० रु.
त्रैवार्षिक वर्गणी १२५ रु.

अनुक्रम ■ ■ ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोकशाही स्वातंत्र्याचा हा दुरुपयोग तसेच लोकशाही स्यातंत्र्याचे मोल न कळण्याचा हा परिणाम देखील आहे. किमान ज्या लेखक-संशोधकांना स्वातंत्र्य या कल्पनेचे मोल कळते व त्याच्या बाजूने ते वारंवार उभे ठाकतात त्यामुळे ते अद्याप बरेचसे सुरक्षित तरी उरलेले आहे.

लीळाचरित्राच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनास महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांनी जी स्थगिती ज्या राजकीय मंडळींच्या हस्तक्षेपावरून दिली. त्यामुळे असा प्रश्न पुन: नव्याने पडला आहे.

लीळाचरित्राच्या संबंधाने आक्षेपकांना सर्व रीतसर व्यासपीठे खुली असतांना त्यांचा वापर न करता राजकीय दबावतंत्राच्या मार्गाने लेखक-संशोधकांच्या संपूर्ण आयुष्य वेचून केल्या जाणाऱ्या कार्यावर अतिक्रमण करण्याच्या, त्यांच्या मूलभूत स्वातंत्र्यावरच स्थगिती आणण्याच्या, या वृत्ती-प्रवृत्तींचा लोकशाही स्वातंत्र्यवाद्यांनी, (विशेषत: खुल्या व मुक्त व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांनी) निषेधच केला पाहिजे.

विवेक दुखावला जाण्याने मानवी संस्कृतीची होणारी हानी ही भावना दुखावल्या जाण्याच्या हानीपेक्षा अधिक भीषण स्वरूपाची अशी सांस्कृतिक हानी असते. लीळाचरित्राच्या प्रकाशन स्थगितीचा प्रश्न म्हणूनच केवळ काही मूठभरांच्या अस्मितेचाच तेवढा प्रश्न व समस्या नसून अशा राजकीय हस्तक्षेपातून सोकावणाऱ्या काळाचा तो प्रश्न आहे.

काळ असा सोकावू नये म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. य. दि. फडके व त्यांच्या सर्वच सहकारी सदस्यांनी हा प्रश्न लेखक-संशोधकाच्या मूलभूत स्वातंत्र्याचा प्रश्न असल्याचे मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात जे म्हटले आहे व त्यामुळे ही प्रकाशन स्थगिती मुख्यमंत्र्यांनी त्वरित दूर सारावी असे जे म्हटले आहे त्याबद्दल हे मंडळ निश्चितस अभिनंदनास पात्र आहे.

कोणत्याही समाजाचे साहित्य आणि संस्कृती ही त्या समाजातील लेखकाच्या-संशोधकांच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या रक्षणाचीच दुसरी बाजू असल्याने या बाबी एकमेकांपासून विभक्त होऊन जगूच शकत नाहीत.

याची जाणीव ठेवणाऱ्या या संस्कृती मंडळाने ही प्रकाशन स्थगिती दूर सारण्याची केलेली विनंती ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेने मुख्यमंत्र्यांना केलेली विनंती आहे. साहित्य-संस्कृतीच्या वातावरणात वाढलेले विद्यमान मुख्यमंत्री ती अव्हेरणार नाहीत व लेखक-संशोधकांना आपल्या मूलभूत स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ पुढील कोणतेच पाऊल उचलायला बाध्य करणार नाहीत अशी आशा बाळगायला भरपूर वाव आहे. 'सिंहासन' पारितोषक प्रकरणाची पुनरावृत्ती होणार नाही अशी आशा बाळगू या.

श्रीपाद भालचंद्र जोशी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आल्या लाटा
गेल्या लाटा
पायात अजून
पाण्याचा काटा

सोबतीला वाळू
त्याचे तेल गाळू
थांब सखे थोडी
पुनः दिवे जाळू

तुझे डोळे लाल
माझे असे ताल
वडाच्या झाडाला
आपण पिंपळाची साल

श्रीपाद भालचंद्र जोशी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेगळेपण महेश एलकुंचवारांचे

कमलेश

मराठी नाट्यलेखन व रंगभूमी संबंधातील समकालीन असे एक सर्वश्रेष्ठ नाव नागपूर–विदर्भात वास्तव्य करून असणाऱ्या प्रा. महेश एलकुंचवारांचे आहे. त्यांच्या लेखनाने व नाट्यतंत्रासंबंधातील वेगळेपणामुळे एलकुंचवारांची नाट्यकृती ह्या आज अभ्यासविषय झालेल्या आहेत.

'वाडा चिरेबंदी' आणि 'आत्मकथा' या त्यांच्या अलीकडच्या दोन नाट्यकृतींच्या अवलोकनातून हाती लागलेले काही निष्कर्ष मांडून त्या द्वारे या लेखकाच्या मनापर्यंत, जीवनदृष्टीपर्यंत पोहचण्याचा एक प्रयत्न प्रस्तुत लेखकाने केलेला आहे. त्यावर चर्चा संभवते. वाचकांनी प्रतिक्रिया पाठविल्यास यथायोग्य प्रतिक्रियांना प्रसिद्धी दिली जाईल.

१९७५ ते १९८२ या सात वर्षांच्या दीर्घ मौनानंतर प्रा. महेश एलकुंचवार यांच्या दोन, तरल, काव्यात्म पण प्रगल्भ नाट्यानुभव देणाऱ्या कलाकृती–'वाडा चिरेबंदी' आणि 'आत्मकथा' रंगभूमीवर आल्या. १९८० ते ९० या दशकातील महत्त्वाच्या, सामर्थ्यसंपन्न नाटकांमध्ये या दोन्ही नाट्यकलाकृतींचा सन्मानपूर्वक समावेश केला जातो. 'रक्तपुष्प' आणि 'पार्टी' या दोन 'एलकुंचवारी' नाटकांनंतर महेश एलकुंचवार यांच्या व्यक्तिगत विकासाच्या दृष्टीनेही या दोन नाटकांचा फार मोठा वाटा आहे. ही दोन्ही नाटके केवळ वाङ्मयीन समृद्धतेकडे वळत नाहीत तर रंगतंत्रदृष्ट्या अधिक परिपक्व व निर्दोषतेने वाटचाल करताना दिसतात. देश, काल आणि परिस्थिती यांच्या बदलत्या संदर्भानुसार अनेकविध शक्यता सूचित करणाऱ्या तसेच चिरंतन मूल्य लाभलेल्या या दोन्ही नाटकांना वैश्विकतेचे भान लाभलेले आहे, असे म्हटल्यास ते अतिशयोक्त ठरू नये.

या दोन्ही नाटकांचा मराठी नाट्यरसिक वाचक–प्रेक्षकांप्रमाणेच माझाही वैयक्तिक अनुभव अत्यंत जबरदस्त व मोहून टाकणारा आहे. अशा या दोन प्रभावी, कलापूर्ण नाट्यकलाकृतींच्या अनुभवापूर्वीचे 'आपण' व अनुभवानंतरचे 'आपण' यांत प्रचंड फरक पडतो. या नाटकांच्या अनुभवानंतर पुन्हा आपला आयुष्याशी संबंध येतो तेव्हा आपण या नाटकांच्या प्रभावाच्या जाणिवेतून मुक्त उरत नाही. किंबहुना आपल्याला मुक्त होताच येत नाही. एक अस्वस्थ व अंतर्मुख करणारा, झपाटून टाकणारा हा अनुभव आहे एवढे मात्र निश्चित. मग असे वाटायला लागते की, 'अनुभवाचा सतत ठणकत राहणारा, तडफडत राहणारा हिरवागार लसलसता कोंभ.'[१] वाचक–प्रेक्षकांच्या मनात रुजवून त्यांना अधिकाधिक समृद्ध करणाऱ्या या दोन नाटकांच्या गाभ्यापर्यंत, नाट्यदृष्टीपर्यंत जास्तीत जास्त जवळ जायला हवे; हितगुज करायला हवे.

ही दोन नाटके केवळ नाटककारांची नसून जणु काही ती आपलीच आहेत या भावनेने ही नाटके आपण जगली पाहिजेत, पचवली पाहिजेत. खरं तर हा एक मोठा कष्टप्रद पण अपरिहार्य असा प्रवास आहे. 'वाडा चिरेबंदी' आणि 'आत्मकथा' या दोन नाट्यकलाकृतींच्या बरोबर केलेल्या जाणीवपूर्वक संवादातून जी काही मौलिक निरीक्षणे हातास लागली त्या निरीक्षणांद्वारेच एलकुंचवारांच्या मनापर्यंत, जीवनदृष्टीपर्यंत पोहचण्याचा एक अल्पसा प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे.

'वाडा चिरेबंदी' बरोबरच 'आत्मकथेचा'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारही एक प्रगल्भ नाट्यानुभव देणारा वाटतो तो या अर्थाने की नाटक एकाचवेळी चार पातळ्यांवरून, गतजीवनात घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ शोधत हाती गवसलेला अर्क सोबत घेत नेमकेपणाने व एकसंघ रूपात रंगभूमीवर अवतरते व वाचकांचा कब्जा घेते. अगदी वरवर पाहिले तरी प्रकर्षाने जाणवणारे चार स्तर म्हणजे— (१) मानवी नातेसंबंधीचा शोध, संबंधातील संदिग्धता, धूसरपणा व गुंतागुंत तसेच संबंधातील कोवळेपण व ताण (२) सत्य व सत्याचे विविध चेहरे व त्याचे विनसावलीचे अस्तित्व (३) कलाविषयक प्रेरणा व कला निर्मितीसंबंधीचे प्रश्न तसेच कलानिर्मिती व कलावंत संबंधात 'क्षणात होणारे दिव्य भास' यथार्थपणे मूर्त स्वरुपात अवतरताना कलावंताला येणारे अपयश, वैफल्य व खुजेपण (४) 'आत्मचरित्र' एक वाङमय-प्रकार व त्यातील फसवेपण. नाट्यसमीक्षेच्या नियमांच्या कर्मकांडात 'आत्मकथे'ला जरी बसवले तरी वाङमयीन गुणवत्तेच्या संदर्भात ते वाचनीय तर वाटतेच पण संगीताच्या कुठल्याही तुकड्याचा वापर न करता, 'राजाध्यक्ष, प्रज्ञा वासंती आणि उत्तरा' या चौघांची एक सलग नाट्यात्म 'गोष्ट' अतिशय सच्चा अनुभव देते. १९८८ मधील सर्वोत्कृष्ट नाटक म्हणून 'आत्मकथे'स पारितोषिक मिळाले आहेच. 'वाडा चिरेबंदी'च्या पुढचा पूर्णतेच्या प्रवासातील लक्षणीय टप्पा म्हणजे 'आत्मकथा'च.

'वासनाकांड', 'पार्टी' प्रमाणेच 'आत्मकथा', 'प्रतिबिंब' ही दोन्ही नाटके एका अंकातीलच आहेत. एकांकिका—नाटक यातील सीमारेषा या दोन्ही नाटकात एलकुंचवारांनी जाणीवपूर्वक पुसल्या आहेत. अपवाद फक्त 'वाडा चिरेबंदी' या नाटकाचा. अर्थात दोन अंकाची रचना ही त्या नाटकाचीच अपरिहार्य अशी मागणी होती. पण हिंदीत दुबे 'वाडा चिरेबंदी' हे नाटक एका अंकातच करतात, ते देखील प्रभावीपणे; परिणामकारक. एलकुंचवारांना कथा सांगण्यात इंटरेस्ट नसतो. त्यांना अनुभव द्यायचा असतो आणि तो अनुभव अगदी गोळीबंदपणे धाडकन एकाच फटक्यामध्ये देण्याचा ते प्रयत्न करतात. एका अंकाचे नाटक लिहिण्याचे कारण हेच.[२]

'आत्मकथा', 'वाडा चिरेबंदी' आणि 'प्रतिबिंब' या १९८२ नंतर रंगभूमीवर अवतरलेल्या तिन्ही नाटकांचा तोंडवळाच नव्हे तर विषय, घाट आणि आशय याही स्तरांवर परस्पर भिन्नताच आहे. प्रत्येक नाटकाची शैलीही त्यातल्या अनुभवानुसार बदललेली आहे. 'रुद्रवर्षा' या नाटकाबरोबर सुरू झालेल्या एलकुंचवारांच्या नाट्यप्रवासात 'एलकुंचवार' या कलावंताचे त्या नाट्यप्रवाहातील अनुभवाइतकेच मनही विस्तारताना दिसते, अगदी थेट 'आत्मकथे'पर्यंत.

'वाडा चिरेबंदी' आणि 'आत्मकथा' या दोन्ही नाटकात नुसत्या घटना नाहीत किंवा नुसते अनुभवही नाहीत तर 'सगळा अनुभव सोलून काढून अनुभवाचा हिरवागार लसलसता कोंभ' एलकुंचवार वाचक-प्रेक्षकांच्या तळहातावर ठेवतात. या अनुभवामागे खोल आणि अथांग करुणेने भरलेले, जीवनाच्या सगळ्या अंगांना क्षमा करून त्याला हृदयाशी कवटाळणारे एलकुंचवारांचे मन या दोन्ही निर्मितीतून प्रकर्षाने जाणवते. खानोलकर, तेंडूलकर, आळेकर या त्रयीपेक्षा एलकुंचवारांचे जे वेगळेपण जाणवते ते इथेच.

नाटककाराकडे नुसती प्रतिभा असून चालत नाही तर नाटकाचे स्थापत्यशास्त्रही तितक्याच प्रगल्भतेने त्याला विचारात घ्यावे लागते. एलकुंचवारांची सुरवातीची नाटके ही केवळ वाङमयीनतेकडे झुकलेली असायची पण 'वाडा चिरेबंदी'पासून ती अधिक तंत्रदृष्ट्या परिपक्वतेने वावरू लागली आहेत.

विवाहपूर्व, विवाहबाह्य, विवाहान्तर्गत संबंधातील कोवळेपण, शारीरिक-मानसिक गुंतागुंत, त्यांचे स्वभावविशेष, ओढ आणि कुतरओढ; मानवी स्वभावाचे विविध पदर नातेसंबंधातला ताण याकडे एलकुंचवारांची प्रतिभा विशेषत्वाने आकर्षित होताना दिसते. नाट्यप्रवाहाच्या अगदी सुरवातीपासून मानवी नातेसंबंधाचा शोध; 'कलानिर्मिती-कलावंत' यांच्यातील संबंध, त्यातील व्यामिश्रता, अतर्क्यता, हा महेश एलकुंचवार यांच्या अक्षय कुतूहलाचा, चिंतनाचा व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आविष्काराचा प्रांत. एकमेकांना ओरबाडणारी तरीही एकमेकांत गुंतलेली, एका बाजूने चांगली स्वार्थी तरीही एकमेकांसाठी आत्मदान करणाऱ्या व्यक्ती, 'वाडा चिरेबंदी' आणि 'आत्मकथा'– या दोन नाटकात अधिक प्रगल्भतेने, व्यक्तीच्या मनातील गूढ गुंतागुंत व तरल भावस्पंदनेसह आविष्कृत होताना दिसतात.

एलकुंचवारांच्या नाट्यतंत्राचा आणखी एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे त्यांचा आपल्या पात्रांकडे पाहण्याचा एक वैशिष्टचपूर्ण दृष्टिकोण आहे. एकूणच व्यक्तिरेखा चित्रणाची एलकुंचवारांची स्वतःची खास वेगळी पद्धत आहे. वास्तवाशी फारकत न घेता व्यक्तिरेखेचा शारीर–मानसिक पातळीवर, प्रतिकात्मक, आदिम आणि मनोविश्लेषणात्मक स्तरावर सहज स्वाभाविकतेने होत जाणारा विकास (स्वतःचे व्यक्तिमत्त्व व्यक्तिरेखेत मिसळू न देता) एलकुंचवार काळजीपूर्वक घडवताना दिसतात.

'वाडा चिरेबंदी' आणि 'आत्मकथा' या एलकुंचवारांच्या दोन नाट्यकृतींमध्ये त्यांच्या कलेचे पक्व, परिणत रूप दिसत असल्यामुळेच या दोन नाटकातील व्यक्तिरेखा ('आई', प्रभा आणि वासंती); व्यक्ती–व्यक्ती मधील संबंध (प्रज्ञा–राजाध्यक्ष संबंध), कलानिर्मिती–कलावंत अनुबंध ('धुक्याने भरलेली वाट' या कादंबरीतील पात्रे व लेखक राजाध्यक्ष यांच्या संवादाचा एक तुकडा) याद्वारे 'आजचा नाटककार, एलकुंचवार' या संबंधी काही निरीक्षणे हातास लागतात, ती खालीलप्रमाणे—

कलानिर्मिती आणि कलावंत अनुबंध

आयुष्याच्या संध्याकाळी यश, मानसन्मान, परदेशदौरे, पद्मभूषण ('ज्ञानपीठ तेवढं राह्यलय') यांनी काठोकाठ भरलेला 'एक अखिल भारतीय कीर्तीचा' लेखक, अनंतराव राजाध्यक्ष विलक्षण तुटलेपण आणि एकाकीपणातील वेदना अनुभवत आहेत, 'विच्छेद' हा मानवाचा मूलभूत अनुभव आहे याची त्यांना जाणीव होते. एक दिवस या जीवघेण्या एकाकीपणातूनच स्वतःचे मन जाणीवपूर्वक विलग करत ते स्वतःच्याच खांद्यावरून, देहाबाहेर जाऊन 'आत्मशोध' घ्यायला लागतात तेव्हा झालेल्या 'आत्मदर्शनाने' अंतर्बाह्य वैफल्यग्रस्त होतात. त्यांना अगदी अस्थिर, अगतिक आणि अधांतरी वाटायला लागते. एक अस्सल कलावंत म्हणूनच नव्हे तर एक अस्सल माणूस म्हणून जगताना आलेले अपयश त्यांना आपले खुजेपण जाणवून देते. स्वतःचीच कलानिर्मिती खूप जुनी वाटायला लागते. 'काळाच्या प्रवाहात आपले साहित्यच नव्हे तर आपले अस्तित्व–देखील पुसले जाईल की काय? असा संदेह त्यांना विलक्षण अस्वस्थ करतो. म्हणूनच राजाध्यक्ष प्रज्ञाला म्हणतात, 'आमचं साहित्य आमच्या पिढीबरोबरच संपणार प्रज्ञा. मला माहित आहे, तुझ्या पिढीला–म्हणजे त्यातलं कोणी वाचत असेलच माझं साहित्य तर–खूप जुनं, डेरेट वाटतं माझं लेखन म्हणून. माझं मलाच तसं वाटतं बघ. आज तू रिसर्च करायचा म्हणून वाचतेस माझं. आणखी दहापाच अभ्यासक असतील. पण वीस वर्षानंतर कुणास ठाऊक आमची आठवण तरी कोणाला येईल की नाही.' याच थकलेल्या, विषण्ण मनोवस्थेत असतानाच एके रात्री त्याचीच निर्मिती (धुक्याने भरलेली वाट); त्यातील पात्रे लेखकाला (राजाध्यक्षांना) येऊन भिडतात, त्याच्याशी मोठ्या जिव्हाळ्याने हितगूज करतात. त्याला त्याच्या सामर्थ्य–मर्यादांची करून देत, त्याला समृद्ध करत, लेखकातच विलीन होऊन जातात. हाच खरा राजाध्यक्षांच्या आयुष्यातला आत्मज्ञानाचा क्षण. अखेरीस नात्यातील अनित्यता उमजलेले राजाध्यक्ष आपलीच निर्मिती स्वतःमध्ये सामावून घेत, निर्मितीबरोबरच आनंदानं निर्मितीनाशही करत जवळच्या गद्द काळोखात विरून जातात. हा नाट्यानुभवाचा गाभ्याचा भाग होय.

काव्यकल्पना, रम्यता आणि कठोर वास्तवता यांच्या सीमारेषेवरचा एक अत्यंत मोहक प्रसंग– कलावंत आणि त्याची निर्मिती यांच्या संबंधावरचा –कादंबरीतील पात्रे (उर्मिला आणि वसुधा) आणि लेखक (राजाध्यक्ष) यांच्या संवादाचा एक तुकडा- हे या नाटकाचे अपूप लावण्य आहे. खाजगी जीवनात ज्या संबंधाचे स्वरूप कळत नाही ते समजून घेण्याचा 'राजाध्यक्षांनी, आपल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'धुक्याने भरलेली वाट ' या जीवनावरून घेतलेल्या कादंबरीत प्रयत्न केला. पण आयुष्याच्या अखेरीस त्यांच्या लक्षात येते की, ' हिमनगाचा जेवढा भाग आपल्याला दिसतो तेवढाही मानवी संबंधाचा आपल्याला दिसला नाही.' खरं तर सर्व वैयक्तिक भावनांच्या वर जाऊन अगदी त्रयस्थपणे त्यांनी आपले संबंध शोधायचा प्रयत्न केलेला असतो, पण तो प्रयत्न असफल, केविलवाणा ठरतो. याचमुळे व्यक्तिव्यक्तीमधल्या संबंधाबद्दलचे आपले आकलन कमी पडल्याची जाणीव त्यांना अखेरी अखेरीला होते. उत्तरा अन् वासंतीची गोष्ट आपणच आपल्या हातानी विस्कटून खोटी करून टाकली हेही सत्य त्यांना प्रकर्षाने जाणवते.

कलावंत आणि कलाकृतीतील पात्रे यांच्या संवादाच्या निमित्ताने अनेक ' अनुत्तरित प्रश्न ' महेश एलकुंचवारांनी मोठ्या जिव्हाळ्याने उपस्थित केले आहेत. या प्रश्नांना जर उत्तरे असतील तर प्रत्येक कलावंत आपल्या बुद्धिमत्तेनुसार त्याची उत्तरे शोधणार. शेवटी ती बरोबर असतीलच असे नाही. राजाध्यक्षांना आपल्या पात्रांच्या आकलनासंबंधी झालेला साक्षात्कार, त्याची जाणीव स्वतःच्या ' साहित्यावर ' मनापासून प्रेम करणाऱ्या आपल्याकडील किती लेखकांना होते. कथा, कादंबरी, नाटक या प्रांतात ' परफेक्ट कॅरक्टरायझेशन ' असे किती असते ? आपल्याकडे बहुतेक व्यक्तिरेखा या आपल्या जनकाचे (लेखकाचे) व्यक्तिमत्वच घेऊन येतात. इथे नाटककार, आधीच्या अनुभवांची गोळाबेरीज करून कुठलेही आडाखे न बांधता माणसाकडे, व्यक्तिरेखेकडे नितळ व निर्दोष रूपात बघण्याची आवश्यकता व अपरिहार्यता निदर्शनास आणून देतात. म्हणूनच उर्मिला, लेखकाला म्हणते, ' माणसं क्षणाक्षणाला बदलत असतात. आणि तुम्हीही क्षणाक्षणाला बदलत आहात. तर प्रत्येक क्षणी नवीन, निरामय स्वच्छ नाते जोडत रहावं माणसानं. आयुष्यातील गुंतागुंत नि तडफड किती कमी होईल तुमच्या.'

'आत्मकथे'त अनंतराव राजाध्यक्षांच्या व्यक्तिरेखेचा उपयोग एलकुंचवार बराचसा आत्मनिवेदनाकरता करतात (' पार्टी ' नाटकातील ' भारत ' ही व्यक्तिरेखा इथे आठवावी (परंतु राजाध्यक्षांना व्यक्तिरेखा म्हणून स्वतःचे एक वेगळे अस्तित्व आहे. त्यामुळे राजाध्यक्ष आणि एलकुंचवार यात थोडे अंतर आहे. पण काही वेळा ' जीवनदृष्टीत ' असलेले कमालीचे साम्य हे अंतर जवळ जवळ नाहीसे करते. ' कलाकृती–कलावंत ' संवादाच्या निमित्ताने एलकुंचवारांचे विकसित झालेले मन विशाल सहानुभूतीच्या प्रवाहापर्यंत पोहचलेले जाणवते. ' राजाध्यक्ष–उर्मिला–वसुधा ' यांची संवादरचना व त्याचा घाट याचा विचार केल्यावर एलकुंचवारांच्या " माझा आजवरचा नाट्यप्रवास " या भाषणातील एक उतारा या संदर्भात, (आशयाशी असणारे अतूट नाते सूचित करणारा) मला आठवतो. स्वतःच्या नाट्य प्रवासाकडे अत्यंत तटस्थवृत्तीने पाहताना एलकुंचवार म्हणतात की, " मृत्यूनंतर एखाद्या फोटोतून अनोळखी लोकांकडे टकटकीत डोळ्यांनी पाहत बसणं ही कल्पना मला काही फारशी मनोरंजक वाटत नाही. उलट, आपल्यानंतर आपली काहीही, एवढी सुद्धा खूण राहू नये असं मला वाटतं. मृत्यूपूर्वी आपला सर्व पसारा आवरून घ्यावा, आपल्यात सामावून घ्यावा व नाहीसं व्हावं हेच खरं. अखेर हा खेळ माझा, माझ्यापुरता आहे. तो कशासाठी मागे रेंगाळत ठेवायचा. ज्या कालनदीतून आपण आलो, जी आपल्या आत व आपल्या बाहेर आहे व जिच्यात आपलं विसर्जन आहे, तसंच आपली निर्मिती आपल्याला स्वतःमध्ये सामावून घेता आली पाहिजे, निर्मितीबरोबरच आनंदानं निर्मितीनाशही करता आला पाहिजे. काहींना हा फार काळाकुट्ट, ' निहिलिस्ट ' विचार वाटेल; पण तसा तो नाही. आपल्या निर्मितीनं आपल्याकडे येणं, आपल्यात विलीन होणं आणि तसं होताना आपल्याला समृद्ध करणं ह्यापेक्षा दुसरी नैसर्गिक गोष्ट नाही." एकूणच राजाध्यक्षांची कलाकृती परत कलावंताकडे येत, त्याला विशिष्ट जीवनदृष्टी अर्पित त्यातच विसर्जित कशी होते ! याचे रहस्य एलकुंचवारांच्या जीवनदृष्टीत मिळावे.

अनुभवाचे शहाणपण आलेल्या राजाध्यक्षांना एकाकी, थकलेल्या अवस्थेत आपल्या जगण्यातले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फसवेपण उमगले आहे; आणि हेच सत्य मानून आपण आपली 'आत्मकथा' लिहिण्यात आणखी एक फसवेपणा करीत होतो, हेही अखेरीस त्यांना उमजते. क्षणात पुढ्यात साचलेला भूतकाळ शांत व परिपक्व मनाने अनंतराव वेचायला सुरुवात करतात. 'एका श्वासाचे अंतर' फक्त शिल्लक असते. अखेरीस आपली निर्मिती स्वत:मध्ये सामावून घेत स्वागतशील दृष्टीने महाप्रस्थानाच्या वाटेने ते चालायला लागतात. पण या अर्थपूर्ण संघर्षात एक 'निर्मिती' सोबत न्यायची राहूनच जाते. राजाध्यक्ष मात्र या 'निर्मिती'पासून शेवटपर्यंत अनभिज्ञच राहतात. एका उत्कट अवस्थेतून जन्माला आलेल्या त्या 'निर्मिती'चे गोंडस नाव असते 'दिलीप'.

प्रज्ञा-राजाध्यक्ष संबंध

प्रज्ञा, अनंतरावांना बोलते करण्यासाठी, त्यांचे परिपूर्ण दर्शन घडविण्यासाठी रंगभूमीवर अवतरलेली व्यक्तिरेखा. प्रज्ञा – राजाध्यक्ष यांच्या संवाद-प्रतिसंवादातून 'अ'मध्ये राजाध्यक्षांची आत्मकथा हळूहळू साकार होताना दिसते. राजाध्यक्ष या व्यक्तीमधील एका अस्सल माणसाबरोबरच एका अस्सल कलावंताचे दर्शन वाचक-प्रेक्षकांना-घडवून 'प्रज्ञा' ही व्यक्तिरेखा लुप्त होते. या बरोबरच 'प्रज्ञा-राजाध्यक्ष' यांच्यात विकसित होत जाणारा प्रेमसबंध-नातेसंबंध विलक्षण नाट्यपूर्णरीत्या, परस्परसंबंधातील ताण, मानवी मनाची गूढ गुंतागुंत यासह सूक्ष्मपणे (त्यांच्या प्रकृतिविकृतीसह) चित्रित झाला आहे. एलकुंचवार 'प्रज्ञा-राजाध्यक्ष' संबंधाप्रमाणेच 'प्रज्ञा-प्रमोद' संबंधावर, प्रज्ञाच्या व्यक्तिगत जीवनावर पुष्कळच सूचक-बोलका प्रकाश टाकतात. एकंदरीत प्रज्ञाचे कौटुंबिक जीवन. 'प्रज्ञा-प्रमोद' या दोन 'प्र' मधील प्रेमसंबंध आणि प्रज्ञा-राजाध्यक्ष यांचे नाटकभर विकसित होत जाणारे नातेसंबंध अशा तीन महत्त्वाच्या बाबी प्रज्ञाच्या संदर्भात ('अ' मध्ये) राजाध्यक्षांच्या आत्मकथेच्या प्रवाहाबरोबरच जाणवत राहतात.

वयाच्या सहाव्या-सातव्या वर्षी वडील गेलेले वडिलांना जाऊन पंधरा वर्षे झाली तरी त्या दुःखचक्रातून बाहेर न पडणारी आई, प्रज्ञाचे पोरकेपण व बिनसलेले बालपण, स्वत:च स्वत:चे निर्णय घेणारी व त्या निर्णयासाठी वाटेल ते करणारी प्रज्ञा-असे अनेक तपशील प्रज्ञाच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवीत जातात.

'प्रज्ञा-राजाध्यक्ष' यांच्यातील प्रेमसंबंध, त्याचे स्वरूप, त्यातील अतर्क्यता याचे वर्णन ढोबळ नातेवाचक शब्दात करणे केवळ अशक्य आहे. खरं तर या नात्याला कुठलेही 'लेबल' लावणे हे त्या पात्रांवर पर्यायाने नाटकावर अन्याय करण्यासारखे आहे. 'प्रज्ञा – राजाध्यक्ष' सहसंबंधाचे आकलन (या दोन पात्रांच्या कृतीव्यापारातून होणारे) हे प्रत्येकाचे वेगळे होऊ शकेल. केवळ वाचक-प्रेक्षकच नव्हे तर खुद्द ही तीन पात्रे देखील (राजाध्यक्ष, प्रज्ञा, प्रमोद) या संबंधकोनाकडे वेगवेगळ्या दृष्टीने पहात आहेत.

प्रज्ञा < राजाध्यक्ष / प्रमोद

प्रत्येकजण वेगवेगळ्या बिंदूवर उभा आहे, याचमुळे तिघेही या 'संबंधाकडे' निराळ्या चष्म्यातून पाहतात. राजाध्यक्षांपेक्षा प्रज्ञाची नजर वेगळी आहे. प्रमोदला तर वाटते की 'हिला वेडाची लहर आलेली आहे.' याखेरीज 'राजाध्यक्ष-प्रमोद' यांच्यातील सूक्ष्म ताण या संबंधाच्या पार्श्वभूमीवर नाटककाराने खेळवला आहे. अत्यंत व्यामिश्र स्वरूप असलेल्या 'प्रज्ञा-राजाध्यक्ष' संबंधाचे आकलन-प्रतिकात्मक, मनोविश्लेषणात्मक आदिम आणि शारीर-मानसिक पातळीवरून अधिक समृद्धपणे होऊ शकते. या दोन व्यक्तींमधील संबंधांच्या विविध पातळ्या व विविध मिती तसेच त्यामधून व्यक्त होणारा जीवनाच्या मुळाशी असलेला गहिरा अर्थ केवळ व्यक्तिरेखेलाच नव्हे तर नाटकाला कलात्मकतेच्या पातळीवर नेऊन ठेवतो.

प्रज्ञा-राजाध्यक्ष संबंध- प्रतिकात्मक पातळीवर

'एक झाड आणि दोन पक्षी' या आत्मचरित्रात विश्राम बेडेकरांनी मुंडकोपनिषदातील एका मंत्राचा उपयोग केलेला आहे. या मंत्राप्रमाणे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवनाच्या झाडावर दोन पक्षी असतात. एक जीवन जगतो, भोगतो, सोसतो. दुसरा फक्त जाणतो, पाहतो, चिंतन करतो. ते देखील तटस्थपणे, अलिप्ततेने आयुष्याचा, वेदनेचा, यशापयशाचा शोध घेतो. आत्मकथेत हा दुसरा पक्षी म्हणजे ' प्रज्ञा 'च आहे. ' हेच अनंतरावांचे दुसरे रूप आहे. ' प्रज्ञा ' ही नावाप्रमाणेच प्रज्ञा असून राजाध्यक्षांच्या विवेकाची प्रतिमा म्हणजे ' प्रज्ञा ' असेही विश्लेषण या व्यक्तिरेखेचे केले जाते. ही प्रतिकावस्था जरी दूर ठेवली तरीही 'या मातीत मुरलेली एक हाडामासाची अवखळ तरुणी ' म्हणून तिचा झालेला विकासही एलकुंचवारांची प्रगल्भताच निदर्शनास आणून देतो.

आपल्या साचलेल्या भूतकाळाची शोकांतिका राजाध्यक्ष, प्रज्ञाच्या डोळ्यातून गुंग होऊन पाहतात. वर्तमानकालीन ' मी 'ने (प्रज्ञाने) भूतकालीन ' मी 'च्या (अनंतरावांच्या) आयुष्याचा, व्यथावेदनेचा यशापयशाचा, सोसभोगांचा केलेला ' रिसर्च ' स्वत:च्या भाष्यस्वरांसह हळूहळू वाचक–प्रेक्षकांसमोर उलगडत जातो. या दोन ' मी 'च्या संवाद–विसंवादातून राजाध्यक्षांच्या जीवनाची वेधक आत्मकथा आपल्या स्वत:च्या गती–नाट्यासह एक अभिनव दर्शन देते. अशी ही स्वत:तली दोन माणसे एकांतात एकमेकांना भेटली, एकमेकांच्या संवाद-विसंवादात, संघर्षात एकमेकांना ओरबाडताना, एकमेकांच्या आत्मदर्शनाने लुब्ध होऊन एकमेकांवर प्रेम करू लागली, तर ? एका हळव्या क्षणी प्रज्ञा (वर्तमानकालीन ' मी ') राजाध्यक्षांना (भूतकालीन ' मी ' ला) आवेगाने बिलगते. इथे प्रज्ञाची राजाध्यक्षांमधील गुंतवणूक ही केवळ वैयक्तिक गुंतवणूक न राहता दोन ' मीं 'ची गुतवणूक होते. प्रज्ञाचा स्पर्श भूतकालात गेलेल्या राजाध्यक्षांना जागे करून वर्तमानकालात आणतो. काही क्षण अनावर जातात. भूतकालीन ' मी ' (अनंतराव) वर्तमानकालीन ' मी 'च्या (प्रज्ञाच्या) मस्तकावर करुणेने हात ठेवतो व वात्सल्याने भिजलेल्या स्वरात निरोप देतो. आता संवाद तर नाहीच पण विसंवादही नाही. हताश, थकलेले राजाध्यक्ष भूतकाळ उपसणे थांबवतात. पर्यायाने ' आत्मकथा 'ही थंडावते.

प्रज्ञाचे हे अंतरंगदर्शन एक प्रकारे राजाध्यक्षांचेच अंतरंगदर्शन आहे. प्रज्ञाचे दुसरे दर्शन हे तिच्या आणि प्रमोदच्या प्रेमाच्या संदर्भातले आहे, या दर्शनी बाह्यरंगाद्वारे प्रज्ञा ' खऱ्या प्रेमासाठी आसुललेली पण तरीही प्रेमापासून दूर पळणारी एक चैतन्यशील स्वच्छंदवादी प्रेयसी ' या रूपात जाणवते, प्रज्ञा राजाध्यक्षाच्या वदेनेला हलकासा स्वर देतेच पण ' आत्मकथा ' साकार करायला निमित्तमात्रही होते; आणि आत्मकथेचा पूर्णविरामही तीच ठरते.

प्रज्ञा–राजाध्यक्ष संबंध–पितृप्रीतीगंड
(Electra complex)

आत्मकथेत ' प्रज्ञा ' अजाणता आईला व प्रमोदला दूर सारून राजाध्यक्षांना (मानलेल्या पित्याला) बिलगते असे एलकुंचवार यांनी दाखवले आहे. या मागे एक निश्चित प्रयोजन असू शकते आणि तसे जर ते असेल तर त्यातून एलकुंचवारांची प्रगल्भताच निदर्शनास येते. राजाध्यक्षांवर मानसिक दृष्टीने अवलंबून असणारी प्रज्ञा ही एकप्रकारे मनोगंडाचीच शिकार आहे. फक्त नाटकाच्या गतीत ते पटकन लक्षात येत नाही इतकेच. प्रज्ञाचे वडील जिवंत असते तर ' राजाध्यक्ष–प्रज्ञा 'संबंधाचा विकास जसा नाटकात दाखवला आहे तसा झाला असता का ? याचे उत्तर अर्थातच ' नाही ' असेच द्यावे लागेल. नाटककाराने मोठ्या खुबीने राजाध्यक्ष आणि प्रज्ञा या दोघांनाही एकच पातळीवर आणून दोघांच्या जीवनाची लय एकसारखी ठेवलेली आहे. विलक्षण तुटलेपण, पोरकेपण, एकाकीपण आणि गडद काळोख हा दोघांच्या आयुष्यातला समान दुवा आहे. वयाच्या सहाव्या–सातव्या वर्षी वडील वारलेले, विनसलेले बालपण, बाबांना जाऊन पंधरा वर्षे झाली तरी त्यातून बाहेर न पडणारी आई, आईचा तिरस्कार आणि राजाध्यक्षांच्या प्रेमात वाटा मागणारा (आता शत्रूवत वाटणारा) प्रमोद – या प्रज्ञाच्या व्यक्तिरेखेतील काही सूचक गोष्टी फ्राइडने प्रतिपादलेल्या ' पितृकाम्या 'चीच (Electra complex)'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आठवण करून देतात. राजाध्यक्षांच्या प्रेमाचा एकट्यानेच आस्वाद घेण्याचा तिचा अट्टाहास आहे. या अट्टाहासापायीच ती स्वतःची पर्यायाने राजाध्यक्षांची शोकांतिका घडवून आणते. बालपणातील पितृगमनाच्या व मातृवधाच्या जाणिवा (नेणिवात ढकलल्या गेलेल्या) यांचाच आविष्कार 'प्रज्ञा' व्यक्तिरेखेच्या विकासाबरोबरच नकळत होताना दिसतो.

अपत्यहीनता, कन्यादानाची इच्छा, मुलाचा (निर्मितीचा) ध्यास या गोष्टीच राजाध्यक्षांना प्रज्ञाच्या सहवासाला प्रवृत्त करतात. म्हणून ते प्रज्ञाला फोन करून वारंवार बोलवताना दिसतात. प्रज्ञा बरोबरच्या संबंधाचे विश्लेषण करावेसे राजाध्यक्षांना वाटत नाही तर प्रज्ञा या 'संबंधा'चे विश्लेषण करत गुंता वाढवून घेते. राजाध्यक्षांचा तिच्या वाट्याला आलेला सहवास व त्यातून आलेले अनुभव यांना तिच्या आयुष्यात फार महत्त्व आहे. या सहवासाचा वस्तुस्थितीपेक्षा वेगळा वैयक्तिक अर्थ ती लावते त्याप्रमाणात राजाध्यक्षांबरोबर संबंधाचा मानसिक-शारीरिक विकास तिला यातनेमयतेकडे घेऊन जातो.

प्रज्ञा–राजाध्यक्ष संबंध–आदिम पातळीवर

राजाध्यक्षांच्या आयुष्याच्या जास्तीत जास्त जवळ जाता यावे, यासाठी राजाध्यक्षांना 'बोलतं' करणे, त्यांना 'मोकळं' करणे भाग आहे. याकरिता चहा आलाच, त्याबरोबर गप्पाही आल्या. या संवाद–विसंवादामधूनच राजाध्यक्षांच्या साहित्यातील अनेक दोषस्थळे–भावनांकित देशप्रेम, लिखाणातला, मोघमपणा रक्तातला भोंगळ आदर्शवाद, खोट्याचा बुरखा, भोंगळ स्वप्नरंजन – याची एक भली मोठी यादीच प्रज्ञा राजाध्यक्षांसमोर ठेवते. ती जसजशी राजाध्यक्षांचा भूतकाळ उपसू लागते तसतशी राजाध्यक्षांच्या शरीरावरची-यशापयश, मानसन्मान, हारतुरे, पद्मभूषण यांनी युक्त असलेली वस्त्रे गळून पडतात. आपले साहित्य हे आपल्या हयातीतच जुने, डेरेट झाल्याची जाणीव त्यांना वैफल्यग्रस्त करते. 'आमचं साहित्य आमच्या पिढीबरोबरच संपणार'–हे त्यांचे उद्गार या खिन्नतेतलेच आहेत. केवळ साहित्यविश्वातच नव्हे तर प्रत्यक्ष जीवनातही व्यक्तिव्यक्तीमधल्या संबंधाचे, एकाकीपणाचे व एकंदरीत सगळ्या संकल्पांचे, आयुष्याचे आराखडे चुकत गेल्याची वास्तव जाणीव राजाध्यक्षांना होते.

राजाध्यक्ष :....प्रज्ञाबाई, तुम्ही वागता कधी खोटं स्वतःशी, दुसऱ्याशी ?

प्रज्ञा : का ?

राजाध्यक्ष : मी फार तसं केलं आहे आयुष्यात. का बरं असं वागतो आपण ? आणि खोट्याला खऱ्याचा बेमालूम मुलामा देत जगतो आपण ? मी माझी, उत्तराची न वासंतीची गोष्ट किती खोटी करून टाकली ?

या आत्मज्ञानानीच राजाध्यक्षांना स्वतःचेच स्वरूप अधिक परखडपणे, स्पष्टपणे प्रतीत होत जाते. 'एक अस्सल माणूस' म्हणून जगताना आलेले अपयश शांतपणे पचवत राजाध्यक्ष स्वतःच्या हातानीच स्वतःबद्दलच्या व लोकांनी, प्रस्थापितांच्या गटांनी दिलेल्या प्रतिमा पुसून टाकतात. उरते फक्त अनंतराव राजाध्यक्षांचे विशुद्धरूप. भूतकाळाकडे जाणारी पायवाट ही अखेर माणसाच्या मूलत्वाकडे नेणारी ठरते.

अर्थात एकटे राजाध्यक्षच नव्हे तर प्रज्ञाही 'खोट्याला खऱ्याचा बेमालूम मुलामा' देत जगते आहे. 'प्रज्ञाबाई, तुम्ही वागता कधी खोटं स्वतःशी, दुसऱ्याशी ?' (नात्यातील अनित्यता उमजलेल्या अनंतराव राजाध्यक्षांनी योजलेला 'प्रज्ञाबाई' हा शब्द एलकुंचवारांनी हेतुपुरस्सर योजलेला आहे.) या राजाध्यक्षांच्या प्रश्नानी तिच्या अंगावरची खोटेपणाची सगळी वस्त्रे गळून पडतात. तिच्यातल्या आत्म्याला जाग येते. तिच्यातील 'मूल स्त्री' जागी होते. या 'स्त्री'ला ज्या क्षणी राजाध्यक्षांच्या विशुद्ध रूपाची ओळख पटते त्या क्षणी दोघांत एक सखोल, दृढ, निरंतर संबंधाचे एक सामायिक, संपूर्ण नवीन जग तयार होते. याचमुळे राजाध्यक्षांच्या गुडघ्यांवर डोके ठेवून काही क्षण अनावर रडणारी 'प्रज्ञा आणि राजाध्यक्ष' यांच्यात लेखनिका व लेखक असा वरवरचा संबंध न


अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहता आंतरिक अर्थाने या दोन व्यक्ती एकमेकांना बिलगतात. ते खऱ्या अर्थाने आदिम पातळीवरील मिलन ठरते.

'प्रज्ञा–राजाध्यक्ष' संबंध विकास : मानसिक–शारीर पातळीवर

'प्युअरली अल्टेरिअर मोटिव्ह' म्हणून केवळ फायद्यासाठी राजाध्यक्षांच्या 'आत्मचरित्राची' लेखनिका झालेली सुरवातीची प्रज्ञा राजाध्यक्षांच्या सहवासात कशी उमलत जाते, त्या दोघांमधले आंतरिक स्नेहाचे नाते 'शारीरिक कृती'पर्यंत कसे घडत जाते याचे मोठे हृद्य, अर्थबहुल दर्शन एलकुंचवार काळजीपूर्वक घडवताना दिसतात. या स्नेहानुभवातूनच प्रज्ञाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास उलगडून बघावयास हवा. प्रज्ञाच्या व्यक्तिरेखेत मानसिक–शारीक पातळीवर होत जाणारे बदल एलकुंचवार यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक, सूक्ष्मतेने टप्प्याटप्प्याने नाटकात विकसित केले आहेत.

राजाध्यक्षांबरोबरच्या संबंधाचा उच्चार प्रज्ञा प्रमोदजवळ करते. त्याच्या लक्षात येते की हिला 'वेडाची लहर' आलेली आहे. तो तिला परोपरीने समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो पण ती त्याच्या प्रेमाकडे पाठ फिरवत त्याला आयुष्यातून सहजपणे वजा करते. यात आईने तिच्याकडे केलेले दुर्लक्ष तिला एकटेपणाची आणि असहायतेची जाणीव अधिकच तीव्र करून देते. याचमुळे प्रज्ञाला मागे फिरायला रस्ताच शिल्लक रहात नाही. आता केवळ एकच मार्ग–राजाध्यक्ष, राजाध्यक्षांचे घर आणि त्यांचे चरित्र. प्रज्ञा ही



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजाध्यक्षांवर मानसिक दृष्ट्या अवलंबून आहे. नाटकाच्या गतीबरोबरच हे अवलंबून राहणे वाढत जाते. या अवलंबून राहण्याच्या प्रक्रियेचेच नाव 'प्रेम'. यातूनच एका हळव्या क्षणी ती "अभावर होऊन त्यांना बिलगते," आता फक्त तुटलेपण आणि काळोख....! अर्थात हे तुटलेपण, वाढता काळोख, रक्तात मुरलेले एककीपण आणि तडफडणारे मन, उत्तरा आणि वासंती दोघींच्याही वाट्याला आलेले आहे. संपूर्ण नाटकात उत्तरा, वासंती आणि प्रज्ञा या तीन पिढ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तीन स्त्रिया राजाध्यक्षांच्या आयुष्यात येतात; त्यांचे आयुष्य घडवतात आणि काही प्रमाणात उध्वस्त देखील करतात. क्रमाने येतात आणि त्याच क्रमाने त्यांच्या आयुष्यातून निघूनही जातात. प्रत्येकीची जीवन जगण्याची, अनुभव घेण्याची व व्यक्त करण्याची पद्धत वेगवेगळीच आहे. तिघींनाही काही काळ का होईना राजाध्यक्षांच्या सहवासात सुरक्षितता लाभलेली आहे. एलकुंचवार तिघींचे बालपण, बालपणातले बरे-वाईट अनुभव व त्याचा व्यक्तिमनावर झालेला परिणाम, मनाची जडणघडण, प्रेमाची पद्धती भिन्न तर ठेवतातच पण त्याचबरोबर प्रत्येकीचा शारीर-मानसिक, प्रतिकात्मक, आदिम आणि मनोविश्लेषणात्मक पातळीवर झालेला विकास काळजीपूर्वक घडवत मुख्य प्रवाहाशी एकरूप होऊ देतात. हा सगळा एलकुंचवारांच्या व्यक्तिरेखेचा प्रवास मूळातूनच अभ्यास करण्यासारखा आहे.

न्यूनत्वाच्या भावनेने पछाडलेली वासंती

'प्रज्ञा-वासंती-उत्तरा' या तीन व्यक्तिरेखेत मध्यवर्ती व्यक्तिरेखा वासंतीचीच आहे. वासंती उत्तरेची धाकटी बहीण. वासंतीचा राजाध्यक्षांशी आलेला संबंध व त्यातून झालेली 'निर्मिती' हेच या नाटकाचे खरे सत्य, बीजसूत्र आहे. वासंतीच्या आयुष्यावर छाप पाडणारी व तिचे जीवन उध्वस्त करणारी गोष्ट म्हणजे तिची थोरल्या बहिणीबरोबरची स्पर्धा. वासंतीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्वच न्यूनत्वाच्या प्रखर जाणीवेने पछाडलेले आहे. उत्तरेच्या घरातले तिचे वास्तव्य आणि तिचा निकटचा सहवास वा गोष्टींनीच तिच्या स्वभावाची-व्यक्तिमत्वाची जडण-घडण केली आहे. याचमुळे थोरल्या बहिणीशी स्पर्धा, अखंड स्पर्धा हेच तिच्या जीवनाचे बोधवाक्य बनते.

प्रत्येक व्यक्तीत न्यूनगंड हा असतोच. ही प्रभावी भावना कधी विधायकतेकडे तर कधी विघातकतेकडे वळते. बालपणात नानाविध कारणांनी किंवा प्रत्येक व्यक्ती बालपणी असहाय, दुर्बल आणि परावलंबी असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगात न्यूनत्वाची भावना निर्माण होताना दिसते. या न्यूनत्वाच्या भावनेवर मात करण्यासाठीच व्यक्ती सामर्थ्य, वर्चस्व, श्रेष्ठत्व, परिपूर्णता या गोष्टींच्या मागे लागते. या असहाय परावलंबी बालवयात ज्या घटना घडतात, जे आघात होतात, जी संस्कार, वागणूक मिळते त्या घटकांवरच व्यक्तिमत्वाचा कंद बनत जातो. यामुळेच व्यक्तीचे न्यूनत्व विधायक वा विघातक बनणे हे सर्वस्वी त्या व्यक्तीवरच अवलंबून ठरते. या पार्श्वभूमीवर वासंतीचे 'न्यूनत्व' आपण तपासू लागलो तर आपल्याला असे लक्षात येते की उणेपणाची जाणीव, आत्मगौरवाची भावना, लोकप्रशंसेची वासना, वर्चस्वाची आस या वृत्तीने वासंतीचे व्यक्तिमत्व घडवले असून या व्यक्तिमत्वानेच काहीसे विघातक घेतलेले वळण नाटकात प्रकर्षाने जाणवते. या न्यूनत्व भावनेच्या बाबतीत वासंतीने जो पवित्रा घेतला त्या पावित्र्यातच वासंतीच्या मानसिक आजाराचा उगम झालेला आहे.

तशी ही 'आत्मकथा' जितकी राजाध्यक्षांची आहे, तितकीच ती उत्तरेची देखील आहे. या दोघांचीही आत्मकथा एकाच वेळी, एके संध्याकाळी दोन ध्रुवावर चालू होते. 'अ' आणि 'ब' मधून. या दोन्ही ध्रुवावरून वासंती या व्यक्तिरेखेचे आकलन (१) वासंती-उत्तरा संबंध (२) वासंती-राजाध्यक्ष संबंध (३) वासंती-देवदत्त संबंध (४) वासंती-सलीम संबंध (५) वासंती-दिलीप संबंध (६) 'धुक्याने भरलेली वाट'मधील वसुधा ही व्यक्तिरेखा (७) राजाध्यक्ष-प्रज्ञा संवादातून-या 'सात' दिशांनी बदलत्या, काहीशा फसव्या रूपात (एकमेकांना छेदत) वाचक-प्रेक्षकाला अधिकाधिक समृद्ध करत जाते. वासंतीच्या निकट जाणारा मार्ग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्यक्ती-व्यक्तीमधील संबंधातूनच जात असल्यामुळेच या संबंधाच्या गुंतागुंतीची उकल सतत अवधानपूर्वक केलेल्या निरीक्षणाद्वारेच करायला हवी. खरं तर व्यक्ती-व्यक्तीमधील संबंधच व्यक्तिरेखेला एक वेगळे परिमाण देऊ शकतात संबंधाद्वारेच वासंतीच्या मनोवस्थेसंबंधी, भावावस्थेसंबंधी तसेच अनाकलनीय वर्तनाबाबत जे साकल्याने दर्शन घडते त्या संबंधी काही निरीक्षणे नोंदवणे शक्य आहे.

एका साध्या निष्पाप, निरागस मुद्रेत न्यूनगंडत्वाच्या भावनेने धरलेले मूळ, याच भावनेने तिच्या मनावर गाजवलेले अधिराज्य, उत्तरेच्या सहवासात आयुष्यात येत गेलेल्या अनुभवांनी, अनुभवाच्या वैयक्तिक, वेगळ्या आकलनांनी, या न्यूनगंडात्मक जाणीवेने घेतलेले विघातक वळण, उतारवयात या न्यूनगंडाचा झालेला निरास, शेवटी आपणच 'आपल्या आयुष्याचा गुंता' केल्याची रक्तात झालेली जाणीव व थकलेपण—हा सबंध जीवघेणा प्रवास 'वासंती' या व्यक्तिरेखेला एका वेगळ्या उंचीवर घेऊन जातो. यातही एकाच मातीत रुजलेल्या दोन बहिणी—'उत्तरा आणि वासंती', परिस्थितीनुसार, काही काळ एकत्र राहूनही कशा अलग, दूरवर जातात, दोघींच्या मनोवस्थेत, भावावस्थेत, मानसिक जडणघडणीत कसकसे बदल होत जातात हे दोघींच्या आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यावर तपासून पाहणे मोठे मनोरंजक ठरावे.

वासंती—उत्तरा संबंध

वासंती उत्तरेची धाकटी बहीण. थोरली म्हणून कुटुंबाचे खास फायदे उत्तरेला मिळतात. केवळ थोरली बहीण म्हणूनच उत्तरा, वासंतीवर हुकूमत गाजवू शकते. वासंतीच्या न्यूनगंडात्मक भावनेचा उगम तिच्या कुटुंबातील स्थानातच आहे. उत्तरेच्या अंगी असलेली वर्चस्वाची आस केवळ वासंती—पुरतीच मर्यादित नसून एकूण कुटुंबावर, घरावर तिची सत्ता आहे. आपल्या पुढील आयुष्यात राजाध्यक्षांवर देखील उत्तरा सत्ता गाजवताना दिसते. कुठल्याही बंधनाला, वर्चस्वाला कायम विरोध करणारी वासंती स्वभावतःच बंडखोर आहे. दोघींच्या वयात बरेच अंतर असल्यामुळे दोघींच्या दृष्टीत वाढत्या वयाबरोबर अंतर पडत जाते.

विवाहापूर्वीची उत्तरा आणि बालवयातील वासंती यांच्यात निकोप, निरागस, जिव्हाळ्याचे तसेच सामंजस्यपूर्ण वातावरण आहे. "तिची वेणी घालून देणारी, आपल्या नव्या साडीचा बोंगा तिच्या भोवती गुंडाळून देणारी," शाळेत जाण्या‑आधी न चुकता तिचा पापा घेणारी उत्तरा, बाल‑पणापासून वासंतीच्या मनात खोलवर घर करून राहिलेली आहे. या उत्तरेच्या तिच्या मनातील प्रतिमेच्या नुसत्या आठवणींनीच (उतारवयात) वासंतीचे डोळे नकळत पाणावतात. या प्रेमस्नेहाला तडा जातो तो राजाध्यक्षांच्या, उत्तरेच्या आयुष्यातील आगमनामुळेच. इथेच तिच्यातील दबलेले न्यूनत्व हळूहळू डोके वर काढताना दिसते. कळत नकळत दोघींही एकमेकांपासून दुरावत जातात.

केवळ घरातच नव्हे, तर वृत्तपत्र—मासिकातून महाराष्ट्रभर गाजलेले 'राजाध्यक्ष—उत्तरा' प्रेम प्रकरण, दोघांनी एकमेकांना लिहिलेली रसभरीत प्रेमपत्रे, उत्तरेची सासरची श्रीमंती,— या सगळ्या घटकांचा व घरच्या हलाखीच्या परिस्थितीचा एक संकलीत प्रभाव त्या बालवयातील (तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या) वासंतीवर निश्चित झालेला आहे. लग्नानंतर श्रीमंत झालेली सौ. उत्तरा राजाध्यक्ष जेव्हा माहेरी येई तेव्हा आई—वडिलांची तिच्याशी होणारी जवळीक आणि वासंतीकडे त्यांनी केलेले दुर्लक्ष या संस्काराबरो—बरच न्यूनत्वाच्या, मत्सराच्या भावनेने वासंतीचे मन जळत राहते. यातूनच या दोघींत प्रचंड अंतर पडत जाते. या अंतरामुळेच ही दुर्लक्षित झालेली वासंती अधिकाधिक एकटेपणा अनुभवताना दिसते. अबोध पातळीवर न्यूनत्वाचा झालेला विकास इथे प्रत्ययास येतो.

आई—वडिलांच्या पश्चात खेड्यातून (आपल्या न्यूनत्वाला सोबत घेत) मुंबईत उत्तरेकडे वासंती रहायला येते. परावलंबित्वाची भावना, आश्रितांची जाणीव उराशी कवटाळणारी वासंती, उत्तरेच्या तिच्या संबंधातील वर्तनाचा वैयक्तिक, वेगळा अर्थ काढते. थोरल्या बहिणीशी स्पर्धा—अखंड स्पर्धा हेच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट वासंती निश्चित करते.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वासंती, उत्तरेची धाकटी बहीण. थोरली म्हणून कुटुंबाचे खास फायदे उत्तरेला मिळतात. धाकटी बहीण म्हणून उत्तरेने वासंतीवर गाजवलेली हुकूमत. (न्यूनत्वाच्या भावनेचा उगम)

विवाहपूर्व उत्तरा व साधी निष्पाप वासंती यांच्यातील निकोप, निरागस, जिव्हाळ्याचे सामंजस्यपूर्ण वातावरण (दबलेले न्यूनत्व)

महाराष्ट्रभर गाजलेले उत्तरेचे, अनंतराव राजाध्यक्षांबरोबरचे प्रेमप्रकरण व प्रेमविवाह. या संपूर्ण घटनेचा, वासंतीवर झालेला परिणाम. (अबोध पातळीवर न्यूनत्वाचा विकास)

वासंतीच्या व्यक्तिमत्त्वातले सूक्ष्म बदल

वासंतीचे थकलेपण

दोघींच्या संवाद-प्रतिसंवादातून वासंतीचा झालेला न्यूनत्वाचा निरास.

उतारवयात एकमेकांना भेटलेल्या दोघीजणी (उत्तरा आणि वासंती)

राजाध्यक्षांबरोबर येऊ दिलेला संबंध व या संबंधाचा उत्तरेसमोर केलेला उच्चार. उत्तरेला विद्ध, एकाकी अवस्थेत सोडून गेलेली वासंती.

विवाहोत्तर माहेरी येणारी उत्तरा; वासंती-उत्तरेत पडत गेलेले अंतर, 'श्रीमंत; हुशार, सुप्रसिद्ध पुरुष, नवरा', गटवलेली उत्तरा-तिचे माहेरी आल्या नंतरचे अस्तित्व, आई-वडिलांची तिच्यासंबंधीची जवळीक व वासंतीकडे केलेले दुर्लक्ष.

आई-वडिलांच्या पश्चात खेड्यातून मुंबईत उत्तरेकडे रहायला आलेली वासंती. या न्यूनत्वावर मात करण्याच्या हेतूनेच वासंतीने नृत्यात केलेली प्रगती.

थोरल्या बहिणीशी स्पर्धा-अखंड स्पर्धा हेच जीवनाचे वासंतीने निश्चित केलेले उद्दिष्ट. (बोध पातळीवर न्यूनत्वाचा विकास)

वासंतीचे विघातक न्यूनत्व व त्यावर मात करण्यासाठी तिने वासंतीने गुंफलेले एक सूडचक्र (न्यूनत्वाचा अतिरेक)

'गर्विष्ठ आत्मविश्वास' 'तृप्त स्वत:पुरता अहंकार' या उत्तरेच्या, वासंतीच्या मनात खोलवर रुतलेल्या प्रतिमा. यातूनच स्वत:च्या क्षूद्रपणाची, खुजेपणाची जपलेली जाणीव. (न्यूनत्वाच्या जाणीवेने झपाटलेली)

उत्तरेच्या तिच्या संबंधातल्या प्रत्येक वर्तनाचा वासंतीने लावलेला वैयक्तिक वेगळा अर्थ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ


याची पहिली पायरी म्हणजेच उत्तरेप्रमाणे वासंतीने नृत्यात केलेली प्रगती. न्यूनत्वाच्या भावनेने घेतलेले विधायक वळण हळूहळू पुढे विघातकतेकडे जाते. या विघातकतेचा वासंतीने केलेला उच्चार–

"...तुझा गर्विष्ठ आत्मविश्वास मला सहन होईनासा झाला होता. पापणी उचलून इतरांकडे पहायला सुद्धा तयार नसतो तो. स्वतःत तृप्त, स्वतःपुरता अहंकार ! आणि दुसऱ्याचा अपमान किती सहज हसत, हसत सफाईनं करतेस तू ? कापतेस पण रक्त येऊ देत नाही."


"...हे सगळं कोणाच्या भरवशावर ? अनंतरावांच्याच नं ? तुझं कर्तृत्व काय– तर एक श्रीमंत, हुशार, सुप्रसिद्ध पुरुष नवरा म्हणून मिळवला–"

"मला तुझ्याशी काही स्पर्धा करायची नव्हती. पण तूच जेव्हा जेत्याच्या आवात वागू लागलीस तेव्हा मी ठरवलं– तुला हरवीन मी– ज्याच्या भरवशावर तुझं हे चाललंय तेच जिंकून–"

अखेर वासंती राजाध्यक्षांना जिंकते. नुसती जिंकत नाही तर वश करून घेते, शरीर संबंध येऊ देते; आणि त्या संबंधाचा उच्चार उत्तरेजवळ करते. उत्तरेचे पंखच कापले जातात. त्या विरुद्ध अवस्थेत उत्तरेला एकटी टाकून जेत्याच्या अविर्भावात ते घर सोडून निघून जाते. परत न फिरण्यासाठीच. इथून पुढे दोघींचे आयुष्य भर–



राजाध्यक्ष– वासंती



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

फटलेलेच आहे. फक्त उत्तरा हे तुटलेपण सांभाळत जवळच्या काळोखात सुरक्षितता शोधते, तर वासंती देवदत्तांच्या सहवासात, आयुष्यात आलेला तुटलेपणा उराशी कवटाळत सुरक्षितता शोधू पहाते.

राजाध्यक्षांना वासंती सोडते तर वासंतीला देवदत्त. देवदत्तांच्या मृत्यूनंतर जवळ जवळ मुलाच्या वयाच्या सलीमशी केवळ आधारासाठी, आत्मगौरव आणि लोकप्रशंसेसाठी (लग्न न करता) संबंध येऊ देणे, सलीमबरोबरच्या संबंधाचा उच्चार राजाध्यक्ष व उत्तरा यांच्या-समोर करणे- या गोष्टी न्यूनगंडावर मात कर-ण्याच्या हेतूनेच जन्माला आल्या आहेत. बाकी इतिहास म्हणजे थकलेल्या दोन बहिणींमधला वर्तमानकाल.

वासंती ही राजाध्यक्षांचीच एक क्षीण छाया आहे असे नाटकभर जाणवत राहते. ठासून भरलेला काळोख, मानसिक शारीरिक दुबळेपण, मानसिक वंचना- नैराश्य- वैफल्य यांची तीव्रता दाहकता निर्माण करणारे- वाढवणारे आयुष्या-तील प्रसंग, परिस्थितीशरणता आणि जीवघेणे एकाकीपण हे दोन्ही व्यक्तिमत्वातले समान दुवे. वासंतीचे देखील राजाध्यक्षांप्रमाणेच तीन पिढ्यांतील व्यक्तींशी (राजाध्यक्ष, देवदत्त, सलीम) संबंध प्रस्थापित होताना दिसतात. 'राजाध्यक्ष-उत्तरा' यांचे महाराष्ट्रभर गाजलेले प्रेमप्रकरण या प्रेमप्रकरणाचीच क्षीण छाया वासंती- सलीम प्रकरणात आढळते. (क्रमशः)

संदर्भ टीपा —

१. पार्टी – महेश एलकुंचवार, मौज प्रकाशन गृह, पृष्ठ क्र. ७४
२. संवाद – महेश एलकुंचवार यांची मुलाखत, डॉ. अक्षयकुमार काळे, श्रीवत्स दिवाळी '८९ पृष्ठ क्र. २२३
३. पार्टी – महेश एलकुंचवार, मौज प्रकाशन गृह, पृष्ठ क्र. ७४
४. माझा आजवरचा नाट्यप्रवास – महेश एलकुंचवार (परिशिष्ट- वाडा चिरेबंदी, मौज प्रकाशन गृह, पृष्ठ क्र. ७९
५. Electra complex – Attachment of daughter to father with antagonism towards mother and more or less a counter part of the Edipus Complex with the Son.
(ए डिक्शनरी ऑफ सायकॉलॉजी, संपादक ड्रेव्हर, जेम्स; पेंग्विन बुक्स, १९५२ पृष्ठ क्र ७९)

अनुवादकांकरिता–

वाङ्मय अनुवाद म्हणजे खरे तर संस्कृतींचेच भाषांतर
युगवाणीतून विभिन्न संस्कृतींची ओळख अनुवादित वाङ्मयातून होणे युगवाणीस हवे आहे.
विभिन्न भाषेतील महत्त्वाच्या लेखनाचे अनुवाद मूळ लेखकाच्या परवानगी सहित पाठवावेत. अनुवादकविषयक लिखाणही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

: १ :

विभावरींची स्त्री

डॉ. श्रीनिवास रामचंद्र सिरास

जुन्या आणि नव्या मराठी साहित्यात स्त्री हा विषय लेखकांनी अहमहमिकेने चर्चिलेला आढळून येतो. ह. ना. आपटयांच्या पासून वा. म. जोश्यांपर्यंत आणि पुढेही जेव्हा वाङमयात कलावाद की बुद्धीवाद ह्या चर्चेला उधाण येत गेले तेव्हा सुद्धा स्त्रीबद्दल काही विशिष्ट कल्पनांचा पुरस्कार मराठी साहित्यकारांनी केलेला दिसतो. कुणी लेखकाला जबाबदार धरतात तर कुणी समाजाला. मात्र साऱ्यांचे एकमत एका मुद्यावर होते की स्त्री ची वंचना पुरुषामुळेच होत गेली. ज्या काळात आपण साहित्यनिर्मिती केली तो काळ स्त्रीच्या दबलेल्या मन:स्थितीविषयी समाजाचे मौन आग्रहीपणे पाळणाऱ्या पुरुषी मनोवृत्तीचा होता हे स्वत: विभावरीबाईंच्या लक्षात आलेले होते. त्याचमुळे पंचेचाळीस वर्षे उलटल्यावरही त्यांनी ज्या आठवणी शब्दबद्ध केल्या त्यातही त्यांनी स्त्री आणि तिच्या भोवताल पुरुषप्रधान समाजपरंपरेची भिंत ही किती उंच होती हेच निवेदन केलेले आढळेल.

विभावरी शिरूरकर हे खरे नसणारे नाव घेऊन जेव्हा मालतीबाई बेडेकर यांनी 'कळ्यांचे नि:श्वास' लिहिले तेव्हाची परिस्थिती झपाट्याने बदलून गेली. कारण नावाचे गौप्य राखण्याची जरूर आज भासत नसली तरीही पुरुषसंस्कृती व तिचे प्राधान्य समाजाने आजही हातावेगळे केलेले दिसत नाही. विभावरींची स्त्री ही एकांतप्रिय, मनोज्ञ आणि बुद्धीवादी आहे हे समजून येते. या स्त्रीची प्रथम हालचाल सुरू होते ती तिच्या एकांतप्रिय वृत्तीतूनच. प्रत्येक स्त्रीच्या विवाहपूर्व मनोवस्थेमध्ये एक समानता आहे. ही स्त्री तरुण झालेली, शिक्षण घेणारी किंवा शिक्षण पूर्ण झालेली अशी आहे. तिला शक्यतो नोकरी लाभण्याची व स्वत:च्या मिळकतीवर जीवन जगण्याचीही संधी आहे. मात्र अशाही अवस्थेत तिचा फायदा घेणारे मुख्यत: तिचे आई बाप हेच आहेत. घरातली गाय दावणीला असावी पण तिंचा उपयोगही होतो आहे या जाणिवेतून गायीचे पालनपोषण होत असते असा एक दृष्टिकोन विभावरींच्या लेखनाचा मुख्य पाया आहे. याचे कारण मुळातच ही स्त्री जरी संघर्ष करणारी असली तरीही ती भांडकुदळ नाही. मला म्हणायचे ते असे की तिला लग्नापूर्वीच्या अवस्थेतील संघर्ष स्वीकारार्ह वाटतो—मात्र त्यानंतरच्या पुरुषाशी संबंध लाभल्यानंतरच्या काळात तिची अपेक्षा एकांत प्राप्तीची असते. याचे कारण ही स्त्री एकांतप्रिय आहे. या एकांतप्रियतेचा वापर करून ती स्वत:ची बौद्धिक उन्नती साधण्याची आशा करते. सर्वच स्त्रिया या सर्जनशील नसतील, कौशल्यगुण अंगी असणाऱ्या नसतील याचीही विभावरींना पूर्ण जाणीव आहे. मात्र त्यांनी जी स्त्री आदर्श म्हणून पत्करलेली आहे तिच्या आयुष्यात कौशल्य आणि सर्जन यांनाच खरे महत्त्वाचे स्थान आहे.

कौशल्य हे फक्त टापटीपीने संसार करण्याइतकेच मर्यादित नाही त्यामध्ये व्यवहारीपणाचा, आर्थिक व सामाजिक प्रश्नांना तोंड देण्याचा आणि बुद्धीने अधिष्ठित अशा ध्येयवादाने जीवन जगण्याचा एक विशिष्ट दृष्टिकोण स्वीकारण्याचाही समावेश होतो. ह्या उलट सर्जन ही वृत्ती असल्यामुळे कुणाकुणालाच प्रतिभेचा जसा उपयोग करता येतो तसेच सर्जन म्हणजेच लेखन ही सरधोपट कल्पनाही त्यांनी पत्करलेली आहे. वास्तविक पहाता सर्वच नवी निर्मिती ही सर्जनाचे कार्य असताना लेखिका मात्र त्याला संसार चालविताना घ्यावे लागणारे स्त्रीने स्वत:हून स्वीकारलेले कष्ट असा अर्थ करून घेते. घरात नोकरचाकर असणे ही गोष्ट फक्त श्रीमंत वर्गातच शक्य असते. म्हणून त्या घराचा सांभाळ करणाऱ्या गृहिणीला जे कष्ट करणे भाग पडते त्याचा सर्जनाशी काही संबंध असेल या विचाराला मात्र विभावरींच्या लेखनात स्थान नाही. उलट त्यांना अभिप्रेत असलेली स्त्री उलट ह्या कष्टांच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बेड्या पायातून तोडून टाकणारी ध्येयवादी स्त्री होती ठीक आहे. जर ती स्त्री ते कष्ट आपल्या स्वतःच्या संसारात करीत नसली तर एकवेळ त्या कष्टांना सर्जन हे नाव न देता पुरुषी वृत्तीने स्त्रीवर केलेला अन्याय असे म्हणता येईल. मग प्रश्न येतो की अशा या एकांतप्रिय स्त्रीला तिच्या मनासारखे झाले तरीही पुरुषांबद्दल समाधान का भासू नये? बहुतेक रंगविलेल्या स्त्रिया या अतिरिक्त अभिमानी तरी आहेत किंवा बरेचदा त्या पुरुषाचे पुरुषत्वच नाकारणाऱ्या-सुखवादी विचाराच्या पुरुषद्वेष्टयाही आहेत हे विसरून चालायचे नाही. हिंदोळयावरची नायिका अचला रंगविताना विभावरींनी जो प्रश्न रंगविला तो आता फारच कालबाह्य ठरतो. तरीही आजही गर्भपाताची संपूर्ण संमती समाज व सरकार देत असले तरीही समाज व सरकार हे दोन्हीही मानवी मनाचे अंग नसल्याने गर्भपात हा प्रश्न जितका शारीरिक तितकाच मानसिक चेतना देणारा ठरलेला आहे. त्या त्या अवस्थेत समाजाने कितीही वळणे घेतली तरीही मन मग ते पुरुषाचे वेगळे व स्त्रीचे वेगळे असे समजणे फारसे शास्त्रशुद्ध ठरत नाही.

ही एकांतप्रियता आणखी एका तऱ्हेने प्रगट होते. विवाहोत्तर जीवनात विभावरींची स्त्री पुरुषांच्या बरोबरीने जीवन जगण्याची मागणी करीत येते, कारण तत्कालीन स्त्रीला या बरोबरीच्या सामाजिक स्थितीचा लाभ कुठेही मिळत नव्हता का? हा प्रश्न तसे पाहिले तर साहित्यातूनच त्यांनी सोडविलेला आहे. कारण त्यांच्या बहुतेक स्त्रिया या विवाहोत्तर जीवनात फार करून दुःखीच झालेल्या आहेत. याचे कारण काय असावे तर ते म्हणजे त्यांना पुरुषाचा स्वार्थीपणा हा एक अविनाशी धर्म आहे याची जाणीव झाल्याने, त्यांना पुरुषाचे कामक्रौर्य, त्याची लैंगिक सुख प्राप्तीमधे असणारी स्त्रीपेक्षा वरचढ अवस्था आणि बरेचदा, एकपत्नीत्वाला पुरुषाने दिलेला नकार ही असल्याचे दिसतात.

ह्यांच्या सबंध वाङमयात विभावरींना आपले हे विचार बदलता आलेले नाहीत याचा अर्थ दुहेरी संभवतो. एकतर त्यांनी आपल्या विशिष्ट तत्त्वांसाठी विचारप्रणालीचा आवाज समाजापर्यंत पोहचविण्यासाठी हे वाङमय लिहिलेले असेल किंवा मग दुसरे म्हणजे वाङमयीन अनुकृतीच्या सिद्धांताप्रमाणे जेव्हा त्या हे वाङमय उत्पन्न करीत असतील तेव्हा त्यामधे त्यांचे स्वतःचे भावजीवन प्रक्षेपित होणे अटळ ठरत असेल. या दोन्ही संभाव्यता त्या त्या कारणाने त्या त्या कार्याशी बांधलेल्या आहेत. जर हे संबंध नीट उलगडून बघता आले तरच विभावरींच्या स्त्री कडे नेमक्या दृष्टीने बघता येणे शक्य ठरेल.

आपल्या लेखनाला भाषासामर्थ्य ही विभावरींना कधीच कमावून घेण्याची कमाई वाटलेली नाही हे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. जी भाषा त्यांनी वापरलेली दिसते ती सहज आणि नाविन्याच्या हव्यासापासून, अलंकरणापासून भरपूर दूर अशी आहे. त्या भाषेत समकालीन स्त्रीच्या सहज बोलण्याचा रंग आहे. त्यामुळे वास्तवतावादी लेखनशैली हा विभावरींचा प्रमुख गुण ठरेल. परंतु भाषाशैली जितकी वास्तववादी असेल तितकेच त्या लेखनाचे स्वरूप मात्र वास्तवतावादी न राहता कधी कधी स्वप्नरम्य तर कधी कधी आदर्शप्रेरक राहील याचीही विभावरींनी खूपच दक्षता घेतलेली दिसते. त्या स्वतःहून हा प्रयत्न करीत नसतात व त्यामुळेच त्यांनी रंगविलेली प्रत्येक स्त्री तिच्या उत्कटतेमुळे वाचकाच्या मनाला स्पर्श करून जाते. शिवाय मग तो वाचक पुरुष वाचक जरी असेल तरी ती स्त्री त्या वाचकाला अंतर्मुख तर करेलच पण तो वाचक जर स्त्री असेल तर तिला त्या अंतर्मुखतेसोबतच त्या पात्राशी स्वतःचीही तुलना करायला लावेल इतकी शक्ती त्यांनी निर्माण केलेल्या स्त्री मधे आली. मात्र असे त्यांच्या पुरुषपात्रांमधे झाले का? हा प्रश्न केवळ वाङमयीनच नव्हे तर लेखकांच्या सामाजिक व मानसिक गरजेचा ठरतो. यामधे वाचकही समाविष्ट आहेच.

: २ :

एकांताची आवड असणारी, स्वयंकर्तृत्वावर विसंबून असलेली आणि पुरुषाला बरोबरीच्या नात्याने बघणारी एक नवीन स्त्री विभावरींना रंगवायची होती. ती तशी रंगविताना त्यांच्या प्रत्येक पात्रात त्याचे बहुमोल वैशिष्टय उत्पन्न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होत गेले. कारण या प्रकारची झगडणारी, स्वतःच्या अहंचे महत्त्व ओळखून त्यालाच प्रथम वाव देणारी अशी स्त्री लेखिकेने निरनिराळ्या पात्रांच्या रचनेतून सजीव करण्याचा पूर्ण निश्चयच केलेला होता. आपल्याच लेखनात हे असे का असावे याची त्यांना पूर्णतः स्वाभाविक जाणीव होती. म्हणूनच श्री. त्र्यं. केतकर यांनी आपल्या 'प्रकाशनपूर्व अवलोक' या प्रस्तावनेतील लेखाची सुरुवात करताना पहिल्याच वाक्यात "कळ्यांचे निःश्वास" या ग्रंथाच्या लेखिका श्री. विभावरी शिरूरकर या सारस्वत जातीच्या पदवीधर तरुणी आहेत, असे प्रकाशकांकडून समजते." ही, लेखिका म्हणून पात्रांची कहाणी सांगणारी स्त्री कधी कधी आपलीच कहाणी पात्रांच्या कथेत मिसळून टाकू शकते ही शक्यता सूज्ञतेने सुचविलेली आहे. कारण लेखिकेने लिहिलेले हे प्रथमच प्रकाशित पुस्तक व त्यातही प्रकाशक हे लेखिकेच्या बहिणीचे पती (बहीण– कृष्णाबाई मोटे व प्रकाशक हरी मोटे. यांच्याही विषयी विश्राम बेडेकर यांनी आपल्या आत्मवृत्तात सर्व लिहिलेले आहेच.) असल्याने लेखिकेला हवे असलेले स्वतःच्या नावाचे गोप्य कायम टिकविता आले. एवढेच नव्हे तर त्या पन्नास वर्षांपूर्वीच्या काळातील अपेक्षित टीका, वाभाडे सर्व काही एखाद्या मोठ्या वादळी कल्लोळाप्रमाणे उत्पन्न होणार ही खात्री असल्यानेच लेखिकेने हा निर्णय घेतला होता. मात्र त्यासोबतच या कथा सत्यावर आधारित होत्या हे एक फारच महत्त्वाचे कारण होते. त्या निर्णयामागील हे सत्य लेखिकेने हिंगणे येथील शाळेत व युनिव्हर्सिटीत जवळून अवलोकिलेले असे होते. म्हणूनच जेव्हा एका कथेत (अंतःकरणाचे रत्नदीप) कथानायिका जेव्हा "आम्हा सारस्वतांची जात लहान अन् हुंड्यांचे व रूपाचे विशेष महात्म्य,...." पृ. १७) अशा शब्दातून आपल्या लग्नात कुरूपतेची व जोडीला हुंड्याची अडचण होती हे ऐकवते तेव्हा प्रस्तावना म्हणून लिहिणाऱ्या केतकरांना प्रकाशकांनी विभावरींची ज्ञाती ही सारस्वत आहे हे सांगितले असणे सहज शक्य वाटते.

मात्र एक प्रश्न कायम शिल्लक उरतोच. तो म्हणजे अशा कितीतरी ज्ञातीतून सुशिक्षित अविवाहित, कुमारिका व प्रौढ कुमारिका त्याकाळी अस्तित्वात होत्या. तरीपण विभावरींनी मात्र सारस्वत या ज्ञातीचे नाव प्रथम का घेतले असेल, याचे उत्तर स्पष्ट आणि वास्तवाशी संबंधित असे आहे. एकतर स्वतः विभावरींना आपले नाव गुलदस्त्यात ठेवायचे होते व त्याकरता जी ज्ञाती त्यांची स्वतःची नव्हती अशा ज्ञातीच्या स्त्रीचे काल्पनिक नाव त्यांना टोपणनाव म्हणून हवे होते. दुसरे म्हणजे या तऱ्हेची प्रत्यक्षातली स्त्री मात्र सारस्वत ज्ञातीतलीच असली पाहिजे की जिच्या कथेवर लेखिकेने 'अंत करणाचे रत्नदीप' या कथेची दुर्दैवी नायिका यमूही रंगविली.[१]

'हिंदोळ्यावर' ही कादंबरी विभावरींनी लिहिली व ती १९३४ साली प्रसिद्ध झाल्यावर विभावरीने हे लिहायला नको होते अशीच प्रतिक्रिया टीकाकारांची झाली. मात्र समीक्षकांनी कुठेही विभावरींच्या लेखनावर इतका पराकोटीचा पोथीनिष्ठ दृष्टिकोण ठेवून प्रतिगामी दृष्टीच्या वाचकांनी का विरोधी प्रतिक्रिया केली असेल याचा विचार केलेला दिसत नाही. कारण सर्वच समीक्षक 'हिंदोळ्यावर'ची नायिका ज्या तऱ्हेने विवाहबाह्य संबंधातून मातृत्वप्राप्तीचे ध्येय मिळवते त्यामुळे दीपून गेलेले होते. हे समीक्षक या दृष्टीकोणाला रोगट दृष्टीकोन मानण्याला फारसे तयार नव्हते. धुळीचे वादळ जसे थोडेसे उठते व पुन्हा जमिनीवर धूळ बसल्यानंतर मग त्याची नावनिशाणीही शिल्लक उरत नाही तसेच अचलेच्या बाबतीत टीकाकारांचे झाले. आता हे टीकाकार विभावरीने पडद्याआड न रहाता समोर यावे अशी मागणी करावयाला लागले. म्हणजेच टीकेचे लक्ष्यच बदलले गेले. अचला ही अशी का रंगविली हा प्रश्न दुय्यम ठरून गेला आणि ती रंगविणारी लेखिका स्वतः समोर का येत नाही हीच जिज्ञासा जास्ती महत्त्वाची ठरून गेली.

एकीकडे विभावरींनी 'कळ्यांचे निःश्वास'

---

१. विभावरी शिरूरकर या नावाची संपूर्ण कहाणी अनुक्रमे एक सर्वमंगल क्षिप्रा, 'ललित', एक झाड दोन पक्षी यामध्ये येऊन गेलेली असल्याने त्याचा पुनरोल्लेख टाळून लेखकाचे स्वतंत्र विचारच फक्त येथे व्यक्त केलेले आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिले होते तर दुसरीकडे 'हिंदोळ्यावर.' मात्र दोन्हीही पुस्तकातल्या स्त्री–पुरुष संबंधाची जी जी कथने लेखिकेने निवेदन केलेली होती त्या कथना पाठीमागची मानवी मनाची तक्रार ही एकच होती. विभावरींना स्त्री व पुरुष यांना समाजातील नीती नियमांचा समान फायदा मिळत नाही हे जाणवलेले होते. या मूलभूत जाणीवेतूनच त्यांची स्त्रीवरील पुरुषांचा अन्याय व स्त्रीची होणारी मुस्कटदाबी रंगविणे अभिप्रेत होऊन चुकले. हा निर्णय फार उच्च पातळीवरचा नव्हता. तर त्याची पातळी मानवी मनाच्या संवेदन पातळीवरच होती. थोडे स्पष्टपणे सांगायचे तर समाजातील कुजबुजून चर्चिले जाणारे जे प्रमुख विषय–अनैतिक संबंध, बहुस्त्रीत्व आणि चोरटे प्रेम व दैहिक आकर्षण यांचे जबरदस्त आकर्षण हा या संवेदनपातळीचा प्रमुख पाया होता.

मात्र 'हिंदोळ्यावर'मधली अचला ही स्वैर वाटावी इतपत सामाजिक सुरक्षितता मिळालेली असल्याने प्रथमदर्शनी अचलेला कुणीही सहानुभूती द्यायला तितकेसे राजी नव्हते. या उलट अवस्था 'कळ्यांचे निःश्वास'मधील वेगवेगळ्या कथातून प्रगट झालेल्या स्त्रीची होती. ही स्त्री जास्त शोशिक होती, तिच्यावर आलेले संकट, दयनीय प्रसंग आणि बरेचदा वासनेने विजय मिळविल्याने तिच्या हातून घडत गेलेली नैतिक अधःपाताच्या वाटेवरील वाटचाल हे सारेच असल्यातरी सामाजिक दुःखाचे जास्ती भडक परंतु अद्यापपर्यंत कुठेही न बघायला मिळालेले चित्रण ठरून गेले. विधवा आईच्या वासनेमुळे लग्नाच्या मुलीचे लग्न मोडलेले विभावरींनी जेव्हा दाखविले तेव्हा त्यातील मुलगी आईलाच तू 'आई की दावेदारीण' हा प्रश्न विचारते. या कथेतील मामा हे पुरुषपात्र मुद्दामच मागे टाकून दिलेले आहे.

सर्व कथा पाहिल्या तर 'हिंदोळ्यावर'ची अचला ही देखील या कथानायिकांशी समांतर वावरताना दिसते. एक मात्र आहे की जितका पुरुष द्वेष 'कळ्यांचे निःश्वास'ला कारण ठरतो तितका तो अचलेने आपणहून स्वीकारलेल्या वासनेत-ज्याचे पलिकडे खरे स्वरूप पापवासना आहे हे अचलेला स्वतःलाच कळून चुकते व तिला ह्या कामी साह्यभूत ठरलेला पुरुष विराम हा मात्र तिच्यावर खरे प्रेम करणारा असतोच हे ठामपणे मानताही येत नाही. त्यामुळे अचलेची कथा ही पुरुषद्वेषातून नव्हे तर पुरुष सान्निध्याच्या, शारीर वासनापूर्तीच्या गरजेच्या ध्येयाकडे प्रगत होत गेलेली असल्याने जणू काही तो आधीचा पुरुष विद्वेष गळाठून जातो. स्त्रीच्या वृत्ती जणू काही पालटतात व ती एक भयंकर मानत असलेली गोष्ट केवळ लहरीपणामुळे सुखदायक, धाडस समजते इतकीच कथावस्तू यात सापडते.

[अपूर्ण]

.....युगवाणी प्रतिभेत भेद करणार नाही.
प्रतिभा जुनी–नवी अशी नसतेच.
अशा धारणांच्या लेखकांची युगवाणीस गरज आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्मृतिस्थळातील नामदेव

सु. बा. कुळकर्णी

ज्ञानदेव आणि नामदेव या संतवरांच्या लौकिक चरित्रांविषयी आज आपण जे काही जाणतो त्याचे मूलस्रोत त्या संतांच्या काव्यातच अनुस्यूत आहेत. परंतु त्यांच्या पश्चात तीनचार शतकांनी जन्माला आलेल्या हरिदासांनी, पुराणिकांनी आणि आख्यानक कवींनी त्यांच्याविषयींच्या दंतकथांचा असा काही डोंगर उभा केला आहे की त्यातून निर्भेळ. व सुसंगत इतिहास शोधून काढणे ही एक प्रदीर्घ परिश्रमाची बाब झाली आहे. ज्यांनी आपली उभी हयात ज्ञानदेव आणि ज्ञानदेवींच्या संशोधनात व्यतीत केली त्या रा. ग. हर्षे यांनी लिहून ठेवले आहे :–

" ज्ञानेश्वर चरित्रासंबंधी तर अद्याप खऱ्या संशोधनास सुरुवातच व्हावयाची आहे ! सुमारे ६५ वर्षांपूर्वी श्री. भारद्वाज यांनी या प्रश्नास तोंड फोडले पण संतप्त सांप्रदायिकांनी आमूलाग्र संशोधन न करिता उपलब्ध साधनांवर निर्वाह करून शब्दांच्या कसरतीपलीकडे विशेष काही केले नाही व तीच स्थिती आजही कायम आहे. आपणास अनुकूल तेवढे घ्यावयाचे, प्रतिकूल असेल त्याचा निर्देशही करावयाचा नाही व कोणत्याही विधानास आधार देण्याच्या भानगडीत पडावयाचे नाही.. प्रत्येक बाबतीत साक्षेपी संशोधन झाल्याखेरीज मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहू पाहणे हास्यास्पद आहे."

(–ज्ञानेश्वरांच्या चरित्राचे संशोधन, १९५४. पृ. ३)

नामदेवांच्या चरित्राची हकिकत ज्ञानदेव चारित्राहून भिन्न नाही. ज्ञानदेव–चरित्र कितीही पाखडून घेतले तरी त्यांनी केलेल्या चमत्कारांपलीकडे फारसे काही हाती लागत नाही. नामदेव–चरित्रात चमत्कार तर आहेतच; परंतु आद्य नामदेव, विष्णुदासनामा व शिंपीनामा या शिंपी ज्ञातीच्या तीन नामदेवांची चरित्रे एकमेकात अशी काही गुंतून गेली आहेत की सुसंगतपणे उलगडू पाहणारास हात टेकावे लागतात.

नामदेवांची जन्मतिथी

नामदेव–चरित्राच्या संशोधनाचा प्रारंभ यांच्या जन्मतिथीपासून होतो. नामदेवांची प्रस्थापित जन्मतिथी कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ अशी आहे. तिचा एकमेव आधार नामदेव–गाथ्यातील ' माझे जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणे...' हा अभंग आहे (म. शा. गाथा, अ. क्र. १२४०). या अभंगातील कालनिर्देशाचे निर्वचन कसे चुकीचे आहे हे मी यापूर्वीच अभ्यासकांच्या निदर्शनास आणले आहे. (युगवाणी, ऑगस्ट १९८९). माझ्या मते, नामदेवांची खरी जन्मतिथी ' कार्तिक शुद्ध एकादशी शके ११२९ प्रभव संवत्सर रविवार रोहिणी नक्षत्र ' ही होय. या तिथीमुळे नामदेवांच्या काशीयात्रेचा काळ महिकावतीच्या बखरीतील निर्देशाच्या आधारावर सुसंगतपणे ठरविता येतो व नामदेवांचा छळ करणारा बादशहा बलबन होय हे निश्चित करता येते. (पहा : " संत नामदेवांची काशीयात्रा आणि महिकावतीची बखर "–महाराष्ट्र टाइम्स, रविवार ५ जुलै १९९२)

स्मृतिस्थळातील नामदेव

महिकावतीच्या बखरीप्रमाणे नामदेवांचा निर्देश करणारा प्राचीन ग्रंथ ' स्मृतिस्थळ ' हा होय. वा. ना. देशपांडे यांनी संपादित केलेल्या या ग्रंथाच्या आवृत्तीत (व्हीनस, आ. तिसरी, १९६८ पृ. ७४) स्मृती क्रमांक २४४ पुढीलप्रमाणे आहे–

" वीष्णुदास नामदेवा पंडितमुखें बेधु–संक्रमण : ॥

एकु दिसु नामदेव सींपा पंडितबासांसि भेटला : चर्चा केली : पंडितबासीं खंडिला : मग उपदेसु मागों लागला : परि नेदीतीचि : मग कृष्ण–अवतारावरि बुधि आणिली : मग तेणें ' दिसे गेले वायांवीण ' यें पदें केलीं : ॥ एकी वासना : कवीस्वरबासीं खंडीला : तैसाचि केमद्या : ॥ २४४ ॥"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्मृतिस्थळ हे महानुभाव पंथाचे आद्य आचार्य नागदेव ऊर्फ भटोबास यांचे आठवणींच्या रूपाने मांडलेले चरित्र होय. या ग्रंथाची रचना नागदेवाचार्यांच्या निधनानंतर लवकरच झाली. याचे मूळ लेखन नरेंद्राने केले व पश्चात् परशुरामबास, मालोबास, ओंकारबास, शिवबास, मलेकोयाबास या पंथीय मंडळींनी त्याचे संस्करण केले. नरेंद्राचे मूळ ७०० स्मृतींचे स्मृतिस्थळ आज उपलब्ध नाही. आपणासमोर असलेली प्रत ही खंडित, परिवर्धित व संस्कारित स्वरूपात शकाच्या सोळाव्या शतकात गठित झालेली आहे.

सांप्रदायिकांच्या मते नागदेवाचार्यांचा मृत्युशक १२२४ हा होय. काही संशोधकांच्या मते तो १२३४ असा असावा. म्हणजे प्रस्तुत स्मृतीत वर्णिलेला नामदेव–पंडितबास (दामोदर पंडित) भेटीचा, किंवा एकी वासनेप्रमाणे नामदेव–कवीश्वरबास भेटीचा काळ हा श्रीगोविंदप्रभूंच्या निधनापासून नागदेवाचार्यांच्या निधनापर्यंत; म्हणजे शके १२०९ ते शके १२२४ (वा १२३४) या दरम्यानचा असू शकतो.

दिस गेले वायांवीण

स्मृतिस्थळातील प्रस्तुत स्मृतीत निर्देशिलेले 'दिस गेले वायांवीण' हे पद सर्व नामदेव–गाथ्यांतून समाविष्ट झालेले आढळून येते. महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या नामदेवांच्या अभंग गाथेत ते क्रमांक १३८४ वर आहे :–

"दिवस गेले वायांविण। देवा तुज न रिघतां शरण। बाळत्व गेलें अज्ञानपण। तैं आठवण नव्हेचि ॥१॥ आला तारुण्याचा अवसरु। सर्वेचि विजयाचा पडिभरु। कामक्रोध मदमछरू। अति व्यापारु तृष्णेचा ॥२॥ सर्वेचि वृद्धपण पातलें। सकळ इंद्रियें सोडिलें। देह न करीच म्हणितलें। आंतर पडलें भक्तीसी ॥३॥ कांही हित नव्हेची माझें। दास्य न घडेचि तुझें। आयुष्य वेचिलें वीण काजे। घरणीं वोझें पैं जालों ॥४॥ पुनरपि जन्मा येईन मागुता। कोण जाणे कैसी अवच्छा। तुज मी ध्याईन अनंता। ऐसा लहाना कैं होईन ॥५॥ तुझ्या नामाचा वोरस। तेणें चुके गर्भवास। नामा म्हणे विष्णुदास। देई सौरस आपुलें नामीं ॥६॥"

तुळपुळे यांचे भाष्य

शं. गो. तुळपुळे यांनी आपल्या "महानुभाव पंथ व नामदेव" या निबंधात (नवभारत : ऑक्टो. १९७७) या भेटीची विस्तृत चिकित्सा केली असून पुढील निष्कर्ष काढला आहे :

"स्मृतिस्थळातील ही आठवण पूर्णपणे खरी किंवा पूर्णपणे खोटीही नाही. तिच्यात सत्यासत्यतेचे मिश्रण आहे. भेट झाली, बोलणे झाले हे खरे असेल; पण उपदेश मागितला तो दिला नाही हे खोटे" (पृ. ५३).

प्रस्तुत लीळेवरील आपला अभिप्राय नोंदविताना तुळपुळे यांनी एका अडचणीच्या मुद्याकडे डोळेझाक केली आहे. स्मृतिस्थळातील आठवणी नागदेवाचार्यांच्या मृत्यूपूर्वीच्या आहेत. भेटीचा कालखंडही त्यापूर्वीचा होय. 'दिस गेले वायांवीण' या अभंगातील नामदेव 'सर्वेचि वृद्धपण पातलें, सकळ इंद्रियें सोडिलें, देह न करीच म्हणितलें' या वयाचे आहेत. नामदेवांची प्रचलित जन्मतिथी खरी मानल्यास ते हा अभंग लिहिताना कमीत कमी विशीचे व जास्तीत जास्त चाळीशीचे असू शकतात! ही अडचण पार करण्यासाठी तुळपुळे यांनी आपल्या निबंधात या अभंगातील वार्धक्यसूचक चरणच उद्धृत केले नाहीत व नामदेवांच्या भेटीच्या वेळच्या संभाव्य वयाची चिकित्साही केली नाही.

माझ्या नवीन प्रमेयानुसार नामदेवांचा जन्म शके ११२९ मध्ये झाला व त्यांचे निर्वाण शके १२०९ मध्ये झाले म्हणजे, चक्रधरांच्या निधनसमयी (शके ११९६ मध्ये) नामदेव हे ६६ वर्षांचे होते. ज्ञानदेवांच्या निधनसमयी (शके १२०२ मध्ये) ते ७३ वर्षांचे होते. प्रस्तुत स्मृतीतील भेटीसमयी ते त्याहूनही वृद्ध असावेत. त्यांची नारा, विठा, महादा, गोंदा ही मुलेही प्रौढ असावीत. ज्ञानदेवांच्या निधनामुळे त्यांना विमनस्कता आलेली असावी. तनुमनाच्या या विकलावस्थेतच त्यांची पंडितबास वा कवीश्वरबास यांच्याशी भेट झाली असावी. या भेटीत त्यांनी उपदेश मागणे वा कृष्णावतारावर बुधी आणणे असंभवनीय नाही. प्रस्तुत स्मृतीतील घटित खोटे असावे असे म्हणण्यास आपल्यापाशी कोणताही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरावा नाही. उपलब्ध पुराव्यानुसार ही भेट ज्ञानदेव-निधनोत्तर, शके १२०९ च्या सुमारास झाली असावी असे अनुमान करता येते.

स्मृतीचा भिन्न पाठ

असे असले तरी या विषयाला एक भिन्न आयाम आणि भिन्न भाष्य असू शकते, एवढेच नव्हे, तर तेच वास्तवाला अधिक जवळचे होय. भेटीचे वृत्त खरे असेल तर नामदेवांचे खंडण कोणी केले याबाबतीत स्मृतिस्थळाच्या संकलन-कारांत तीव्र मतभेद दिसून येतात. उपरोल्लेखित स्मृतीत हे खंडण पंडितबास वा कवीस्वरबास यांनी केले असे म्हटले आहे. परंतु स्मृतीचा आणखी एक पाठ वि. ल. भावे यांनी दिला आहे (महाराष्ट्र-सारस्वत, आ. ६ वी, १९८२, पृ. २१८, तळटीप क्र. २). हा पाठ पुढीलप्रमाणे आहे :

"एक वेळ नामदेव आला : तो कोणा नमस्कारू न करितु वैसला : तंवं कवणीं एकीं भणितलें : तुम्ही नमस्कारू न करितु कैसे वैसलेती : तंवं नामदेया कांहीं निंदा वोलिला...मग केसोबासीं निरूपण करूनि तेयाची कुमती हरिली : चर्चा केली : पंडितबासीं खंडिला : मग उपदेश मागूं लागला :"

भावे यांच्या पाठात नामदेवांचे खंडण केसोबासांनी सुरू केले, असे म्हटले आहे. नरेंद्राच्या मूळ स्मृती आज उपलब्ध नसल्याने खरोखरी काय घडले हा अनुमानाचाच विषय होऊन राहिला आहे. भावे यांनी दिलेला पाठ हा वा. ना. देशपांडे संपादित 'वृद्धाचारा'तील (म. सा. प. ९ : ३, पृ. ८७) २७ व्या स्मृतीचीच एक संक्षिप्त आवृत्ती होय.

स्मृतीतील प्रक्षेप

दुसरी गोष्ट अशी की मूळ स्मृतिस्थळाचे जेव्हा संस्करणपूर्व संकलन झाले तेव्हा विष्णुदासनामा नावाचा दुसराही एक शिंपी नामदेव प्रसिद्धी पावून गेला होता. स्मृतिस्थळातील स्मृतींची 'आदि' (शीर्षके) बनवित ना या दोन नामदेवां-मध्ये गल्लत होऊन शादीमध्ये विष्णुदास-नाम्याचेच नाव गोव गेले आहे- 'वीष्णुदास नामदेया पंडितमुखे वेधु-संक्रमण'. एवढेच नव्हे, तर ज्या 'दिस गेले वायांवीण' या अभंगाचा प्रस्तुत स्मृतीत निर्देश आहे त्या अभंगाची निर्मि-तीही या विष्णुदासनाम्याचीच आहे. त्या अभंगावर 'नामा म्हणे विष्णुदास' अशी त्याची मुद्राही आहे. विष्णुदासनाम्याने आयुष्याच्या अंतिम चरणात महानुभाव पंथ स्वीकारला होता असाही एक प्रवाद आहे. त्यामुळेच की काय त्याच्या महाभारताच्या काही पर्वाच्या प्रतींवर 'कृष्णदासनामा' अशी मुद्रा आढळून येते.

केमा कृष्णदास

हे प्रक्षेप प्रकरण येथेच संपत नाही. स्मृति-स्थळाचे उत्तरकालीन संकलनकार विष्णुदास-नाम्याबरोबरच 'केमद्या' नावाच्या आणखी एका कवीचा समानशील म्हणून निर्देश करतात. हा केमद्या म्हणजे केमदेव ऊर्फ केमा कृष्णदास हा कवी होय असे अनुमान करता येते. इ. सनाच्या सोळाव्या शतकातील या कवीने 'स्यमंतक-वर्णन' या नावाचा ८९९ ओव्यांचा काव्यग्रंथ रचिलेला आहे. या काव्याची एक पोथी वि. भि. कोलते यांच्या पाहण्यात आली होती असे ते सांगतात (नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर, सुधारित आवृत्ती, प्रस्तावना पृ. ४५). या काव्याचा लेखनकाल कोलते यांनी पुढीलप्रमाणे उद्धृत केला आहे

"रोहीनी नक्षेत्री : गोकुळ अस्टमी तीथी ग्रंथु पावला नीह्प्ती : केमा म्हणे : श्रीकृष्ण पावो प्रीती : स्वामी माझा ॥८९९॥ ग्रंथु संपुर्ण : १४५४ नंदनं नाम संवत्सरे ॥"

पोथीच्या समाप्तिलेखात नोंदलेल्या शक व संवत्सराचा मेळ बरोबर पडतो. म. रा. जोशी या केमदेवाला नामदेवाच्या काळात नेऊन बसवू पाहतात (वि. सं. मं. वा. १९७१, पृ. १३२); परंतु त्याला काहीही आधार नाही. हा केमदेव विष्णुदासनाम्याचाच समकालीन होय.

यावरून असे दिसून येते की प्रस्तुत स्मृतीचा मूळ (अनुपलब्ध) पाठ संत नामदेवांना अनुलक्षून असला तरी त्याचे उत्तरकालीन परिवर्धित रूप हे विष्णुदासनाम्याला अनुलक्षून आहे नामदेवांच्या चरित्रासंबंधीचे बहुसंख्य प्रश्न अशा प्रकारच्या घोटाळ्यातूनच उद्भूत झालेले आहेत. ■

आर/१४, लक्ष्मीनगर नागपूर-४४००२२

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिपणं

आदिवासी साहित्य : एक विचार

ल. सा. बोरकर

दलित साहित्याने मराठी साहित्य प्रांतात केलेल्या अभूतपूर्व क्रांतीचा एक परिणाम म्हणजे विविध समाजघटकांना आपआपली सांस्कृतिक अस्मिता जपण्याकरता आपआपल्या अभिव्यक्तीचे साहित्य निर्माण करावेसे वाटण्याची प्रेरणा प्राप्त होणे.

जनसाहित्यापासून तो आदिवासी साहित्यापर्यंत अनेक अंगांनी महाराष्ट्रप्रांती साहित्य प्रवाह दुथडी भरून त्यामुळे वाहू लागला. ज्यामुळे भाषा, शास्त्र, कसोटी, निकष, समीक्षा, मूल्यमापन, सौंदर्य या साऱ्यांचेच मापदंड, चौकटी व आधार खिळखिळे होऊन त्यात बदल घडून आले.

या बदलाने महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन, सामाजिक व राजकीय जीवन यातही प्रतिबिंब आज स्पष्टपणे पडलेले दिसते.

कोणी कशात समाविष्ट असावे व कोणी कोणत्या व्यापक संकल्पनेचा झेंडा वहावा या वादात अडकून पडण्याऐवजी आपल्याला संकुचित म्हटले तरी चालेल हा दृष्टिकोण बाळगून अनेकांनी अनेक प्रकारे आपल्या अस्तित्वाचे व अस्मितेचे नामकरण आग्रहाने करून घेतलेले दिसते.

"जातिव्यवस्थेतील शोषणात असलेली कौरुप्याची बीजे शोधून समताधिष्ठित परिवर्तनाचा लढा देणे" असे या साऱ्याच, विविध प्रकारे नामकरण करून वावरणाऱ्या साहित्य चळवळींचे सर्वसाधारणपणे आद्य स्वरूप असल्याबद्दल कुणाचेच दुमत नाही.

अगदी आजचे, आपले नामकरण फारसे रुजवण्यात अद्याप यशस्वी व्हायचे असलेले, आदिवासी साहित्य देखील "दलितत्व आणि आदिवासीत्व" या दोन जखमा मानते व आपली जातकुळी वेगळी समजत नाही.

मात्र आदिवासी साहित्याने "आपली आदिमांची सांस्कृतिक समृद्धी जोपासली पाहिजे कारण त्याला आदिम समूहाची सांस्कृतिक भूक भागवायची आहे" असेही सांगितले जाते.

दलित साहित्याने आदिमांच्या या सांस्कृतिक समृद्धीच्या जोपासनाकडे लक्ष पुरवावे असे ते म्हणत नाही.

मुळात 'दलितत्व' ही जशी 'जखम' तशीच 'आदिवासीत्व' ही देखील 'जखम' असे मानायचे असेल तर ज्यामुळे ती 'जखम' कायम उठून दिसेल ती (आदिमांची) संस्कृती, सांस्कृतिक समृद्धी जोपासली पाहिजे, मग ती आदिमांची असो की अ–आदिमांची या समर्थनाचा अर्थ काय ? 'दलितत्व' जोपासले पाहिजे असे आपण म्हणू काय ? की ते नाहीसे करणारे परिवर्तन हवे या करता दलित साहित्याचा लढा आहे असे आपण म्हणू ?

'आदिवासीत्व' ही जर 'जखम' असेल तर मुळात या 'जखमेचे' नेमके स्वरूप काय ? हे ठरले पाहिजे. सांस्कृतिक वैभवही जोपासायचे आणि क्रांती–परिवर्तनही करायचे म्हणजे नक्की काय करायचे ? आदिवासी साहित्यिक त्याच मराठीत त्याच परिवर्तनाचे तेच स्तोत्र, जे दलित साहित्याने गाऊन झालेले आहे (व जी 'क्रांती'; जे 'परिवर्तन' त्यांना अपेक्षित होते त्याचा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मागमूसही कोठे जाणवत नाही. खुद्द दलित साहित्यातही तो आक्रोश क्षीण होत, परिस्थितीशरण होत आज ऐकू येईनासा झालेला दिसतो) तेच क्रांतीस्तोत्र हे नव्याने आळवणार असेल तर आदिवासी साहित्याच्या पृथगात्म अस्तित्वाची सिद्धताच कशी होणार ? मुळात त्याची असे पृथगात्म असण्याची गरज नैसर्गिक आहे की ही गरज कृत्रिम आहे हे तपासले पाहिजे.

आदिमांची लोकभाषा, व परंपरागत आदिम साहित्य हे जर आदिवासी साहित्याचे कुळ असेल व ते वैभव जर टिकवायचे असेल तर वैभव टिकवत टिकवत नेमके कोणते परिवर्तन त्यातून व कसे साधले जाणार आहे ? व मग दलित साहित्याची व आदिवासी साहित्याची जातकुळी एकच कशी असू शकेल याचाही विचार झाला पाहिजे, कारण दलित साहित्याने कोणतेच 'वैभव' टिकवून परिवर्तन साधण्याची दुहेरी भूमिका घेतली नव्हती.

एकीकडे आदिम लोकजीवनाचे, लोकसंस्कृतीचे जतनही करून ते संवर्धित करून आदिम लोकसमूहाची संस्कृती व त्याचे वैभव जपले पाहिजे असे जर म्हणायचे तर मग या वैभवात दडलेले 'आदिवासीत्व' ही 'जखम' कशी ठरवता येईल व दुसरीकडे त्याचवेळी त्यातल्या दडलेल्या शोषणाच्या व्यवस्थेविरुद्ध कसे उभे राहता येईल याचाही उलगडा व्हायला हवा.

आदिम समूहांची सांस्कृतिक भूक भागवतांना या समूहांना आपल्याला आदिमच राखायचे आहे की त्यांना अत्याधुनिक संस्कृतीपर्यंत आणायचे आहे हे देखील स्पष्ट झाले पाहिजे.

"आदिमांच्या बोलीभाषेत परिवर्तनवादी साहित्य आदिवासी साहित्यिकांनी लिहिले पाहिजे. व आदिमांची अस्मिता जागविणारे क्रांतिकारी आदिवासी साहित्य जाणीवपूर्वक लिहिले गेले पाहिजे" असे म्हणतांनाच "आदिमांची लोकसंस्कृतीदेखील जपली पाहिजे, त्याचे संवर्धनही केले पाहिजे" असेही म्हटले जाते. असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा अपेक्षित परिवर्तन व क्रांती-बद्दलच्याच आपल्या कल्पना स्पष्ट नसून गोंधळाच्याच असल्या पाहिजेत असे दिसते. कारण परिवर्तन किंवा क्रांती ही केवळ आदिवासी क्रांती किंवा आदिवासी परिवर्तनापुरती मर्यादित अशी वेगळी, दलितांपुरती वेगळी, अ-दलितांपुरती वेगळी अशी असू शकत नाही. ती 'समग्र' असेल. व साऱ्याच क्रांती व परिवर्तनवाद्यांना ती सर्वत्र सर्वच समाजात सारखीच अपेक्षित असेल. तसे नसेल तर ती क्रांती अथवा परिवर्तनच नव्हे.

महात्मा फुले, डॉ. राममनोहर लोहिया किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारी क्रांती, परिवर्तन अथवा समाजव्यवस्था ही विशिष्ट जात, धर्म, पक्ष, पंथ, प्रवाहांपुरती व त्यांचे आपले अभिनिवेश, सांस्कृतिक वैभव, व संस्कृती जोपासून तिचे जतन करून साधावयाची क्रांती व परिवर्तन नसून समाजातील सर्वच बाबीत व थरात ती पूर्णपणे अपेक्षित आहे, याकडे डोळेझाक करून चालणारी साहित्याची आंदोलने त्यामुळे सामाजिक न ठरता असामाजिक होत जाण्याचा व त्यांची नाळच क्रांती व परिवर्तनापासून गळून पडून ते एकाकी पडण्याचा धोका आतातरी ओळखला पाहिजे.

आदिवासी साहित्यिक व त्याबद्दल नव्याने विचार मांडणाऱ्यांनीही त्यामुळे अगोदर आपला विचारव्यूह बरोबर तपासला पाहिजे व त्यातील त्रुटी, विसंगती व दोष दूर सारले पाहिजेत. क्रांती, परिवर्तन, सामाजिक बदल, संस्कृती व सांस्कृतिक वैभव या साऱ्याच शब्दांना जर काही अर्थ उरले असतील व त्यांच्या त्या त्या अर्थानेच हे शब्द आपण वापरणार असू तर मुळात त्या साऱ्या शब्दांचे ते अर्थ व संकल्पना नीट तपासून समजून घेतल्या पाहिजेत. तसे न झाल्यास आपल्याच विचार-व्यूहात आपणच अडकून पडून केवळ आपल्या अस्मितेचा अभिनिवेश व्यक्त करणारी व्यूहरचना असे हे अधिक एक बेट होऊन बसेल. ■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विनाशाच्या संकल्पनेने भारावलेले पाश्चात्य विज्ञान कथा-जगत

प्रा. अ. ल. देशपांडे

सायंस फिक्शन अर्थात विज्ञान कथा पाश्चात जगात दिवसेंदिवस लोकप्रियतेचे उच्चांक गाठत आहे. दर महिन्याला शेकडो विज्ञान कथा-कादंबऱ्या तर तिकडे प्रसिद्ध होत आहेतच शिवाय या प्रकारच्या साहित्याला वाहिलेल्या नियतकालिकांची संख्या देखील सारखी वाढते आहे. सिनेमा, रेडियो व टेलीव्हिजन हे देखील या लोकप्रियतेला हातभार लावताना दिसतात. सुरुवातीच्या काळात केवळ मनोरंजनात्मक किंवा स्वप्नरंजनात्मक म्हणून दुर्लक्षिली गेलेली विज्ञान-कथा आता हळूहळू प्रतिष्ठा प्राप्त करताना दिसत आहे. परिणामत: अनेक विद्यापीठांतून आता तिचा गांभीर्याने अभ्यासही होऊ लागला आहे.

पाश्चात्य विज्ञान कथा ज्या संकल्पनांभोवती फिरताना आढळते, त्यापैकी प्रमुख म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल त्या म्हणजे मानव-यंत्र संबंध, आदर्श समाजरचना, जगाचा विनाश, अवकाश प्रवास इत्यादी होत. ज्या विज्ञान कथाकारांनी जगाच्या विनाशाची संकल्पना आपल्या लिखाणातून साकार केलेली आहे अशांचा या ठिकाणी विचार केला गेला आहे.

जगाच्या विनाशाची कल्पना तशी फारच भयावह असली तरी हा विनाश कोणत्या कारणांनी व कसा घडून येईल व तो घडल्यावर जगाची काय अवस्था असेल याचे तपशीलवार व सविस्तर चित्रण करण्याचा प्रयत्न अनेक ब्रिटिश विज्ञान कथाकारांनी केलेला दिसतो.

खरं म्हणजे विनाशाच्या वर्णनाची परंपरा विज्ञानपूर्व काळातील धार्मिक, पुराण ग्रंथातूनही आढळते. त्याचप्रमाणे रोगराईमुळे, दुष्काळाने, आगीने किंवा अतिवृष्टीने जगाचा नाश झाल्याचे उल्लेख व वर्णन बायबलमध्ये सुद्धा आलेलेच आहे. परंतु त्या काळाचे वैशिष्टच असे की, नैसर्गिक आपत्तींकडे केवळ एक दैवी आपत्ती म्हणून पाहण्याची वृत्ती त्या काळात आढळते.

या आपत्तींविरुद्ध लढण्यास मनुष्य पूर्णपणे हतबल व असहाय असा या प्रकारच्या ग्रंथातून दाखविलेला असतो. अशा वेळी प्रार्थना व धैर्य हेच काय ते उपाय मनुष्याजवळ राहिलेले दाखविले जातात. हे सर्व कर्माचे किंवा पापाचे फळ असल्याने ईश्वरीकृपेशिवाय त्यातून तरणोपाय नाही असा दृष्टिकोन अशा प्रकारच्या वाङमयातून व्यक्त झालेला दाखविलेला असतो.

याच विनाशाच्या संकल्पनेचा आविष्कार अगदी वेगळ्याप्रकारे १९ व्या शतकात प्रसिद्ध झालेल्या अनेक विज्ञान कथा-कादंबऱ्यातूनही होताना आढळतो. किंबहुना या काळातील विज्ञान कथाकारांना या संकल्पनेने फारच आकर्षित केलेले आढळते. यात प्रामुख्याने अग्रेसर आहेत ते ब्रिटिश विज्ञान कथाकार. १८९७ साली. एच. जी. वेल्स यांच्या 'दि स्टार' या कादंबरीत सूर्यमालेतील ग्रहांवर इतर ताऱ्यांचे आक्रमण झाल्याने जगाचा विनाश झालेला दाखविला आहे. तर १९०१ साली प्रसिद्ध झालेल्या एम. पी. शिल याच्या 'दि पर्पल क्लाऊड' या कादंबरीत धरणीकंपामुळे वातावरणात पसरलेल्या विषारी वायूने जगाचा विनाश झालेला दाखविलेला आहे. त्यानंतर १९१२ साली, जॅक लंडनने आपल्या 'दि सिक्रेट प्लेग' या कादंबरीत प्लेगसारख्या महाभयंकर रोगाने जगाचा नाश केल्याचे दाखविले आहे.

निदान इंग्लंडपुरते तरी एकूणच १९ वे शतक वैज्ञानिक कादंबरीच्या क्षेत्रात, विनाशाच्या संकल्पनेने भारलेले दिसते. त्या काळात एकामागून एक ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तींचा तर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा परिणाम नसावा ? धूमकेतू व उल्कापात यांनी या शतकात नुसता उच्छाद मांडला होता. या शतकात प्रसिद्ध झालेल्या विनाश कथांची दोन प्रमुख वैशिष्टचे म्हणजे जगाच्या विनाशास कारणीभूत ठरलेल्या कारणांची विविधता आणि विनाशामागे कुठलीही दैवी योजना नसून तो केवळ एक अपघात आहे या सिद्धांताचे प्रतिपादन. त्यामुळे या विज्ञान कथांनी वाचकांच्या मनावरील धर्मभावनेचा पगडा-पापपुण्याच्या कल्पना यांची पकड ढिली करण्यास मदत केलेली आढळते.

पहिल्या महायुद्धानंतर लिहिल्या गेलेल्या विज्ञानकथांना, विशेषत: विनाश कथांना एक नवीन परिमाण लाभलेले दिसते. यांत विनाशाच्या तपशीलवार वर्णनासोबतच त्यामुळे घडून येणाऱ्या सामाजिक गोंधळाचे व संकटकालीन परिस्थिती निवळल्यावर झालेल्या नवनिर्मितीच्या प्रयत्नांचे वर्णन आढळते. या प्रकारची विशेष उल्लेखनीय कादंबरी म्हणजे J. J. Connington ची Nordenbolt's Million ही होय. १९२३ साली प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीत, 'नायट्रोजन फिक्सिंग बॅक्टेरियात' 'म्युटेशन' झाल्याने शेतीच्या क्षेत्रात जो हा:हाकार उडतो त्यातून निर्माण सामाजिक अस्वस्थतेचे रेखीव चित्रण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे S. Fowler Wright याच्या 'Deluge' व 'Down' या कादंबऱ्यांतून धरणीकंप व अतिवृष्टी यामुळे होणाऱ्या विनाशासोबत, ही संकटे टळल्यानंतर होणाऱ्या नवसमाजनिर्मितीच्या प्रयत्नांचे देखील वर्णन आलेले आढळते.

दुसऱ्या महायुद्धानंतर लिहिल्या गेलेल्या विनाश कथांचे वेगळेपण म्हणजे यात नैसर्गिक आपत्तींऐवजी मानवनिर्मित आपत्तींचे वर्णन अधिक केलेले आढळते. उदाहरणार्थ Watter M. Miller याच्या "A Canticle For Leibowtiz" व Edgar Pangborn च्या "Davy" या कथांतून अणुयुद्धामुळे नष्ट झालेल्या जगाचे विदारक वर्णन आढळते. लोकसंख्येच्या भरमसाठ वाढीमुळे व वाढत्या प्रदूषणामुळे निर्माण झालेला मानसिक ताण व्यक्त होतो तो Harry Harrison याच्या 'Make Room ! Make Room !' व John Brunner याच्या 'Stand on Zanzibar' व 'The Sheep Look up' या धक्कादायक कथांमधून. शिवाय विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या बेजबाबदार उपयोगामुळे झालेले-नुकसानाचे वर्णन करणाऱ्या अनेक कथा या काळात लिहिल्या गेल्या आहेत.

अलिकडल्या काळात लिहिल्या गेलेल्या विनाशकथांमध्ये विशेष उल्लेखनीय म्हणजे John Wyndhams ची 'The Day of The Triffids' व John Christopher ची 'The Death of Grass' या होत. यापैकी पहिल्या कथेत अतिविशाल पण विषारी झाडामुळे जगातील सर्व लोकांना आंधळेपणाचा धोका निर्माण झाल्याचे दाखविले आहे तर दुसरीत एका भयंकर विषाणूमुळे जगातील सर्व अन्नधान्य नष्ट झाल्याने, सुसंस्कृत समाजात निर्माण झालेल्या गोंधळाचे वर्णन असून जीवनमूल्यांच्या ऱ्हासाचे चित्रण करण्यात आले आहे. एक उल्लेखनीय कथा म्हणजे फ्रेड व जिफ्रे हॉइल यांची 'दि इन्फर्नो.' ही 'कॉस्मिक रेडिएशन'मुळे होणाऱ्या भयंकर विनाशापासून वाचण्यासाठी मानवाने केलेल्या धडपडीचे चित्रण करते.

अनेक ब्रिटिश कथाकारांनी केवळ भव्य कथा किंवा साहसकथा न लिहिता किंवा केवळ घटनांवर भर न देता, मानवी स्वभावाचे जे विविध पैलू विनाशाच्या संदर्भात उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे तोच विज्ञान-कथा विकासातील महत्त्वपूर्ण टप्पा मानावा लागेल. यामुळे या साहित्य प्रकाराला एक प्रकारची प्रतिष्ठा लाभलेली आहे.

पाश्चात्य जगातील एकूण विनाशकथांचे प्रमाण बघता, त्यात ब्रिटिश लेखकांचे प्रमाण अधिक आढळते. त्यामानाने अमेरिकन लेखकांची संख्या नगण्य आहे. अमेरिकनांचा जीवनाबाबतचा आशावादी दृष्टिकोन याला कारणीभूत असावा की अमेरिकन विज्ञान कथाकारांत अद्याप प्रगल्भतेची कमतरता आहे असे मानावयाचे ? कारण काहीही असो, यामुळे ब्रिटीश विज्ञान कथेला जी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रतिष्ठा लाभलेली आहे ती अमेरिकन विज्ञानकथेला नाही हे मात्र खरे. अमेरिकन व ब्रिटिश विनाशकथांमध्ये आणखी एक गमतीदार फरक म्हणजे अमेरिकन कथांमध्ये विनाशाचे कारण बरेचदा एखादा भयंकर रोग हे असते तर ब्रिटिश कथांमध्ये हवामानात बिघाड झाल्याने विनाश घडून आलेला दाखविलेला असतो. या विनाशकथांकडे आकर्षित होणारे तिसऱ्या जगातील लेखक म्हणजे जपानी होत.

जगाच्या विनाशाचे वर्णन असलेले साहित्य लोकप्रिय असल्याचे कारण काय असू शकेल ? मानवाच्या मनात दडलेली विनाशाची सुप्त इच्छा तर असे साहित्य तृप्त करीत नसेल ? किंवा, निर्जन पृथ्वीवरील वैचित्र्यपूर्ण अवस्था किंवा औद्योगिकरणाच्या सुसंघटित समाजाच्या बंधनातून काही काळ मुक्तता-अशा विचित्र कल्पना तर त्याला अशा साहित्याकडे आकर्षित करीत नसतील ? किंवा, ज्याची आपल्याला सर्वात जास्त भीती वाटते त्या मृत्यूचे तर हे विक्षिप्त आकर्षण नसेल ?

विज्ञान कथेशिवाय विनाशाची संकल्पना लोकप्रिय होताना आढळते ती सिनेमा व दूरदर्शन वरील मालिकांमधून. उदाहरणार्थ १९७५ साली निघालेला Earthquake हा बोलपट व १९७५ ते १९७७ पर्यंत दाखविली गेलेली Survivors ही दूरदर्शन मालिका.

विनाश संकल्पनारूपी साहित्य आपल्याला एका गोष्टीची तीव्रतेने जाणीव करून देते की समाजाच्या सुसंघटित पण गुंतागुंतीच्या रचनेवर आधुनिक मानवी जीवन कसे पूर्णपणे अवलंबून आहे. आणि ही सुसंघटित चौकट ढासळल्यावर काय हाःहाकार होऊ शकतो. शिवाय विनाशानंतर, संस्कृतीचा लोप झाल्यावर परत एकदा 'बळी तो कान पिळी'चा नियम कसा परत एकदा प्रस्थापित होतो याचीही विदारक जाणीव अशा कथा परत एकदा करून देतात. ■

वार्ड नं. १, मागचंद नगर
धामणगाव रेल्वे ४४४७०९

संदर्भ :

(i) The Science-Fiction Source Book —Edited : David Wingrove (Longman)
(ii) The Encylopaedia of Seience Fiction —Edited by Peter Nichoeles
(iii) 1981 Yearbook of Science and Future —Encyclopaedia Britannica, Inc.

बृहन्महाराष्ट्रातील लेखकांकरिता—

मराठी वाचल्या जाते त्या त्या ठिकाणी युगवाणी वाचल्या जाते, वाचल्या जावे. आणि युगवाणीतून बृहन्महाराष्ट्रातले मराठी लेखनही.

बृहन्महाराष्ट्रातल्या लेखकांचे सकस मराठी लेखन त्याकरिताच युगवाणीला हवे आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वैदर्भीय कवी : या. मु. पाठक

प्रा. कृष्णा चौधरी

वैदर्भीय कविमंडळात या. मु. पाठक यांच्या कवितेने आपल्या वैशिष्टयाने एक अनन्य-साधारण स्थान निर्माण केले आहे. कविवर्य या. मु. पाठक यांचा जन्म २४ जून १९२५ रोजी चंद्रपूरला झाला व त्यांचे निधन २२ मार्च ९१ रोजी नागपूर मुक्कामी झाले. मराठी साहित्यात त्यांची प्रसिद्धी 'शशिमोहन' या काव्याचे कवी म्हणून व 'विहंगम' मासिकाचे संपादक म्हणून आहे. १९२७ साली 'शशिमोहन' लिहिल्यानंतर 'पिपळपान' हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह व 'फुलें नि मुलें' हा स्फुट बालगीतसंग्रह त्यांनी विहंगम वृंदातर्फे प्रकाशित केले. 'राष्ट्रबोध' हे बापूजी अणे यांच्यावरील चरित्रकाव्य लिहिले व 'महात्मायन' हे गांधीजीवरील महाकाव्य लिहिण्याचा संकल्प केला. त्यांच्या उपलब्ध हस्तलिखित बाडावरून त्यांनी लिहिलेल्या कवितांची संख्या जवळजवळ एक हजार आढळते. १९२५ ते १९८५ हा त्यांच्या काव्यलेखनाचा कालखंड दिसतो.

कवीचे काव्य व त्याचे व्यक्तिमत्व यात नेहमीच संबंध असतो असे नाही. परंतु या. मुं. च्या कवितेत मात्र त्यांचे काव्य व त्यांचे व्यक्तित्व यात समवाय संबंध दिसून येतो. कलावंताच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यकृतीत अपरिहार्यतेने प्रतिबिंबित होते. कलावंताच्या निर्मितीप्रक्रियेचा शोध घेणे त्यांची साहित्यनिर्मिती समजून घेतांना महत्त्वाचे असते. केशवसुत व मर्ढेकर यांनी आपल्या काव्याची जी निर्मिती-प्रक्रिया सांगितली आहे ती त्यांचे काव्य समजून घेण्याला उपयुक्त ठरते. आपली काव्यनिर्मिती-प्रक्रिया सांगतांना कवी म्हणतात.

हिमालयाच्या कुशितून जशा खळाळ येती गंगा
भाग्यवती सौभाग्यवतीच्या येती मुलें उत्संगा
आषाढाच्या मेघावलीतून सरसर वाहति धारा
माझ्या कविता सहजचि येती तशाच या आकारा

केशवसुतांनी कलावंताच्या ठिकाणी असणाऱ्या विवक्षित सौंदर्यदृष्टीमुळे विश्वाला सौंदर्यमूल्य प्राप्त होते असा विचार 'सौंदर्यातिशया अंशि वसतसे जादू करामाजि या' या ओळीत मांडलेला आहे. कवी व रसिक यांची अवस्था काव्यानंदाचा आस्वाद घेताना एकाच पातळीवर असते. कवी व रसिक यांच्यात हृदयसंवाद होत असतो. संवादाचा सुगंध सुटल्यावरच रसिकाचे हृदयाकाश सारस्वत सुगंधाने भरून येते. हा कवी व रसिक यांचा हृदयसंवाद या. मु. पाठकांनी आपल्या कवितेत व्यक्त केला आहे.

उडते; बागडते स्वच्छंदी फुलपाखरू
फुलाफुलावर
विविधत्वी समरसुनि अंतर विश्व जाहले
सारे सुंदर
नजरेची यक्षिणी फिरतसे माझी
जेव्हा वस्तुवस्तुवर
जडामध्ये चैतन्य खेळते साक्षात्कारच
दे परमेश्वर

त्यांची काव्यनिर्मितीची प्रक्रिया स्वयंभू, उत्स्फूर्त व नैसर्गिक आहे.

विद्युतवेगे ये विषय सवे पहिला चरण
मागे धावतात ओळी माझे सर्वस्व शरण
सहजप्राप्त हा स्वधर्म माझ्या
ठायी नित्य ठेला
शिकवावे कुणाला गे माता पाजते मुलाला.

निसर्गातील वस्तुघटकांवर कवीच्या दृष्टीची यक्षिणी फिरली की जडातही अद्भुत सौंदर्य निर्माण होते. आई मुलाला सहजतेने पाजते तशीच आपली काव्यनिर्मिती प्रक्रिया नैसर्गिक आहे असे कवीने सांगितले आहे. 'शिशिरागम' या कवितेतील चाफ्याच्या वर्णनात कवीची अशीच सौंदर्यदृष्टी व्यक्त झाली आहे. 'शिशिर' चापट चिपळ्या घेऊन पांडुरंगास आळवीत आहे.

चाफा तर पूर्ण नग्न वन्यपुरुष आणि
वेळू पिवळा पिवळा बुद्धभिक्षु कोणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणिक चापट चिपळघा घेऊनि शिशिर
वारकरी आळवितो पांडुरंगजीस !

'संध्येचा न्हात्या' या कवितेत असाच एक अनुभव संवेदनप्रतिमांच्या रंगरूपासह साकार झाला आहे. इथल्या अनुभवानेच आपले स्वत:चे रंगरूप निवडले आहे. कवितेच्या शेवटी आपल्या प्रिय सखीचे झालेले स्मरण हृदयाला थेट जाऊन भिडणारे आहे.

अंधार पसरता हुरहुरते भवितव्य
हे दीप ? तिच्या ते डोळ्यामधले आसू
की स्मरता मजला हाय प्रियतमा माझी
काळोख दाटला जरि सौंदर्य पिपासू ?

वयाच्या चौरेचाळीसाव्या वर्षी त्यांच्या प्रेमळ पत्नीचे-नलिनीचे निधन झाले. नियतीच्या या क्रूर व कठोर आघातांनी त्यांची कविता साकारली.

राजाराणी मिरवित होतो
पथिक वळून पाहे जो तो
....आज भिकाऱ्यांचा जोडा
बघून जीव थोडा थोडा....

या कवितेतील अल्पाक्षररमणीयत्व व विरोधलयीतील संवेदनप्रतिमांची वीण लक्षणीय आहे. कविवर्य पाठकांची शैली चित्रमयी आहे. एका कवितेत आपल्या पत्नीचे-नलिनीचे चित्र त्यांनी हुबेहूब रेखाटले आहे.

नीटनेटका भांग मधोमध
निटिलावर नित रवीचा उदय
दो बाजूस तरि तारापुंज
घनमालेतून कसे निसटले
अभिनव सौंदर्याचा विस्मय !
सरल नासिका इवली जिवणी
कवळे कवळे तांबुस ओठ
निंबाचे नव तांबुस किसलय
करांगुळी कमळाचे देठ
नकळत त्यावर फिरत राहाते
विशाल काळे भोर. नयन अन
पलक तयाचे वर थरथरते

'जन्मोजन्मीचे चिरमीलन' या कवितेत विरहाचा दाहक अनुभव व तिच्या स्मृतींचे स्वप्नील वास्तव प्रकट झाले आहे. जीवनात साथ करणारी पंचपंच प्राणांची मैना अर्ध्या वाटेवरूनच उडून गेली. मृत्यूनंतर तरी तिची भेट होईल या आशेने कवी जगत राहिला. व्यावहारिक कर्तव्ये पार पाडताना दिवस कसातरी निघून जातो. पण रात्र मात्र सरता सरत नाही.

दुःख एकलेपणाचे
हाय ! जागते मरण
केव्हा दिवसाची आग
पेटवील हे सरण !

या. मु. पाठकांची काव्यविषयक जाणीव आत्मनिष्ठेतून वस्तुनिष्ठेकडे अशी सतत परिवर्तित होतांना दिसते. बालपणात त्यांच्या कवितेने शैशवाची गाणी गायिली, यौवतात शृंगार व प्रणयभावनांचा आविष्कार केला. जीवनाच्या संध्याकाळी तर ती एखाद्या प्रौढ पुरंध्रीप्रमाणे परिणतप्रज्ञ व धीरगंभीर झाली. तिच्या काव्यानुभवाला आविष्काराचे नवे नवे अंकूर फुटायला लागले. विरहाचे दाहक दुःख व्यक्त करणारी पाठकांची कविता विश्वसंवेदनप्रतिमांशी व वैश्विक जाणिवेशी तादात्म्यता साधायला लागली. विज्ञानाने मानवी जीवन समृद्ध झाले पण त्याच्या क्रूर संहारक शक्तीने मानवी संहार-विनाशाचे एक नवे आव्हान उभे राहिले तेव्हा कवीची मानव्यावरील श्रद्धा आपल्या कवितेत प्रकट झाली.

प्रलयाच्या अग्न्यस्त्रावरती
जलास्त्र माझे शब्दफवारें
कल्पांताच्या महासागरा
दाखवीन मी नवे किनारे

'अग्निकमळ' या कवितेत धगधगीत अंतराळातून व रक्तमासचिखलातून जन्माला आलेल्या विश्वाचे वर्णन आले आहे. मानवी बुद्धी जिथे थिटी पडते तिथूनच हरित सुंदरता घेऊन सेहस्रदलाने अग्निकमळ जन्माला येते. अग्निकमळाच्या प्रतिकातून कवीने विश्वाच्या सृजनशीलतेचे व संहाराचे सृष्टीच्या मूळाशी असणाऱ्या सनातन आदितत्त्वाचे-विश्वतत्त्वाचे दर्शन घडविले आहे.

कवीची स्वप्निल जाणीव कमी होऊन पुढे त्याला जीवनाच्या सत्याचा ध्यास लागला. केवळ मृग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जळाच्या–रोहिणीच्या पाण्याने आपली तृषा शांत करण्याचे दिवस संपले. अंतरीचा एक डोळा विश्वखोली पाहायला लागला तर मन लौकिक जीवनातील अतृप्त इच्छाआकांक्षांची होळी पाहायला लागले.

वारुणीचे स्वप्न माझ्या यायचे ओठांत नाही
रोहिणीचे जल कधीही जायचे पोटात नाही
गुंगविती नच मनाला आज केवळ काव्यविभ्रम
शोध सत्याचा हवासा कल्पनेचे व्यर्थ संभ्रम

'मृत्यूजीवनसंगीत' या कवितेत कवीचा पार्थिवतेकडून अपार्थिवाकडे जाण्याचा प्रवासाचा आलेखच उमटला आहे.

एक चरण क्रांतीत आणखी
दुसरा माझा उत्क्रांतीत
असा चाललो बदलत मी स्थित
गात मृत्यु–जीवन संगीत !

'जीवननृत्यामधे रंगलो' या कवितेत स्वतः दुःख पिऊनही जगाला आनंद देणाऱ्या केशवसुतांच्या 'अमुचा पेला, दुःखाचा' या ओळींचे स्मरण होते.

विष पिऊनी मी स्वये गटगटा
वाहवीन अमृतकल्लोळ
त्याच सुधेचा बिंदु बिंदु
टिपेल माझी ओळ न् ओळ
मूक आर्तता बनल्या कविता
सर्वांचा सांगाती मी
आज पेटल्या हृदयी लावीन
अवति भवती वाती मी.

'जन्म' या कवितेत विलक्षण चित्तथरारक अनुभव कवीने आपल्या कल्पनावैभवाने कसा सौंदर्यानुरूप रेखाटला आहे.

अग्निचक्रातून आली कोवळी चिनगार एक
तप्त वीणेतून आली मंजुशी झंकार एक
स्फूर्त काव्यातून आला गुंगविता चरण एक
विश्वदारातून आला हा अनोखा किरण एक
मध्यरात्रीतून आला सांद्रसा मल्हार एक
जगधनुष्यातून सुटला कमलतंतु बाण एक
निर्मिती उद्रेक एक, नवयुगाचा अश्रुसेक
हा नवा आरंभ एक
अण्वस्त्रशक्तीला नवे अव्याजसे
आव्हान एक
मायवणीचा प्राण एक, माउलीचा प्राण एक

या. मु पाठकांच्या कवितेत सामाजिक जाणिवेचेही दर्शन घडते. उदंड मानवतेच्या प्रेरणेने त्यांची कविता साकारल्यामुळे पृथ्वीवर एकही मनुष्य उपाशी असेल तोवर अन्यायाविरुद्ध बंड चालूच राहिले पाहिजे असे कवीला वाटते. स्वातंत्र्यप्राप्ती होऊनही एका म्हाताऱ्या मोलकरणीला पोटासाठी कष्ट उपसावे लागतात.

उलटया गुडघ्यांना आणि
क्षितिजाला त्यामधून
बघणारे तिचे धनुष्याकृती म्हातारपण
तरीही अजून मोलमजुरीचे जीवन
जीवनाचे धगधगते प्रश्न चिन्ह !

उत्कृष्ट कवीची काव्याची भाषा ही प्रतिमेची भाषा असते. बाह्यवस्तूजातातील घटनांची व प्रसंगाची कवीच्या अंतर्मनात एक खोल सौंदर्यपूर्ण व अर्थपूर्ण भावनासंगती काव्यानुभवातून व्यक्त होते. ही प्रचीती जितकी खोल व व्यापक तितकीच कवीची कविता प्रत्ययकारी व व्यामिश्र होते. अशा वेळी सामाजिक जाणीव व सौंदर्यवादी जाणीव असे वर्गीकरण करणेही कलाकृतीवर अन्याय करणारे ठरते. साहित्यकृतीतील मूळ अनुबंधाचे स्वरूप त्यामुळे शोधल्या जात नाही. क्वचित अशी लेबले काव्यानुभवावर प्रकाश न टाकता निर्जीव शवविच्छेदन मात्र करीत असतात. म्हणूनच कलाकृतीतील भावानुभवाकडे प्राणिसदृश एकात्मतेच्या दृष्टिकोणातून पाहावे लागते.

काव्यानंद हा कवीच्या व्यक्तित्वाचा आविष्कार नसून तो कवीच्या व्यक्तित्व–विलोपणाचा आनंद असतो. असे इलियट म्हणतो ते या. मुं. च्या कवितेलाही तंतोतंत लागू पडते. 'वेदनांच्या आज माझ्या थांबल्या साऱ्या कळा' व 'धुंद चांदणे' या कवितात असाच मुक्तीचा आनंद काठोकाठ भरून वाहत आहे. या. मु. पाठकांच्या दृष्टीने त्यांचा पिंड अध्यात्मनिष्ठ मानवतावादी असल्यामुळे जग आनंदरूप आहे.

असे कसे चहुकडे अनंत रंग रंगले
हरित चहुदूर धरा, कृष्ण वरि तरंगले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रंग रंग बघून दंग, नयन नयन नाहले
अंतरंग हंसत हंसत, विश्व सुखचि जाहले
हा सुवास, हे निवास, गंध गंध मधुर धुंद
मोहरले मन पिऊन निशिगंधाचा मरंद
हे गुलाल विविधरूप सौंदर्यचि मूर्तिमंत
जग हे आनंदरूप भगवंताचे आदिअंत

या. मु. पाठकांच्या कवितेचे हे ओझरते दर्शन ! त्यांनी स्वतःच म्हटल्याप्रमाणे जिवंत आत्मनिष्ठ प्रतीतूनच ब्रह्मांडाचा साक्षात्कार कवीला होतो. या. मुं. ची कविता स्वानुभूतीपूर्ण आत्मनिष्ठेतून व्यापक वस्तुनिष्ठेकडे असा प्रवास करीत आहे.

■

रामटेक

'युगवाणी' मिळत नाही !

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. तसेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. आपणाकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या महिन्याचा अंक असतो त्याच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा आर्थिक अडचणी, कार्यालयीन समस्या, व पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, **प्रथम** आपल्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा—लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- **अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो नक्कीच पाठविण्यात येईल.**
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया काळजी घ्यावी, शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा, संस्थेचा / कार्यालयाचा देऊ नये.
- आपली वर्गणी संपलेली नाही ना ? आपले नाव नियमित सभासदांच्या / वर्गणीदारांच्या यादीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद / वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऋणानुबंध

पंकज कुरुलकर

• कथा

मी ही अशी बाबांच्या फोटोसमोर उभी आहे छोटा बाळही त्यांच्या फोटोकडे कुतुहलाने बघतो आहे असे उगीचच वाटते आहे. त्याची अजून नीट मानही धरलेली नाही. दवाखान्यात सुरुवातीलाच कोणीतरी म्हणाले होते. आजोबां-सारखाच वाटतो आहे, दुसरे बाबाच आहेत जणू ! त्यावेळी त्या बोलण्याचा संदर्भ नीटसा समजला नव्हता. तो आता समजतो आहे. बाबांचा हा फोटोही सुरेखच आला आहे. निताच्या-माझ्या नणंदेच्या लग्नातील आहे. छानसा सूट घातला आहे व एकदम रुबाबदार दिसत आहेत, त्यांना टाय-सूट घालण्याचे पहिल्यापासूनच वेड आहे असे सौमित्रही म्हणत होता. त्याने बाबांचे जुने कॉलेजमधील फोटोही दाखवले होते. तेव्हाही समारंभाला वगैरे त्यांनी टाय घातलेला होता. मिताच्या लग्नात ते रुबाबातच होते. एकुलती एक मुलगी व लाडकी. जावई मनासारखा मिळा-लेला. त्या लग्नातच मी त्यांना एवढे रुबाबात बघितले. त्यानंतर त्यांची प्रकृती ढासळतच गेली. एखाद्या अभेद्य किल्ल्याला खिंडार पडत जावे तसे होत गेले ते सर्वच क्लेशदायक होते.

मी ही अशी बाबांच्या फोटोसमोर उभी आहे आणि या सर्व गोष्टींचा विचार करते आहे. काहीसे गोंधळून गेल्यासारखे वाटते आहे, आमच्या ऋणानुबंधाचा विचार करते आहे, नातेसंबंधाचा विचार करते आहे. सगळ्याच गोष्टींची उत्तरे मिळतात असे नाही. मन संभ्रमात पडते आणि डोकं बधीर होऊन जाते. बाबा माझे सासरे. ते आज आमच्यात नाहीत व आता मी त्या गोष्टींचा गंभीरपणे विचार करते आहे. ते असताना का केला नाही ? माणूस असेपर्यंत त्याची विशेष किंमत असत नाही का ? तसेच असावे बहुतेक.

आठ वर्षांपूर्वी मी ह्या घरात बाबांची सून, सौमित्रची बायको म्हणून आले. बाबांनी मला बघित-लेच नव्हते. सौमित्रने बघितले व लगेच पसंत केले. बाबांची फिरतीची नोकरी. त्यांनी मला काही बघितले नाही. त्याआधीच सौमित्रने त्यांना मी पसंत असल्याचे कळवून टाकले होते. बाबांनी त्याला विरोध दर्शवल्याचे नंतरही कधी ऐकले नाही. त्याच्यावतीने बोलणीही सौमित्रच्या मामांनी केली. बाबांनी मला प्रथम पाहिले ते आमच्या साखरपुड्यातच. प्रथमदर्शनीच जाणवले ते त्यांचे धारदार व मोठे नाक. ते महत्त्वाकांक्षी असावेत असे वाटत होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची जरब होती व एकूण व्यक्तिमत्त्वच ते उच्च दर्जाचे अधिकारी असावेत हे जाणवून देत होते. मला त्यांनी भरभरून आशीर्वाद दिला तेव्हा मी मनोमन सुखावले.

लग्न होऊन घरी आले तेव्हा एका बाबतीत माझा मोठाच अपेक्षाभंग झाला. सहजपणे बसलेलो असताना सौमित्रने त्याची सेव्हिंग किती आहे हे सांगितले. मला धक्काच बसला. सेव्हींग नावा-लाच होती. बँकेत फारसे पैसे नव्हतेच. एवढा मोठा इंजिनीयर व चांगल्या कंपनीत नोकरी तरीसुद्धा एवढीच सेव्हींग होती. माझ्या माहेरी पैसा, बचत याचे सर्वांनाच महत्त्व माहिती आहे. मी त्याच संस्कारात वाढले. पैसा व्यवस्थित कसा वापरायचा ह्याचे मला त्या संस्कारातून ज्ञान आले असावे. नंतर सौमित्रने सांगितले की बाबांची सेव्हींगसुद्धा विशेष नाही. एवढेच नाही तर त्याच्या लग्नात बाबांना कंपनीकडून थोडेफार कर्जही काढावे लागले होते. मी चकितच झाले. हे घर असे कसे चालवले जाते हा प्रश्न मला पडला. एकूण हे कुटुंब आर्थिक बेशिस्तीचे आहे, नियोजन यांना मान्य नाही व आहे तेव्हा ह्यांना पैसा खर्च करायला आवडतो हे माझ्या लक्षात आले. 'बडा घर, पोकळ वासा' अशी काहीशी यांची अवस्था होती. मी सौमित्रकडे माझी नाराजी उघडपणे व्यक्त केली व आपण बचत केली तरच पुढील आयुष्य सुखकारक जाईल हे सांगितले. सौमित्रला ते तितकेसे पटलेले दिसले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. शेवटी त्यांच्यावरील संस्काराचा प्रश्न होताच. मी मात्र तेव्हाच ह्यांना शिस्त लावायची हे मनात ठरवले होते.

माझी व बाबांची काहीशी चकमक पहिल्यांदा उडाली ती रंगीत टीव्हीच्या खरेदीवरून. नुकतेच रंगीत टीव्ही येऊ लागले होते व घरी कुठलाच टीव्ही नव्हता. टीव्हीवर चांगला कार्यक्रम असला की शेजारी आग्रह करून आम्हाला कार्यक्रम बघण्यासाठी बोलवायचे. मग आम्हाला सर्वांनाच अवघडल्यासारखे व्हायचे. मग घरात टीव्ही विकत घेण्यासाठी चर्चा सुरू झाली. घराचे हे एक वैशिष्टच होते. कुठल्याही छोट्या गोष्टीसाठी रात्री जेवताना टेबलावर चर्चा व्हायची, वाद रंगायचे. नको त्या गोष्टी काथाकूट केला जायचा. टीव्ही घेण्याआधी बरेच दिवस चर्चा चाललेली होती. मला एकूण बोलणे कमीच मी फारशी चर्चेत भाग घेत नव्हतेच एकूण आर्थिक स्थिती बघता रंगीत टीव्ही घेणे आवाक्याबाहेरचे दिसत होते. अंथरूण पाहून हातपाय पसरावे असा अभिप्राय मी दिला. बाबांना तो बिलकूल आवडला नसावा. जमाना रंगीत टीव्हीचा असताना आता साधा टीव्ही घ्यायचा मग जेव्हा ऐपत येईल तेव्हा रंगीत टीव्ही घ्यायचा हे धोरण त्यांना मान्य नव्हते. त्यापेक्षा हप्त्यांवर रंगीत टीव्ही घेऊ असे त्यांचे मत पडले. तीन वर्षांनी ऐपत आली तर तेव्हा कदाचित रंगीत टीव्ही महागही झाला असेल असे त्यांचे म्हणणे होते. हप्ते प्रकरण मला आवडत नाही हे माझे मत मी स्पष्ट सांगितले बाबा नाराज झाले आहेत असे वाटले पण त्यांनी शेवटी त्यांचाच हट्ट पूर्ण केला. आमच्या घरी रंगीत टीव्ही आला. सौमित्रही मला म्हणाला, 'एवढ्या स्पष्ट शब्दात तुझे मत व्यक्त करण्याची गरज नव्हती.' माझे आधीचेच कमी बोलणे आणखीनच कमी झाले.

बाबांचा स्वभाव त्यांना पाहिजे तेच करण्याचा होता. घरातील दिवाणखान्याच्या सजावटीपासून आईंना किती पैसे दिले ह्यापर्यंत त्यांचे बारीक लक्ष असायचे. आईंना त्याची सवय होती. आई त्यांच्या बहुतेक सर्व गोष्टीच ऐकायच्या. अर्थात त्या पिढीच्या बायकांना ते साजेसेच होते. घर सजवण्याची मला विशेष आवड नसली तरी घराबद्दलच्या माझ्याही काही कल्पना होत्या. दिवाणखाण्यात साधे लाकडी टेबल ठेवणे ही कल्पनाच मला पसंत नव्हती. पण बाबांनी ते ठेवले. फोन ठेवण्यासाठी, अधून मधून लिहिण्याचे काम करण्यासाठी त्यांना ते आवश्यक वाटत होते. मला ते विसंगत वाटत होते. मोठ्यांचा अनादर करणे माझ्या रक्तात नाहीच. मला बाबांचे आवडले नाही तरी काही बोलले नाही. माझी नाराजी सौमित्रजवळ व्यक्त करायला मात्र विसरले नाही. सौमित्रची होणारी तारांबळ मला दिसत होती. सौमित्र एरव्हीही शांत आणि सौम्य. हळू आवाजात कमी बोलणारा. त्याने मला नुसते थोपटले. बाबांना विरोध करणे मला जमणारे नाही गं, त्याच्या स्वरात अगतिकता दिसत होती. सौमित्रचा स्वभाव कोणालाच व दुखवणारा होता. माझ्यासाठी तो बाबांना दुखवेल हे संभवत नव्हते व अर्थात मलाही ते तितकेसे रुचणारे नव्हते. बाबा हे उत्तम काळजीवाहक होते. सगळ्यांबद्दलच चांगलेपणाची भावना, कळकळ, काळजी घेण्याचा प्रयत्न हे स्पष्टपणे दिसणारे होते. कदाचित त्यामुळे मला ते 'थेअरीटकल' वाटत असावेत. त्यांच्यात वारंवार दिसणारी भावनिकता ही एकूणच ह्या परिवाराच्या स्वभाववैशिष्टचाला साजेशी होती. एकूण हे सर्वच लोक बऱ्याच गोष्टी भावनेने घेणारे होते व मी त्यात काहीशी मिसफिट होते.

बाबांशी माझे कधीच कसले वाद झाले नाहीत. पण त्यांच्याशी जवळीकही निर्माण होऊ शकली नाही. हे असे नेमके का झाले हे सांगणे कठिण आहे. एरव्ही सासू-सुनांचे जमत नाही म्हणतात पण आईंशी माझे चांगले जमले कारण त्यांचाही स्वभाव सगळ्यांशी जमवून घेणारा, नेहमीच आश्वासक वाटणारा खेळकर व आनंदी वृत्तीचा. आईंशी मला लगेच जमले व बाबांपासून मात्र दूर राहिले. काहीशी अलिप्त, तटस्थ, निर्विकार, मी त्यांच्याशी वाद टाळण्यासाठी बोलण्याचेच कमी केले. घरच्या सर्वच लोकांच्या ते हळूहळू लक्ष्यात आले. सौमित्रच्या तर लगेचच लक्ष्यात आले.

'आजकाल तू बाबांशी बोलण्याचे टाळतेस का ?'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नाही असे नाही पण त्यांच्या आवडनिवडी वेगळ्या, त्यांच्या घराच्या कल्पना वेगळ्या. ह्या घराचे ते काळजीवाहक मग आपण त्यात लुडबूड कशाला करा ? व तशी त्यांना आवडतही नाही. मी बोलले तर उगीचच वाद होईल असे वाटते त्यापेक्षा न बोललेले चांगले नाही का ?' मी सौमित्रला पटवण्याचा प्रयत्न केला. त्याला ते पटले की नाही कुणास ठाऊक पण पण तो गप्पच बसला.

मिताचे लग्न चांगलेपणाने पार पडले व मला वाटले त्यांच्या आजाराला सुरुवात झाली. त्यांना अचानकपणे थकवा जाणवू लागला. एखादा मजला जिना चढला तरी दम लागू लागला. बोलताना ते दम घेऊन बोलू लागले. वागणे-बोलणे-चालणे सर्व गोष्टींमधेच सावकाशपणा जाणवू लागला. आमच्याही ह्या सर्व गोष्टी लक्षात यायला बरेच दिवस लागले. एक दिवस ते ऑफिसमधून लवकरच घरी आले तेव्हा मी नेमकी एकटी घरी होते. त्यांना बरे नाही हे स्पष्ट दिसत होते ते खूप थकल्यासारखे वाटत होते. काहीसा घामही आला होता. खूप अस्वस्थ वाटत होते. घरी आई नाहीत म्हणून ते आणखीनच अस्वस्थ झाले होते. मी आमच्या फॅमिली डॉक्टरला लगेच घरी येण्यास फोन-वरून सांगितले. ते आले. बाबांना त्यांनी तपासले तेव्हा प्रथमच आम्हाला कळाले की त्यांना लो-ब्लडप्रेशर आहे. डॉक्टरांनी सांगितले की काळ-जीचे कारण नाही पण दगदग टाळली पाहिजे. दोन दिवस घरी आराम करायला हवा. आई बाहेर कामासाठी गेल्या होत्या. त्यांना आल्यावर हा प्रकार कळला. बाबा त्यांना सांगत होते 'अग, आमच्या सुनेने आमची सगळी काळजी घेतली. तुमची कमतरता भासू दिली नाही. खूप बरे वाटते.' त्यांना आजाराच्या दुःखापेक्षा ह्याचा आनंद झालेला दिसत होता. मलाही बरे वाटले.

ब्लडप्रेशरसारखे आजार मागे लागले की ते आयुष्यभर साथ सोडत नाहीत. बाबांच्या मागे हा आजार लागला होता. मुंबई त्यांना एरव्हीही कधी आवडली नाही. निवृत्तीनंतर पुण्याला जाऊन राहायचे त्यांनी कधीच ठरवले होते. पुण्याला त्यांचा फ्लॅटही होताच. एकदा रात्री सहज बोल-ताना सौमित्र म्हणाला, 'बाबा, आता तुम्ही निवृत्ती घ्या. ही दगदग तुम्हाला सहन होत नाही. अजून दीड वर्षानं निवृत्त व्हायचे आहेच. निवृत्तीचे जे फायदे तेव्हा मिळणार आहेत ते आताही मिळतील. तब्बेतीला जपणे जास्त मह-त्वाचे आहे !' बाबांना सौमित्रचे म्हणणे पटले नाही. त्यांचे ऑफिसवर प्रेम होतेच. त्यांनी एक गोष्ट सांगितली नाही तरी आम्हाला माहिती होती. ती म्हणजे त्यांना जनरल मॅनेजर बनून निवृत्त व्हायचे होते व ते त्या पदासाठी कधीचेच डयू झाले होते तरी अजून त्यांना ते पद देण्यात आले नव्हते. बाबांना त्या पदाचे मिळणारे फायदे आजही होते असे म्हणता येणार नाही पण ते एकूणच करिअरीस्ट होते व करिअरीस्ट माण-साने महत्त्वाकांक्षी असण्यात काहीच गैर नव्हते.

बाबांना हा आजार मागे लागल्यापासून ते घरातील चर्चांमधे वगैरे कमीच भाग घेऊ लागले. मुख्य म्हणजे ते आमच्याबरोबर रात्री मुख्य जेवणाच्या टेबलावर बसून जेवणे टाळू लागले. त्यांचे ताट ते बाहेरच्या खोलीत घेऊन स्टुलवर ठेवायचे व दिवाणावर बसून जेवू लागले. त्यांना चर्चा, वाद टाळायचे असावेत. पूर्वी जेवणाच्या टेबलावर ते हमखास सौमित्रला विचारायचे, 'काय सौमित्र, मग आम्हाला नातू कधी येणार ? आम्हाला नातसुद्धा चालते. अरे कसले बोड-क्याचे एवढे वर्ष प्लॅनिंग करता ? लोकसंख्या वाढीचे तुम्हालाच पडलें आहे काय ? आम्हा म्हातारा-म्हातारीला नातवाला खेळवण्याचा आनंद तरी मिळू द्या' सौमित्र त्यांना शांतपणे म्हणायचा, 'बाबा, हा विषय काढायलाच हवा कां ? आमच्या दोघांमधे हा विषय राहू द्या की !'

'अरे वा, असे कधी झाले आहे का ? आम्हाला एवढे सुख मिळवून देणे तर तुमच्याच हातात आहे.' मग सौमित्रच गप्प बसायचा. आमचे मूल होऊ न देण्याचे प्लॅनिंग फारतर लग्नानंतर वर्षभर असेल पण त्यानंतर ते काही टिकले नाही. लग्नाला सहा वर्षं होऊन गेली तरी आम्हाला मूल झाले नव्हते तेही खरे. दोष कोणातच नव्हता. दोघांनीही डॉक्टरांकडून तपासणी करून घेतली

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होती. डॉक्टरांनी असा कधीकधी उशीर होतो, असे सांगितले होते. कारण कुठलेच नव्हते पण बाबांपेक्षा जास्त मी त्याची वाट बघत होते. प्रत्येक वेळी सौमित्रशी रत होताना वाटायचे हेंच खरे मीलन झाले. ह्या वेळेला नक्कीच यश मिळणार. आमची रतिक्रिडा अगदी रंगायची. दोघंही भान हरपून एकमेकांचे होऊन जायचो. पूर्ण समाधान मिळायचे. कुठे चुकत होते हेच कळत नव्हते पण ही परिस्थिती कायम होती. उशीर होऊ लागला तशी मी अस्वस्थ होत होते. एक दिवस सौमित्रला मी म्हटले, 'आपण आणखी कुठल्या तरी डॉक्टरला दाखवून, कुठले तरी उपचार करू. पण मला मूल हवे आहे.' क्षणभर सौमित्र माझ्याकडे बघतच राहिला.

'वेडाबाई, मूल नसले तर काय बिघडते ? मूल नसणारे आपण पहिलेच जोडपं थोडीच आहोत ? आणि एवढेच असेल तर एखादे मूल आपण सांभाळू शकतो आणि एवढया टोकालाही जायची गरज नाही. कारण आता कुठे सहा वर्षे झाली आहेत आपल्या लग्नाला !

'तुझं म्हणणं मला पटतं रे. पण आजकाल माझंच मनं सैरभैर होऊन जाते. मग काही सुचत नाही.' मग सौमित्र मला थोपटत राहिला. सौमित्र हा नेहमी प्रौढासारखा वागतो. याच्या भावना तो नेहमीच काबूत ठेवतो. मला मात्र ते जड जाते.

—आणि एक दिवस ती बातमी आली. गेल्या कित्येक वर्षांपासूनच त्याचाच इंतजार होता. मला मूल होणार होते. मला गर्भ राहिला होता. मला खूप आनंद झाला होता. मी सौमित्रला ती बातमी सांगितली. सौमित्रलाही आनंद झाला पण कुठलीही भावना फार ठळकपणे प्रगट करणे त्याच्या स्वभावात नव्हतेच. त्याचे माझ्या केसांवरून हात फिरवला व हळुवार चुंबन घेतले. 'आता खूप काळजी घेतली पाहिजे' एवढेच म्हणाला.

रात्री जेवताना टेबलवर सौमित्रने ही बातमी सांगितली. अप्पा एकटे स्टुलवर ताट ठेवून जेवत बसले होते. त्यांनाही हे ऐकू गेले. एकटेपणाने जेवत असताना क्षणार्धात त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

'असं, आम्ही आजोबा बनणार तर, मग जरा साखर आण. माझ्या हाताने सुनबाईला साखर देतो' त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद लपत नव्हता. आईंनी त्यांना साखर दिल्यावर अगदी तरुणाप्रमाणे जोशपूर्ण आवाजात ते म्हणाले, 'आता तुम्ही आजी बनणार आहात.' त्यांनी आईंनाही साखर भरवली व मलाही, मला लाजून गेल्यासारखे झाले होते. 'कॉंग्रेट्स सौमित्र' म्हणून सौमित्रचा हात त्यांनी जोराने दाबला. आईंना माझी काळजी घेण्याबद्दल सांगितले.

दुसऱ्याच दिवशी ते घडले. बाबा मिताकडे गेले होते. तिला आमची बातमी सांगायची होती व बऱ्याच दिवसात जावयांची भेट झालेली नव्हती. भेटून रात्री परत आले तर त्यांना खूप घाम आलेला. त्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड थकवा दिसत होता. मिताचे घर होतेही तिसऱ्या मजल्यावर व लिफ्टही नव्हती. त्यांना काही बोलणे अवघड जात होते. पाच मिनीट ते तसेच बसून होते. मग थोडे बरे असल्याचे त्यांनी हाताने खूण केली. आम्हा सर्वांना मात्र काळजी वाटत होती. आई घाबरून गेल्या होत्या. थोडया वेळाने तेच म्हणाले, 'विशेष काही झाले नाही गं. दम लागला एवढेच. एवढया दूर ट्रेनने जाऊन आलो म्हणून असे झाले असेल. चिंतेचं काही कारण नाही !'

'असं नाही. उद्या आपण डॉक्टरांकडे जाऊन एकदा चेकअप करू !' मग बाबा काही बोलले नाहीत.

दुसऱ्या रात्री जेवणाच्या टेबलावर आई गंभीर दिसत होत्या. सौमित्रने त्यांना डॉक्टरांनी काय सांगितले म्हणून विचारले. त्यांची तब्येत चांगली नाही, त्यांना कार्डिअॅक प्रॉब्लेम आहे व हे त्यांना माहिती होते. डॉक्टरांनी इकोकार्डिओग्राफी केली. त्याचे रिझल्टसुद्धा फारसे चांगले नाहीत. त्यांची प्रकृती बघून डॉक्टरांनी स्ट्रेट टेस्ट सध्या नको म्हणून सांगितले. डॉक्टर या वयात अॅंजीओग्राफी किंवा बायपास सर्जरी करावी ह्या मताचे नाहीत. ह्यांचाही त्याला विरोध आहे. एकूण वातावरणच गंभीर झाले. सौमित्र म्हणाला 'बाबा डॉक्टरांचे मत बायपास सर्जरी करावी असे असेल तर आपण करू. पैशाची चिंता करू नका.'

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'अरे हे डॉक्टर बऱ्याच वेळा पैसे उकळण्यासाठी बायपास सर्जरी करायला सांगतात. आणि माझे वय अठ्ठावन होत आले. बायपास केल्याने माझे असे किती आयुष्य वाढणार आहे? आणि माझे आयुष्य तेवढे किमती तरी आहे का! लाख रुपये आपल्याला का जास्त झाले आहेत? सुनबाईंना विचार.'

त्यांचे बोलणे ऐकून सर्वांच्याच डोळयात पाणी आले. मला तर ते बोलणे विशेष लागले.

'नाही बाबा, आम्हाला पैसे जास्त नाहीत. आमच्यापुढे आयुष्य आहे ते पैसे आम्ही कधीच मिळवू शकू. आम्हाला तुम्ही महत्त्वाचे आहात!' माझ्या बोलण्याचे बाबांना बरे वाटले असावे. त्यांनी फक्त हाताने ठीक आहे म्हटले.

माझे दिवस भरत चालले होते आणि बाबांची तब्येत खराब होत चालली होती. माझी घरात काळजी तर घेतली जात होतीच. मला आई नसल्यामुळे बाळंतपण इकडेच करणार होते. गेल्या काही महिन्यात मी आणि आई मानसिकदृष्टया आणखी जवळ येत चाललेच होतो. आई माझी सर्व प्रकारची काळजी घेत होत्या. कुठलेही काम करू देत नव्हत्या. खरे तर बाबांकडे व माझ्याकडे बघताना त्यांना थकायला होत होते. एक दिवस त्या मला म्हणाल्या, 'बाबा आमची जुनी आठवण काढत होते, सौमित्रच्या वेळेला मी गरोदर होते तेव्हा ते कामानिमित्त बाहेरच असायचे. आले की रात्री पोटाला कान लावायचे आणि म्हणायचे, बाळाच्या थोढीने काम लवकर संपवून आलो तो आनंद व्यक्त करतो आहे. सौमित्र नाव त्यांनीच ठेवले. कलकत्यात कुठेतरी त्यांनी हे नाव ऐकले व हेच नाव ठेवायचे ठरवले. ते म्हणत होते की आता सौमित्रसुद्धा पोटाला कान लावत असेल का ग?'

मला त्यांच्या बोलण्याने लाजल्यासारखे झाले.

एक दिवस बाबांनी त्यांना प्रमोशन मिळाल्याचे सांगितले. त्यांची कित्येक वर्षांची इच्छा पूर्ण झाली होती. ते एकदम खुशीत दिसत होते. निवृत्त व्हायला दीड महिना उरलेला असताना ही घटना घडली होती. बाबांनी पेढे वाटले. त्यांच्या आनंदात आम्हीसुद्धा सहभागी झालो. त्या दिवशी ते एकदम आनंदित होते पण एरव्ही त्यांचे ऑफिसमधे जाणेयेणे अनियमित झाले होते. आईंना त्याचा खूप त्रास होत होता कारण ते, आईंना कुठे बाहेर जाऊ देत नव्हते. ते ऑफिसमधून कधीही घरी आले तर त्यांना आई समोर पाहिजे असायची. ते आईंवर अधिकाधिक विसंबून राहत होते. त्यांच्या प्रकृतीमुळे आम्ही सर्वच काळजीत होतो. त्यांचे औषध ते वेळेवर घेत होतेच पण फारसा फरक पडलेला दिसत नव्हता. त्यांची निवृत्ती काही दिवसांवर आली होती.

बाबा निवृत्त झाले, त्यांना त्यांच्या ऑफिसमधे भावपूर्ण सेंड ऑफ देण्यात आला. बाबांबरोबर सौमित्र व आईही गेल्या होत्या. बाबांना अगदी भरून आले होते. कंपनीशी त्यांचे प्रेमर्शीचे नाते होते. निरोपाच्या भाषणात ते म्हणाले, 'ऑफिसचा चार्ज मी देतो आहे तसाच घरचा चार्ज सौमित्रच्या हातात देत आहे. मी खऱ्या अर्थाने निवृत्त होत आहे.' नंतर सौमित्रजवळ जात ते म्हणाले, 'आमचा निवृत्तीचा निर्णय ऐकून सुनबाई खुश होतील. अरे आमचा दोघांचा स्वभाव एकसारखाच. अधिकार गाजवणारा. माझ्या निवृत्तीमुळे तिच्याकडे आपोआप अधिकार येतील. ती खुश होईल.' मग ते स्वत:शीच हसले होते.

निवृत्त झाल्याच्याच दुसऱ्या दिवशी बाबांची तब्येत अधिकच बिघडली, त्यांना दम लागू लागला. पाठ दुखू लागली. पायावर सूज आली. डॉक्टरांना लगेच बोलावले गेले. डॉक्टरांनी त्यांना त्वरित ॲडमिट करावयास सांगितले. त्यांची प्रकृती गंभीर झाली होती. सौमित्रची अवस्था विलक्षण झाली होती. माझे दिवस पूर्ण झाले होते तरी अजून हालचाल दिसत नव्हती. डॉक्टरांनी सांगितले होते दोन दिवस थांबून शक्यतोवर नैसर्गिक होऊ देत. नसेलच तर सिझर करू. मी अशी अवघडलेली पहिलटकरीण घरी बसलेली व तिकडे बाबा गंभीर अवस्थेत हॉस्पीटलमधे. सौमित्रने मलाही लगेच नर्सिंग होममधे ॲडमिट केले कारण घरी काळजी घ्यायला कोणीच नव्हते.

मी हॉस्पीटलमधे वाट बघत होते. मोकळं होण्याची. बाबांच्या प्रकृतीच्या बातमीची. सौमित्र

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मला त्यांची प्रकृती गंभीरच आहे म्हणूनच सांगत होता. मला खूप अस्वस्थ वाटत होते. तेव्हाच मला कळा सुरू झाल्या.

त्यानंतरच्या पाच दिवसात मला बाबा अत्यवस्थ असल्याचेच सांगितले जात होते. मग सौमित्रने मला सांगितले, 'बाबा काही दिवसांपूर्वीच गेले. ते गेले आणि दुसऱ्या दिवशी आपल्याला मुलगा झाला. तुला लगेच सांगणे तर शक्य नव्हते पण घरी नेण्याच्या अगोदर सांगणे भागच होते.' मला एकदम रडू लागले.

मी ही अशी बाबांच्या फोटोसमोर उभी आहे. आयुष्यात अर्थ शोधण्याची वैचारिक ताकद माझ्यात नाही. सर्व गोंधळच आहे, आई तेवढ्यात माझ्याजवळ आल्या व बाळाला घेऊन म्हणाल्या, 'अगदी बाबांसारखा दिसतो नाही ?' मी त्याच्यात बाबांना बघते ! माझ्याकडे उत्तर नव्हते. ■

५ अ-४३, जनकल्याणनगर
मार्वे रोड समोर, मालाड (प.) मुंबई ९५



अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पिंपळपान

पिंपळपानांवरच्या रेषांसारखी
तुझी माझी मैत्री
एकत्र येऊनही
समांतर रेषेत विलग होत जाणारी

पिंपळपानावरच्या ओल्या हळव्या रेषा
तुझ्या माझ्यातल्या हळव्या क्षणांसारख्या
ओलावा जपतानाही अलिप्त होत जाणाऱ्या

पिंपळपानी हरवलेलं अस्तित्व शोधताना
उकलत जातात काही सूक्ष्म तंतू
आतल्या आत मिटून जाताना
निसटून जाणाऱ्या क्षणांची
जाणीव मात्र बोचत राहते
पिंपळाचे हे गाणे गातांना

■ ■

खेळणी

भावना, विचार, मन
सगळी शब्दांची नाजूक खेळणी
भुलवणारी फुलवणारी
वास्तवाच्या रूक्ष स्पर्शाने

मोडून पडणारी, विखरून जाणारी
शब्दांची खेळणी खेळताना
सुटत जाते वयाचे भान
शब्दांनाच मुळी वय नसतं
शब्दांच्या महिरपीतून डोकावणारा आशय
तरल, तर कधी तीव्र होत जाणारा
वाट्याला येणारी अनामिक घुसमट
मेंदुला भोवळ आणणारी विलक्षण झिंग
आणि रिंगणातून मुक्त होत जातात शब्द

■ ■

सावल्या

खोल, खोल मनाच्या तळाशी
दडपुन टाकलेल्या अनुभवांची कलेवरं...
भावनेचा हलकासा झोका....
एक नाजुक हळुवार स्पर्श....
सगळी दडपणे झुगारून
अलगद तरंगत वर येणाऱ्या
क्षत, विक्षत सावल्या
डोळ्यातुन डोकावणाऱ्या....
ओठाआड लपलेल्या....
कडुशार स्मृतीच्या घनदाट सावल्या
चोहोबाजुंनी अस्तित्व व्यापीत
सारे बंध झुगारून देत....
पुढे झेपावणाऱ्या....
रीतिरिवाज संस्काराचे घर ढासळताना
मनमुक्त अवकाश कवेत घेताना
कुठंतरी जुना संदर्भ जपणाऱ्या
धूळ झटकलेल्या दर्पणात
डोकावणारा तो चेहरा....
डोळ्यांच्या गढूळ डोहात
हेलावणाऱ्या उदास मेसूर सावल्या

सौ. ज्योती मोहन पुजारी

■ ■

विहीर

तसा मी कफल्लक आहे
सांगण्याजोगे एवढेच की,
डोळ्यांच्या मुळांशी
थोडी ओल शिल्लक आहे–
नाही म्हणायला हाडांवर
आठवणीचे एखाद दुसरे
चुकार फूलही असेल.
आणि काळजाच्या गाभ्यात
गवसेल तुला
तुझ्या तृष्णेचा अजर अवशेष–
एखादा कृपाळू क्षणही भेटेल
ओठांच्या रहदारीत
आणखी पुढे गेलीस तर
लागेल आयुष्याची
खचलेली विहीर
आणि त्यातील तुला
गाणारं पाणी
बारमाही....

■ ■

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

अमरवेल

तू माझ्यातील
उदयवंत प्रसन्न सकाळ
चढत जाणारी पायांपासून
डोक्यापर्यंत अमरवेलीसारखी...

तू माझ्यातील
प्रच्छन्न दुपार वणव्यासारखी,
रक्तविवरात उकळणारी
आणि छातीच्या अथांग पोकळीत
चरचरणारे निर्मनुष्य प्रहर.

तू भयभोर सायंकाळ
मस्तकात मावळणारी
आणि स्वप्नांच्या मुंग्यांची रांग
डोळ्यांचे वारूळ शोधणारी.

तोपर्यंत पहाटून येणारे
भग्न कुशीचे चीर प्राचीर
पुन्हा अमरवेलीवर
सकाळ दुपार आणि सायंकाळचीच
अमीत फुले
वणव्याच्या वासाची...

पुन्हा स्वप्नांच्या मुंग्यांची रांग
आणि वारूळापर्यंतचा प्रवास
प्राणांतिक...

■ ■

आशीर्वाद

त्या दिवशी
निरोप घेताना
तू म्हणालीस-
'असो, झालं गेलं
गंगेला मिळालं.'
मग म्हणालीस
हात पुढे कर
मी हात पुढे केला
तेव्हा तळहातावर
शब्दांच्या चार बिया
ठेवत म्हणालीस-
'देण्याजोगं एवढंच
जपून ठेव
कामी येतील'....
(..........)
नंतर डोळ्यात दाटून आलेला
पावसाळा घळघळा बरसला
तळहातावर.
तळहाताचे शेत झाले
शब्दांचे बी रूजून आले
पुढे तळहातभर पिकून आला
तुझा आशीर्वाद
कवितेच्या तासातासांतून...

■ ■

आत-बाहेर

फुलेच फुले
(अंगणभर)
सावलीवर की
सावलीच्या आत!

दुःखच दुःख
(देहभर)
त्वचेवर की
त्वचेच्या आत!

फुले झाडून
कोपऱ्यात लावता येतील
किंवा अंगणाबाहेर
काढता येतील

पण या दुःखांचं काय!
त्यांना कुठल्या कोपऱ्यात लावू
बाहेर काढतो म्हटलं तरी
तुझ्या अंगावरच
पडण्याची मीती.

तेव्हा वाढू दे
त्यांचा ढीग मरणाएवढा
आत बाहेर.

■ ■

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चाफा

चाफा
उग्र
कडक
पानांचा
कठोर
कर्मठ
हठयोगी–

असल्या
नसल्या
अस्तित्वाचा
धुळीच्या
काठी
नागवा–

तुझ्या
दारात
टाकून
आपली
सारी
वस्त्रे
सौम्य
शुभ्र
विरागी....

सुखदेव ढाणके

एक

ओली
टप-टप
बाहेर...

शब्द
शब्दांमागून...

कागद
भिजलेला
चिंब !

–'मी
 कुठे !'

शब्दगंगेचा
नाद
मधुर
अर्थ कुठे
कुठे मी !

■ ■

दोन

गर्दी
इथे–तिथे
शब्द
जिथे–तिथे
ते
नाहीत कुठे !
ठायी-ठायी.

तिथे
जिथे मी !

अनिल देशमुख

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिपण

ज्ञानदेवांनी केलेला ' शब्द 'शक्तीचा विचार

प्रा. डॉ. सरोज कविमंडन

ज्ञानेश्वरीप्रमाणेच अमृतानुभवात ज्ञानदेवांनी शब्दाचा विचार केलेला आहे. अमृतानुभवाच्या ६ व्या प्रकरणात त्यांनी शब्दविचार केला. प्रारंभी शब्दांचे मोठेपण ते व्यक्त करतात,

बाप उपेगी वस्तु शब्द । जिया धरा सधर नादु ।
अमूर्तीचा विशदु । आरसा नव्हे. (अमृतानुभव प्रकरण ६ : १)

शब्द ही फार उपयोगी वस्तू आहे. ज्या शब्दाच्या योगाने नाद अधर म्हणजे कमी दर्जाचा किंवा अर्थहीन होतो तो सधर म्हणजे सार्थ झाला, तेव्हा शब्द अमूर्त वस्तूचा आरसा नव्हे काय ?

पण पुढे आत्म्याचे निरूपण करण्यासाठी मात्र शब्दांचा मोठेपणा टिकत नाही. 'आत्मा' हा शब्द देखील 'आत्म्याचा' वाचक होत नाही. म्हणून आत्म्याचे ठिकाणी 'आत्मा' या शब्दाचा काही उपयोग नाही. स्वयंप्रकाशरूप आत्म्याला कोणाचे कशाला सहाय्य पाहिजे ?

आत्मानुभव असा आहे की ज्याठिकाणी शब्दव्यापारच काय पण मौनसुद्धा व मौनच काय पण मौनाचे भानसुद्धा अस्तित्वात असू शकत नाही. म्हणून, शब्द हा आत्म्याचे स्वरूप विशद करण्यास असमर्थ आहे.

ज्ञानदेव त्यांच्या एका अभंगात म्हणतात,

अनुवादु खुंटला, एकपणें एकला ।

असे म्हणून आत्मानुभव व्यक्त करण्यास भाषाच उरली नाही असे ते म्हणतात; तरी ज्ञानेश्वरीत मात्र 'अरूपाचे रूप' शब्दांतून दाखवून ते, इंद्रियांकडून अनुभवण्याची प्रतिज्ञा ते करतात. शब्दांची मर्यादा ओळखूनही अशी प्रतिज्ञा करणाऱ्या प्रतिभावंताचे शब्दसामर्थ्य अगाध असले पाहिजे यात संशय नाही.

आत्मनिरूपणाच्या बाबतीत अमृतानुभवात शब्दांची व्यर्थता दाखविणारे ज्ञानदेवच ज्ञानेश्वरीत ही प्रतिज्ञा करतात. इतकेच नव्हे तर अरूपाला रूप देऊन त्यास इंद्रियांकडून अनुभवीन, इंद्रियांना त्याचा संवेदनाप्रत्यय देईन असे म्हणताना इंद्रियांच्या सर्व संवेदनांचे भान त्यांनी ठेवले आहे हे अप्रत्यक्षपणे ते सुचवितात.

म्हणजे वस्तुत: 'शब्द' आत्मनिरूपण करण्यास दुबळा असेलही, पण ज्ञानदेवांनी त्या शब्दाला त्याच्या सर्व सामर्थ्यानिशी उभे केलेले आहे. शब्दाची अफाट शक्ती व तरीही एक मर्यादा लक्षात घेऊनच वरची प्रतिज्ञा त्यांनी केली असावी. कारण एऱ्हवी, ज्ञानेश्वरीत शब्दप्रभू ठरलेले ज्ञानदेव, प्रतिपदेच्या चंद्रकोरीचा निर्देश जसा वृक्षशाखेने करतात तसा मूलवस्तूचा निर्देश शब्दोपाधीने करता येतो पण ते त्याचे पूर्ण स्पष्टीकरण नाही— असे म्हणते ना,

पांडिवयाची चंद्ररेखा । निरुता दावावया शाखा ।
दाविजे तेवी औपाधिका । बोलीइया (अ. १५ : ४७०)

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एऱ्हवी न वोलणेनि बोलणे । जेथिचे सर्व नेणिवा जाणणे ।
काहीच न होनि होणे । जे वस्तु गा (अ. १५ : ५४०)

त्यांनी शब्दांचे माध्यम जाणीवपूर्वक स्वीकारले आहे. शब्दांची निवड आपण कशी करू याबद्दलचे स्पष्ट उद्‌गार ज्ञानेश्वरीत आहेत.

साहित्याला अनुरूप अशी विलक्षण मधुर शब्दकळा आपण योजून शब्द हा श्रवणेंद्रियाचा विषय असला तरी या शब्दात सामावलेला रस हा माझा आहे असे जीभ मोठ्या डौलाने म्हणेल. म्हणजेच सर्व इंद्रियांना तृप्त करण्याचे सामर्थ्य आपल्या शब्दांत असेल असे ते सुचवितात.

मालतीच्या फुलातील गंध व रूप यामुळे घ्राणेंद्रिय व त्याचबरोबर डोळे जसे तृप्त होतात तसे प्रमेयाची उकल हे बुद्धीचे काम असले तरी त्यासाठी येणाऱ्या शब्दांच्या रूपसौंदर्याने ते बघणारा आनंदित होतो.

पहा पां मालतीचे कळे । घ्राणासि कीर वाटले परिमळे ।
परि वरचिली बरवा काइ डोळे । सुखिचे नव्हती । (अ ७ : २०८)

याठिकाणी अंतर्मनाला जाणवणाऱ्या शब्दसौंदर्याचे आवाहन आहे.

नवल बोलतिये रेखेचि वाहणी । दिसतां डोळयांही
पुरो लागे धणी । ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे
जेथ संपूर्ण पद उभारे । तेथे मनीचे धावे बाहिरे
वोलु भुजाही आविष्कारे । आलिंगावया (अ. ६ : १८, १९)

या ओव्यांत त्यांची वरील भूमिका स्पष्ट होते. सहज पाहिले तर शब्द हा कानाचा विषय पण त्याचे सौंदर्य जीभ व डोळे यांनाही अनुभवता येईल असे ते विश्वासपूर्वक सांगतात. म्हणजे शब्दांच्या ठिकाणी नाद, रूप, रस, गंध या सर्व संवेदना निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत होते व त्याची त्यांना जाणीव होती असे दिसते.

शब्दांच्या व्यापकपणाबद्दल ते म्हणतात, शब्दांचे व्यापकपण असाधारण असून त्यात चिंतामणीचे गुण दिसतात. सामर्थ्यशाली कवीच्या हातात 'शब्द' एक अमोघ अस्त्र म्हणून मिरवतात. त्या शब्दापुढे नादब्रह्मही खुजे ठरते.

तैसे शब्दाचे व्यापकपण । देखिजे असाधारण
पाहातयां भावज्ञा फावती गुण । चिंतामणीचे (अ. ६ : २१)
नादब्रह्म खुजे । कैवल्यही तैसे न सजे
ऐसा बोलु देखिजे । जेणे दैवे (अ. १५ : १३)

शब्दांचे सामर्थ्य व मोहिनी असाधारण असते.

तैसे साच आणि मवाळ । मितळे आणि रसाळ
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे (अ. १३ : २७०)

शब्दांच्या वरची गवसणी काढून, आतल्या शुद्ध रूपाशी तद्रूप व्हायचे असेल तर शब्दाचा बाह्य थर बाजूला करता आला पाहिजे. कारण अक्षराच्या मर्यादित बांधलेल्या शब्दात कल्पनातीत अर्थ सामावलेला असतो.

ज्ञानदेव म्हणतात शब्द कोवळा असावा. गायनातील शब्दांचे सुस्वर व सुवासाचा गौरव ज्या कोवळेपणाने नाहिसा होईल असे शब्द असावेत. म्हणजे शब्दांना त्यांच्या दृष्टीने सुगंधही निश्चित असतो. शब्द अत्यंत मृदु असावेत, अमृताच्या उफाळून आलेल्या तरंगाप्रमाणे असावेत, ते कोवळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असावेत. शब्दातील कोवळेपणावर, नादमाधुर्यावर त्यांचा भर आहे. शब्द म्हणजे 'अमृताचा उसळता लोट'– यातच त्याचे माधुर्य, सौंदर्य, ब्रह्मानुभव देण्याचे सामर्थ्यादी गुण प्रतीत होतात.

उच्चारलेल्या शब्दांमधून आशय प्रतीत झाला पाहिजे. एका अभिप्रायातून दुसरा अभिप्राय निघाला पाहिजे–


अर्थ बोलाची वाट पाहे । तेच अभिप्रावो
अभिप्रायाते वियें । भावाचा फुलौरा होत जावे । मनिवरी (अ. ९ : २७)

शब्द, सुंदर, नादयुक्त, कोवळा, रसाळ असावा व त्यात परतत्त्वानुभवाचा स्पर्श असावा. अशा पदबंधातून मग जो अभिप्राय व्यक्त होईल तो रसिकांच्या हृदयाला भिडेल.

शब्दसौंदर्य, पदबंध, व त्यातून निर्माण होणारा अभिप्राय–रसप्रकर्ष व परतत्त्वस्पर्श या पार्श्वभूमीवर शब्दांचे विवेचन ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी केलेले आहे.

शब्दांना मुळात सखोलता नसते, विविध पैलूही नसतात. असतो तो कोशार्थ वा वाच्यार्थ. परंतु प्रतिभास्पर्शाने शब्द, इथे हवे तसे घडतात. ज्ञानदेवांना समुद्राहून खोल असे अर्थ देणारे शब्द अपेक्षित आहेत. 'सूर्यबिंब जरी बचके एवढे दिसते तरी त्याच्या प्रकाशाला त्रिभुवन अपुरे पडते.' त्याप्रमाणे शब्दांची व्याप्ती कवीच्या प्रतिभास्पर्शाने विस्तारते. नाद, स्पर्श, रूप, रस, गंध या सर्व सौंदर्यसोहळ्यातून एकदा शब्दातील अर्थ मनाला भिडला म्हणजे शब्दाचे माध्यम गळून पडते. व शब्देवीण संवादलेला अनुभवच फक्त अंतर्मनात उरतो. त्यांचे रूप, सौंदर्य, अनुपमेय–अवर्णनीय असते. म्हणजे शब्द हा अनुभव प्रगट करणारा, अनुभव वाचकापर्यंत पोहचविणारा माध्यमस्वरूप असला तरी शेवटी माध्यम गळून पडते, ते गळून पडून फक्त अनुभव हृदयाशी भिडणे हेच साध्य असते. शब्द गळून पडतो म्हणून तो असा मर्यादित ! पण शब्दच अनुभव प्रगट करून पोहचविणारा म्हणून प्रचंड सामर्थ्यवान–हे शब्दाचे अद्भुत रूप व त्याची शक्ती ज्ञानदेवांनी ओळखली होती–

■



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुरावशेष सूची :
हेमाडपंथी(ती) मंदिरे

श्रीपाद केशव चितळे

"युगवाणी"च्या अंकात (ए-मे-जू- ९० व स-आ-नो.- ९१) मी अनुक्रमे आपल्या विदर्भातील मूर्ती व कृत्रिम, नैसर्गिक शैलाश्रयांची एक बृहद्सूची वाचकांसाठी अभ्यासकांसाठी व संशोधकांसाठी प्रसिद्ध केलेली आहे. ह्या वेळेच्या अंकात अशाच पुरावशेष सदरात मोडणारी हेमाडपंथी मंदिराची सूची देण्याचा प्रयत्न करीत आहे. आजच्या गतिमान जगात आपल्या ह्या ऐतिहासिक संपदेचे रक्षण करणे, जतन करणे आवश्यक आहे. केवळ शासनावर सर्व जबाबदारी ढकलून चालणार नाही पण अगदी युद्धपातळीवर अशा सर्व पुरावशेषांना अंकेक्षित करणे हे एक महत्त्वपूर्ण रचनात्मक कार्य होऊन बसले आहे. अशी सूची प्रसिद्ध केल्याने तज्ञांचेही इकडे लक्ष जावे हा माझा नम्र हेतू आहे. "युगवाणी" अशी सूची प्रसिद्ध करण्यास महत्त्व देते ह्याबद्दल मी मुख्य संपादक व संपादकमंडळाचा मनापासून आभारी आहे.

गेल्या काही वर्षात मी विदर्भाच्या नऊही जिल्ह्यात खूप भटकलो, तेव्हा असे लक्षात आले की किर्र जंगल, नदी-नाले, डोंगर-दऱ्या-घळी, खेडोपाडी अशा अनेक ठिकाणी आजही विपुल पुरावशेष आढळतात. हे पुरावशेष म्हणजे आपल्या विदर्भभूचे सांस्कृतिक-ऐतिहासिक अलंकारच नव्हेत काय? सुप्रसिद्ध कवी राजशेखर म्हणतात, "विदर्भविषय: सारस्वति जन्मभू:" हे म्हणणे योग्यच आहे, हे संस्कृत नाटके-कादंबऱ्या इत्यादी साहित्यकृती पाहिल्या म्हणजे लक्षात येते. विदर्भ संपन्न आहे पण तो कलासमृद्ध होता का? तर त्याचे उत्तर 'हो' असे आहे. पण दुर्दैवाने आपल्या विदर्भाच्या ह्या अमोल ठेव्याकडे कुणाचे फारसे लक्षच गेले नाही असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

इ. स. च्या ११ व्या शतकापासूनची मंदिरे विदर्भात आहेत. प्रत्येक जिल्ह्यात हेमाडपंथी म्हटली जाणारी ५-५० मंदिरे बऱ्यावाईट अवस्थेत आजही काळाशी निकराची झुंज देत उभी आहेत. सर कझिन्स, डॉ. मो. ग. दीक्षित, डॉ. ओ. पी. वर्मा आदी विद्वानांनी मोठ्या महाप्रयासाने अशा याद्या प्रसिद्ध केल्या. पण त्याला आता जवळ जवळ ४०-५० वर्षे होऊन गेलीत. माझ्या हिंडण्या-फिरण्यात अशी अनेक मंदिरे आढळलीत की ज्यांचा उल्लेख अशा यादीत मला तरी दिसला नाही. त्यांचे यादीप्रमाणे ही संख्या १०० च्या जवळपास जाते. पण माझ्या समन्वेषणाने (मी प्रत्यक्ष स्थळांना भेट देतो व मगच लिहितो) त्यात ५०-७५ ने नक्कीच भर पडेल असा विश्वास मला वाटतो.

त्या दृष्टीने मी अशा काही याद्या 'विदर्भ प्रज्ञा' (नियतकालिक, श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती नागपूर) व 'प्रभुकृपा' दीपावली अंक (१९९१) यात प्रसिद्धही केलेल्या आहेत. पण दिवसेंदिवस अशा याद्या वाढतच जात आहेत व म्हणूनच युगवाणीसारख्या विदर्भभर व विदर्भाबाहेर देखील प्रसिद्ध असलेल्या नियतकालिकात मी ती देत आहे. पण असे करताना श्री. मो. ग. दीक्षितांच्या (सर कझिन्सच्या आधारे व पुरातत्त्व सर्वेक्षण अहवाल) 'मध्यप्रदेश-पुरातत्व की रूपरेखा' या ५० वर्षापूर्वीच्या ग्रंथात जी नावे आहेत त्यांच्या व्यतिरिक्त आढळलेली मंदिरांची सूची मी अभ्यासकांसाठी देत आहे. जुनी पुनरोक्ती ह्यात नाही.

प्रस्तुत लेखात हेमाडपंथी मंदिराचे वास्तुशिल्प, मंदिराचे प्रकार, प्रतिमा, विविध शैली, स्तंभ, शिखर आदीबद्दल माहिती देण्याचे प्रयोजन नसून केवळ अशा मंदिरांची जिल्हाश: यादी प्रसिद्ध करणे एवढाच हेतू त्यात आहे. ज्या अर्थी ह्या सूचीत ते शिल्प (वास्तू) अंतर्भूत आहे त्याअर्थी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ते मंदिर अथवा वास्तू हेमाडपंथी या सदरात मोडल्या जाते असे समजायला हवे. तरीपण ढोबळमानाने हेमाडपंथी मंदिर म्हणजे, निश्चित काय आहे ह्याचे थोडेसे शास्त्रशुद्ध वर्णन सामान्य वाचकांसाठी देणे अत्यावश्यकच ठरते. साधारणत: मंदिराच्या बांधणीत दगड, विटा एकमेकास घट्ट चिकटून रहाव्या म्हणून सांधण्यासाठी शिसे माती, चूना, सिमेंट, गुळचूना, डिक यांचा उपयोग करतात. पण हेमाडपंथी मंदिरे ह्यास, अपवाद असतात. या देवालयाचे चिरे, त्रिकोण, चौकोन, वर्तुळ, काटकोन, अर्धवर्तुळ, स्तंभ इत्यादी विविध आकारात घडवून ते एकमेकात इतक्या कुशलतेने व पक्के बसवितात की त्यामुळे वास्तूच्या प्रत्येक अवयवाला दुसऱ्या अवयवाचा आधार मिळतो, व बांधकाम टिकावू, मजबूत व सुंदर होते. पुढे ह्यावरच भव्य घुमटाकार अशी छतेसुद्धा (Roof) बिनधोकपणे उभी राहतात. खेड्यापाड्यात अशा मंदिरांना राक्षसांनी बांधलेली मंदिरे का म्हणतात ? व ती सुद्धा राक्षसांनी एका रात्रीतून बांधलीत असे स्थानिक मंडळी का म्हणतात ह्याचे मुख्य कारण म्हणजे देवळांचे भव्य प्रस्तर माणसांकडून उचलणे शक्यच नाही म्हणून राक्षसांनी बांधली व बांधकाम खाचा-खोबणी ओळंब्यामुळे तडाखून होते म्हणून इतक्या अल्पावधीत बांधली म्हणून एका रात्रीतून राक्षसांनी बांधून काढली, असा प्रवाद सर्वत्र आढळतो. त्या मंदिरांना हेमाडपंथी ह्यासाठी म्हणतात, कारण यादव काळातील हेमाद्री उर्फ हेमाडपंथ (त) या करणाधीपाने ह्या बांधकाम पद्धतीचा पुरस्कार केला म्हणून ! हा हेमाडपंत हिंदू धर्माचा जाज्ज्वल्य अभिमानी व हिंदूवास्तूचा खंदा पुरस्कर्ता दिसतो. प्रत्यक्ष मंदिराच्या रचनेवर आपण नंतर विचार करू या. तरीपण हेमाडपंथी मंदिराची ४ वैशिष्ट्ये असतात ती अशी–

(१) मोठमोठ्या प्रचंड शिळा कापून त्यांना व्यवस्थित आकार देऊन सुडौल व सुयोग्य बनवणे व एक–दुसऱ्यावर ठेवून मंदिराची वास्तू उभी करणे.

(२) मंदिराचे छत कमलांकित असून स्तंभ वर्गाकार असतात. कधी कधी स्तंभावर घटाकार असतात.

(३) मंदिराला चारी बाजूंनी मंडोवर व जंघा असून कळस–आमलक वैशिष्टयपूर्ण असतो. चारही भिंतीवर बाह्यांगाने विविध प्रतिमा दिसतात.

(४) बहुधा शिवलिंगाचे प्राचुर्य / ललाट बिम्बावर श्रीगणेश प्रतिमा असून वास्तू अत्यंत सुंदर, " विलोभनीय, चित्ताकर्षक व मुख्य म्हणजे टिकाऊ असते. विदर्भातील हेमाडपंथी मंदिरे साधारण इ. स. च्या १२–१३ व्या शतकातील असून आजही तग धरून आहेत. म्हणजे ७०० ते ८०० पावसाळे उन्हाळे ह्या मंदिर वस्तूंनी पाहिलेले आहेत. आता आपण ह्या नवीनच आढळलेल्या मंदिरांची यादी पाहू.

टीपा :

(१) ह्या यादीचे मूळ : डॉ. मो. ग. दीक्षितांची यादी आहे.

(२) पुरातत्व विभाग (ब्रिटिश सरकार, भारत सरकार, महाराष्ट्र सरकार) ह्यांनीही शासकीय पातळीवर खूप कार्य केलेले आहे. पण आज या मंदिरांकडे शासनाचे दुर्लक्षच होत आहे असे नम्रपणे पण खेदाने म्हणावेसे वाटते.

(३) अंतर कि. मी. मध्ये असून अंदाजे (Approximate) आहे.

(४) निर्देशित सर्व मंदिरे मी स्वत: प्रत्यक्ष जाऊन पाहून व अभ्यासून आलो आहे.

(१) नागपूर जिल्हा

(१) नगरधन–रामटेकपासून दक्षिणेस ९ कि. मि.

(२) भुयारी–नागपुरपासून पश्चिमेस १४ कि. मी. व्याहाडपेठ–वडधामना जोडरस्त्यावर शिरपूरजवळ एका टेकडीवर अवशेष रूपात (भग्न)

(३) श्रीमन्नाथ-काटोल, तालुका जलालखेड्यापासून दक्षिण–पश्चिमेस खाप्याच्या पुढे १६ कि. मी. घोग्रा गावाजवळ.

(४) कर्पुरभावली (समकालीन स्थापत्य) रामटेकगडापासून उत्तर उतरणीवर ५ कि. मी. वर.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(२) वर्धा जिल्हा

(१) नारायणपूर–जामच्यापुढे नांदोरी गावातून पुढे जाऊन ६ कि. मी. वर. मंदिर पूर्ण गाडल्या गेले होते. आज गोंडकालीन जीर्णोद्धार. मूळ हेमाडपंथी !

(२) चका–केळझरपासून पूर्वेस १० कि. मी.

(३) चांदा जिल्हा (चंद्रपूर+गडचिरोली)

(१) आरमोरी–प्रत्यक्ष गावातच–किल्ला, महाल.

(२) डोंगरसावंगी–आरमोरीपासून पूर्वेस १३ कि. मी.

(३) ठाणेगाव–डोंगरसावंगीच्या पुढे २ कि. मी. (भग्न)

(४) वैरागड–प्रत्यक्ष वैरागडच्या किल्ल्यातच भग्नावशेष.

(५) गोर्जाई–वैरागडपासून २॥ कि मी. पूर्वेस उत्कृष्ट वास्तू.

(६) भंडारेश्वर–वैरागड गावातच (यादवपूर्व वास्तू असावी.)

(७) नंदोरी–वरोड्यापासून पूर्वेस ९ कि. मी. (अतिशय भग्न)

(८) भटाळा–वरोड्यापासून उत्तरपूर्वेस ११ कि. मी. (३ मंदिरं) (१ मंदिर यादवपूर्वकालीन असावे)

(९) भटाळा–गावाच्या आधी भग्न स्वरूपात (वेस अवशिष्ट स्वरूपात प्रतिमा)

(१०) भद्रावती–भद्रनाग मंदिर (हेमाडपंथी स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट नमूना) प्रत्यक्ष गावात–शिलालेखयुक्त

(११) यवनाश्व–भद्रावतीच्या दक्षिण–पश्चिमेस २॥ कि. मी. (भिंतींवर अत्यंत अस्पष्ट शिलालेख)

(१२) देउळवाडा–भांदक ते देउळवाडा रस्त्यावर भवानीमाता मंदिर (कलचूरी स्थापत्याचा प्रभाव) यादवपूर्व

(१३) देउळवाडा–प्रत्यक्ष खेड्यात शैलाश्रयांच्या वरच्या अंगास मंदिराचे अती भव्य अवशेष स्तंभ, तुळया

(१४) भद्रावती–(विवेकानंद विद्या मंदिराजवळ) चार अत्यंत सुंदर कोरीव शिल्पयुक्त स्तंभावशेष, किरकोळ प्रतिमा, एकेक स्तंभ ट्रकनेच वाहून नेता येईल इतका भव्य (या वास्तूशेजारीच अजून एक गोंडकालीन वास्तू आहे पण त्यातील प्रस्तर मात्र यादवकालीन अवशेष असावे.

(१५) रामदिघी–चिमूर–वरोडा रस्त्यावर चंडई धरणाच्या किर्र जंगलात भव्य वास्तू (उत्तम पर्यटन स्थळ)

(१६) गडबोली–नवरगावात गोंड किल्ल्याच्या पायथ्याशी झाडीत लपलेले सुंदर वास्तू शिल्प (१ देऊळ मात्र भोसलेकालीन असावे)

(१७) नेरी–नवरगाव चिमूर रस्त्यावर ११ कि. मी. उत्कृष्ट शिल्पांकित मंदिर

(१८) भिसी–चिमूर–नागपूर रस्त्यावर १५ कि. मी. (वळकेश्वर देऊळ आहे म्हणतात. पण प्रत्यक्षात मी बघितलेले नाही.)

(४) भंडारा जिल्हा

(१) नागरा–गोंदियापासून उत्तरेस ८ कि.मी. भव्य मंदिर. (येथे चवाकाटकालीन इ.स. च्या ४थ्या शतकातील भाजक्या विटांचे मंदिर आढळले आहे. उत्खनन–महाराष्ट्र शासन पुरातत्त्व विभाग

(२) पिंगळाई–भंडाऱ्यापासून पूर्वेस ४ कि. मी. अवशेष रूपात (बाजूला गोंडकालीन छत्र्या आहेत.)

(३) मेंढा–भंडाऱ्याच्या पूर्वेस ३ कि. मी. वर गोसाव्यांच्या समाध्यात काही अवशेष (विशेषतः प्रतिमा) अवशिष्ट स्वरूपात.

(५) यवतमाळ जिल्हा

(१) ऐनक–(वणी तालुका) सिंदोल्यापासून दक्षिणेस ७ कि. मी. वर.

(२) चिखली परमडोह–ऐनकपासून पुढे ५–६ कि. मी. वर.

(३) महागाव यवतमाळ–भाम रस्त्यावर भव्य मंदिर.

(४) शिरपूर–वणी सिंदोला रस्त्यावर ६ कि. मी. वर (भग्न)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(६) **अकोला जिल्हा**

(१) किन्हिराजा–वाशीमपासून उत्तरेस २७ कि. मी. २ मंदिरे (१ भग्न)

(२) मालेगाव–(केवळ सती स्तंभच आढळलेत)

(७) **अमरावती जिल्हा**

(१) वरुड–केदारेश्वर मंदिराच्या प्राकारात हेमाडपंथी देवालयावशेष. आज मात्र नवीन मंदिर बांधकामात केदारनृपतीचा एक मोठा शिलालेख भिंतीत चिणला आहे.

(टीप — शिलालेखावर मी युगवाणीत जुलै-ऑ. ८९ संशोधन लेख लिहिला आहे.)

(२) रवाळा–वरुड–बैतूल रस्त्यावर शेंदरी जवळ रवाळा नावाच्या गावाजवळ नाल्याकाठी भरपूर अवशेष आढळतात. मयूरयुक्त स्तंभावशेष.

अशी साधारण ४० हेमाडपंथी शैलीची मंदिरे मला माझ्या समन्वेषणात आढळलीत. ह्या समन्वेषणात मला असंख्य गावकऱ्यांचा, स्थानिक शिक्षकांचा व काही ठिकाणी मेंढपाळ, धनगर-गुराखी बंधूंचे मोलाचे सहकार्य लाभले. मी त्यांचा व्यक्तिशः मनापासून ऋणी आहे. ■

संदर्भ—

(१) डॉ. मो. ग. दीक्षित–मध्यप्रदेश की पुरातत्वीय रुपरेखा


(२) प्राचीन विदर्भाचे कलावैभव–डॉ. गो. वं. देगलूरकर, तरुणभारत, दीपावली अंक १९७६.

(३) युगवाणी, एप्रिल ९०, सप्टेंबर ९१.

(४) प्रभूकृपा–दीपावली अंक १९९१.

(५) हेमाद्री उर्फ हेमाडपंत–केशव आटेपा पाध्ये ॲडव्होकेट.

(६) विदर्भ प्रज्ञा–श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती यादी १ लेख–श्री. के. चितळे.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी साहित्यातील व्याकरणदृष्ट्या प्रवृत्तिभेद

डॉ. स. मो. अयाचित

नामांकित लेखकांची देखील भाषेकडे पाहण्याची दृष्टी फार ढोबळ असते असे तात्यासाहेब केळकरांनी म्हटले आहे. तथापि अनभ्यासामुळे किंवा अनवधानामुळे निर्माण झालेल्या चुकांखेरीज काही भाषिक प्रयोग प्रमाण व्याकरणाच्या दृष्टीने 'पथभ्रष्ट' (deviations) असेही असतात. पारंपरिक नियमांच्या भंगापेक्षा भाषेच्या व्यक्तित्वाला अंगभूत अगर शोभून दिसणारे प्रयोग हेच शुद्ध प्रयोग म्हणावयास हवेत. अशा अंतःप्रवृत्तींविषयी बहुसंख्यांक मते व एखाद्याचे व्यक्तिगत मत यात फरक असू शकेल. भाषेची आंतरिक प्रवृत्ती दर्शविणारा हा विचार अंशतः सौंदर्याचाच विचार होय. या संदर्भात शैली (किंवा Diction चा विचारही अंतर्भूत होतो. भाषाशुद्धिवाद व त्याचा क्षीरसागरकृत प्रतिवाद या दोन्हींच्या माग विशिष्ट गृहितकृत्ये आहेत), व भाषेची विभिन्न प्रतिमाही अभिप्रेत आहे. कानाला न मानवणारा प्रयोग हाच भाषाविषयक विचारांचा आधार असणे आवश्यक आहे. 'अंतःप्रकृतीचा समज' हेच भाषेच्या अभिज्ञत्वाचे खरे गमक होय. हा निकष शकुतदर्शनी विज्ञानाप्रमाणे परीक्षणक्षम वाटणारा नाही, पण, भाषेसारख्या गतिमान् मानवी साधनांचा विचार या निकषावर होणे विसंगत नाही. समाजजीवनातील व्यवस्थांतरांमुळे कालानुसार बदल झाले तरी त्या बदलाच्या तपशिलातील खुणा प्रतीत होतात.

या आधारावर उदाहरणादाखल क्षीरसागर, वर्टी इत्यादी काही प्रसिद्ध लेखकांच्या लिखाणाचा परामर्श तत्त्वचिकित्सा या स्वरूपात या लेखात घेतला आहे.

भाषावैज्ञानिक दृष्टिकोणातून एखाद्या भाषेचा अभ्यास करीत असताना आपण त्या भाषेच्या सर्वसाधारण प्रवृत्तींचे विश्लेषण करीत असतो. हे विश्लेषण त्यामुळे बहुमताच्या आधारावर तयार झालेल्या भाषाविभागाचे विश्लेषण बनते. काही थोडे लोक यापेक्षा काही वेगळ्या प्रवृत्ती दाखवीत असतील, परंतु त्यांचा परामर्श अशा प्रकारच्या विश्लेषणात येऊ शकणार नाही हे उघड आहे. ज्या प्रवृत्ती बहुसंख्येने एखाद्या विशिष्ट लोकसमुदायात अगर विशिष्ट प्रदेशात आढळत असतील त्यांचे विश्लेषण वर्णनात्मक भाषाविज्ञानानेच परंतु स्वतंत्ररीत्या बोली भाषांच्या अभ्यासात समाविष्ट होईल. तथापि याखेरीजही आणखी विश्लेषणासाठी काही भाग राहतो. तो विशिष्ट व्यक्तींच्या भाषाप्रवृत्तींचा अभ्यास या सदरात घालता येण्यासारखा आहे. परंतु त्याचाही विचार चिकित्सापूर्वक करता आपल्याला काही स्वरूपभेद त्यात मानावा लागेल. उदाहरणार्थ–काही व्यक्तींच्या भाषाप्रवृत्तीत दुसऱ्या एखाद्या भाषेच्या प्रभावाने अगर साहचर्याने अभ्यासविषय झालेल्या प्रधान भाषेच्या दृष्टीने काही वेगळ्या रचना आपणाला आढळून आल्या तर त्यांचा विचार बोलीभाषांप्रमाणे किंवा तौलनिक भाषापरीक्षणाप्रमाणे विश्लेषणाच्या नव्हे तर तुलनेच्या आधारावर होईल. यापैकी, म्हणजे वैयक्तिक भाषाप्रवृत्तींपैकी, काही प्रवृत्ती व्यक्तिविशेषापुरत्याच मर्यादित असू शकतील, म्हणजे त्यांचा विचार त्या त्या व्यक्तींचा विचार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अपेक्षित असेल तर प्रासंगिक होईल. सामान्यतः भाषेच्या विचारात आपण प्रमुख साहित्यिकांची सर्वसाधारण आविष्कारप्रवृत्ती अभ्यासत असतो. इतरांच्या वैयक्तिक भाषाप्रवृत्तींचा विचार ती ती व्यक्ती कोणत्याही कारणाने महत्त्वाची अगर विचारार्ह वाटली तरच होत असतो, परंतु याही वैयक्तिक प्रवृत्तींच्या अभ्यासात दोन ठळक भाग करता येतील. एक तर त्या व्यक्तींचा भाषाविष्कार गृहीत धरलेल्या व्याकरणाला सोडून असल्यामुळे आपण असे प्रयोग प्रचलित भाषेच्या रूढ मार्गाला सोडून जाणारे प्रयोग (Aberrations) असे समजू. परंतु आपणास असेही आढळेल की हे भाषाप्रयोग केवळ व्यक्तिविशेष द्योतक असे स्वतंत्र प्रयोग नसून त्या केवळ अनभ्यासामुळे किंवा अनवधानामुळे निर्माण झालेल्या चुका आहेत. अशा प्रसंगी त्यांचा विचार भाषाविज्ञानात अंतर्भूत न होता स्वतंत्रपणे त्या त्या व्यक्तींच्या लेखनातील चुका किंवा प्रमाद म्हणूनच होऊ शकेल. यापैकी पहिल्या प्रकाराकडे लक्ष वेधण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे. तथापि प्रमादांचा उपयोग स्वतंत्रपणे अभिप्रेत असून देखील त्यांचा भाषाविज्ञानाच्या दृष्टीने देखील त्या त्या भाषेच्या आविष्कार पद्धतीवर प्रकाश टाकण्यासाठी उपयोग होऊ शकतो.

तात्यासाहेब केळकरांनी म्हटल्याप्रमाणे नामांकित लेखकांची देखील आपल्या 'भाषेकडे पाहण्याची दृष्टी फार ढोवळ असते' (अभिप्राय— मराठीचे अंतरंगदर्शन), केळकरांनी मराठी भाषेच्या लेखकांबद्दल आपले विधान केले असले तरी ते इतर भाषांनाही तितकेच लागू व्हावे. १९३२ साली केळकर व 'भाषादूषण' या शीर्षकाखाली लोकशिक्षण मासिकात राजाराम दामोदर देसाई यांनी एक विस्तृत लेख लिहून स्वतः केळकरांच्या भाषेचेच प्रमाद व भाषाप्रवृत्ती या दोनही दृष्टींनी परीक्षण करून रूढ मराठीच्या दृष्टीने लेखन पथभ्रष्ट होऊ नये यासाठी किरकोळ फरक केले असता ते ग्राह्य होऊ शकते असे दाखविले होते. उदाहरणार्थ, 'पण सुख तेवढे विसरून जाऊन दुःखाची तेवढी आठवण अधिक राहण्याची मनुष्याच्या मनाची प्रवृत्ती असते' (केळकर ग्रंथातील निवडक ९तारे, पृ. १५). या ठिकाणी राहण्याची याऐवजी ठेवण्याची शब्द वापरला असता वाक्य केवळ शुद्धच नव्हे तर सरळ होते. तसेच 'काही जाणत्या लोकांना. चळवळीचे मर्म लक्षात आले' (टिळकचरित्र, पृ. २७५) या ठिकाणची 'लोकांना' ही चतुर्थी चुकीची आहे. परंतु अशा प्रकारच्या भाषाप्रवृत्ती पुष्कळ वेळा अनवधानानेच निर्माण झालेल्या असतात. त्यांचा विचार भाषाविज्ञानाच्या रचनात्मक अभ्यासात फारसा होईल असे वाटत नाही. केळकरांसारख्या भाषाप्रभु साहित्यिकाच्या लेखनात असे अनेक दोष निर्माण झाले ते बहुशः मनातील विचारांच्या गर्दीमुळेच होय.

तथापि पुष्कळ वेळा असे वाटते की स्थिरपद झालेल्या लेखकांच्या लिखाणात पुनःपुनः येणारे काही शब्दप्रयोग रूढ झालेल्या प्रमाण व्याकरणाच्या दृष्टीने 'बाजूला पडलेले' किंवा पथभ्रष्ट झालेले (deviations) तर नव्हेत ? हे काही प्रयोग पहा—

लाकडी खाटीवर बिछाना आंथरताना (कामसेना. अ. वा वर्टी, पृ. २५) झोपण्याकरता खाटीकडे जाण्यापूर्वी (पृ, ३४)–खाटेवर, खाटेकडे असे अपेक्षित आहे. आश्चर्य करीत मी बावळटा सारखा नुसतं उभा राहिलो (पृ. १४८) या ठिकाणी नुसतं असा अव्ययासारखा उपयोग अपेक्षित नसून नुसता उभा राहिलो असे विशेषण हवे.

परंतु तेच या वाक्यात पाहा—

मेघांचा गडगडाट व्हावा तसा यमराज म्हणाला (पृ. ५२)–या ठिकाणी Situation तीच आहे, तरीही तसा याऐवजी अव्ययाचा उपयोग व्हायला हवा होता का अशी शंका आल्यावाचून राहत नाही.

आरशासमोर उभी राहून कांचन म्हणाली (पृ. १०५)–अशा प्रकारे विशेषणाचा वापर रूढ असूनही तो प्रमाणभूत व्याकरणाला मात्र मंजूर नसावा, म्हणजे सध्याच्या मराठीच्या प्रकृतीला तितकासा शोभणारा वाटत नाही. परंतु,

हातात दंडुका घेऊन उभ्या असलेल्या... पठाणाला (पृ. १६५) या ठिकाणी असे वाटण्याचे कारण नाही. पण तेच,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शहाजहानाच्या कबरीजवळ उभी राहताच एक हळुवार साद नीताच्या तोंडून निघून गेली (जखमा, लीला श्रीवास्तव, पृ. ९)-या ठिकाणी पुन: तीच शंका आल्यावाचून राहत नाही.

शंकर त्याच्यापासून शक्य तितक्या दूर पळायचा (पृ. ८६)-या ठिकाणी मात्र दोनही प्रयोग चालू शकतील (तितक्या व तितका)

त्यांनी ठरविले की नारायणाला चाळीतून बाहेर काढायचा (पृ ५०)-याही ठिकाणी काढायचा व काढायचे असा विकल्प संमत दिसतो पण,

मोहिनी निद्रेत असल्यासारखी नीतानं पुन्हा अत्यंत कोमल आवाजात साद घातली. या ठिकाणी मात्र रचनेच्या विस्कळितपणाबरोबरच (पृ. ९) 'असल्यासारखी' हा विशेषण प्रयोग खटकतो.

त्याच्या हसण्यात व सुरीच्या धारीत साम्य होतं (पृ. १२२) या ठिकाणी 'धारेत' याऐवजी 'धारीत' हा सप्त्यम्यन्त प्रयोग कदाचित् लेखकाच्या अज्ञानाने झाला असेल, पण तो उच्चारणप्रवृत्ती दाखवीत नाही असे नाही.

एका शर्तीवर चलेन मी (पृ. ५३)-असे भविष्यकालसूचक प्रयोग मराठीत अद्यापि मान्य झालेले आहेत असे वाटत नाही. चलीन असाच प्रयोग अपेक्षित आहे असे मराठीचे माझे ज्ञान मला सुचविते.

स्वत:ला सावरीत सवितानं हसत प्रश्न केला (पृ. ५८)

शब्दांचं स्पेलिंग सांगीत डिक्टेशन देऊ लागते (पृ. २१)

त्याची किंमत आखीत नाहीत (,, पृ. ५६)

सामान लावीत होती अन् तोंडानं मला शिव्या घालीत होती (पृ. १११) इत्यादि अनेक ठिकाणी उपान्त्य ई घ्यावा की अ असा संभ्रम वापरातील बहुसंख्य दुहेरी प्रयोगांमुळे निर्माण होतो खरा, पण ई कोठे सहजसिद्ध आहे व अ कोठे वापरावा हे ज्ञान आपल्याला अंतर्ज्ञानाने अगर सहजज्ञानाने बरोबर समजते, असे म्हटले तरी मराठीची प्रवृत्ती कोणती हाही निर्णय या ज्ञानाबरोबरच निगडित आहे.

अलीकडे; महाराष्ट्र टाइम्स सारख्या वृत्तपत्रातून देखील कितीतरी वेळा 'निवडणूक' या शब्दाचे बहुवचनी रूप ' निवडणुकी ' असे अग्रलेखातूनही येते. या वृत्तपत्राच्या अनेक चोखंदळ वाचकांकडून शुद्ध भाषेच्या अभिमान्यांची अनेक दोषदर्शक पत्रेही प्रसिद्ध होतात, पण कोणीही या बाबतीत निवडणुका असे आकारान्त बहुवचनी रूपच प्रमाणभूत मराठीला अपेक्षित आहे असे दाखविल्याचे आढळले नाही.

मला या लेखात ज्या विचारावर भर द्यावयाचा आहे त्यासंबंधी आणखी थोडे स्पष्टीकरण याच ठिकाणी करणे सोयीचे होईल. भाषा देशकालानुसार सतत बदलत असते हे सत्य भाषाविज्ञानाच्या विद्यार्थ्यांना मान्य असतेच. त्याचप्रमाणे शब्दरूपात अभिप्रायाविषयी संदेह देखील निर्माण न करताही भेद दिसला की लगेच पारंपरिक व्याकरणाच्या नियमांचा भंग झाला अशी ओरड करण्याचे कारण नाही हे पारंपरिक विचारांच्या अभिमान्याला देखील मान्य व्हावयास काहीच हरकत नाही. प्रश्न असा आहे की भाषेला जे एक व्यक्तित्व प्राप्त झालेले असते, त्या व्यक्तित्वाला अंगभूत अगर शोभून दिसणारा जो प्रयोग आपल्याला प्रतीत होईल तोच प्रयोग त्या भाषेचा शुद्धप्रयोग असे म्हणावयास हवे. या अंतःप्रवृत्तीविषयी बहुसख्याकांचे मत एखादी विशिष्ट दिशा दाखवील व तरीही काहीजण तद्विरुद्ध एखादे दुसरेच रूप भाषेत स्वत:पुरते तरी रूढ करण्याचा प्रयत्न करतील. उदाहरणार्थ, याच वाक्याचा विचार केला तर ' दिशा दाखवील ' याऐवजी काही जण ' दाखवेल ' असा प्रयोग करतील, नव्हे करतातच. यापैकी काही प्रयोगांविषयी एकमत होईल; काहींविषयी बहुमत एकच दिशा दाखवील असेही नाही. आणि तरीहि हा प्रश्न मूलत: भाषेची आंतरिक प्रवृत्ती दर्शविण्याविषयीच राहील यात शंका नाही. म्हणजे एकप्रकारे हा प्रश्न व्याकरणाचा दिसला तरी त्याचे स्वरूप सौंदर्यविषयक कल्पनांचे आहे.

या ठिकाणी अर्थातच मला भाषाशुद्धीचा विचार अभिप्रेत नाही. भाषाशुद्धीची सावरकरांची कल्पना आणि त्याचा (किंवा तिचा) क्षीरसागरांनी केलेला प्रतिवाद हे दोनही वाद विशिष्ट पातळीवर व विशिष्ट गृहीत कृत्ये लक्षात घेता (क्षीरसागरांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शब्द वापरावयाचा तर) 'स्टॅण्ड' होतात. सावरकरांचे लिखाण चिकित्सापूर्वक पुन:पुन: पाहिले तरी त्यांनी शुद्ध मराठीची जी प्रतिमा निर्माण केली तीस कोठेही बाध न येता त्यांच्या पल्लेदार वाक्यानी ती जास्तच शोभून दिसते. परकीय शब्दांचा सावरकरांनी धरलेला आग्रह हा वादापुरता आहे, त्यास विशिष्ट प्रसंगीही अपवाद सहन होत नाही असे त्यांनीही म्हटलेले नाही. या उलट क्षीरसागरांनी मात्र मराठीची जी रूढ प्रतिमा गृहीत धरलेली आहे, ती कमी सुंदर नसली तरी अनेक प्रसंगी ती संकीर्ण बनते हे नाकारण्यात अर्थ नाही. उलट स्वत: क्षीरसागरांच्या लेखनातही अशा प्रकारचे प्रवृत्तिभेदच नव्हे, तर त्यांच्या कल्पनेप्रमाणे देखील ज्यांना प्रमाद हेच नाव द्यावे लागेल अशीही स्थळे आढळतात. या ठिकाणी पांगारकरांसारखा एखादा मान्यवर जुन्या मराठीचा पुरस्कर्ता लक्षात घेतला तरी त्यांच्या लेखनात ढिसाळपणा पदोपदी आढळून येण्यासारखा असल्याने ज्यांच्या लेखनात आत्मविश्वास किंवा निदान भाषेच्या व्यक्तित्वाची जाणीव रेखीवपणे असेल तेच विचारार्थ घेणे अभ्यासकाला सोयीचे होईल, एरवी अशुद्ध मुद्रण आणि गलथानपणा या कारणांनीच आपल्या बऱ्याचशा नोंदी रद्द होतील. किंबहुना, विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्यां लेखकाचा विचार हाही सर्वसाधारण भाषेच्या अभ्यासकाला प्रातिनिधिक वाटेल. कारण काळाचा विचार करता आजच्या मराठीपासून चिपळूणकरी मराठीत अपेक्षित असलेला भेद लक्षात घेऊन लेखकाचे स्वत:चे म्हणून काही गुणदोष राहतातच. यापैकी अनवधान, गैरशिस्त किंवा नीटनेटक्या रचनेकडे दुर्लक्ष इत्यादि कारणांनी भाषेचा विचार करणाऱ्याला खटकणाऱ्या किती तरी बाबी बाद केल्यानंतच शैलीचा विचार निर्माण होतो. शिवरामपंत परांजप्यांचाही या संदर्भात विचार करता येईल. शैली या शब्दाने येथे Diction म्हणजे शब्द योजना अभिप्रेत आहे, व जी व्यक्तित्वविशिष्ट शैली भाषेच्या रूढ स्वरूपाहून 'नाकीडोळी' थोडी वेगळी असेल तीच या ठिकाणी विचारात घ्यावयाची आहे. श्री. के. क्षीरसागर हे प्रमाणभूत भाषेच्या जाणिवेने भारलेले होते हे प्रसिद्धच आहे. त्यांच्या लेखनात हेतुपूर्वक उर्दू व इंग्रजी शब्द त्यांच्या मराठी पर्यायाऐवजी येत असले तरी भाषेचे त्यांनी मानलेले व्यक्तित्व आणि समकालीन सामान्य मराठी माणसांच्या दैनिक जीवनात आविष्कृत होणाऱ्या मराठीचे प्रातिनिधिक व्यक्तित्व त्यांना महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या या विषयी गृहीत धरलेल्या कल्पनांना भाषाशुद्धीच्या चळवळीमुळे जो धक्का बसला त्यातूनच त्यांचा विरोध उफाळून आला. हे लक्षात घेतले तर क्षीरसागरांच्या लेखनातून आपल्या आतापर्यंत विचारसरणीसाठी उदाहरणे निवडणे अधिक योग्य ठरेल. शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांची वरेरकरांनी केलेली काही भाषांतरे माझ्या पाहण्यात आली. तेव्हाही हा विचार माझ्या मनात सतत येई. त्यांच्या लेखनाचा विचार स्वतंत्रपणेच करावा लागेल. या ठिकाणी क्षीरसागरांच्याच एका पुस्तकातून आणखी काही लक्षणीय उदाहरणे निवडून हा छोटा लेख पूर्ण करू.

बिऱ्हाडकराने (तसबीर आणि तकदीर, पृ. १४३)–बिऱ्हाडकरूने असे अपेक्षित आहे.

वाटसरांना आणि शेतकऱ्याना वाटले (पृ. १७२)– वाटसरूंना हेच बहुवचन चट्कन् मनात येते.

त्यावेळी त्यांची माझी गाठ झाली होती (पृ. २१५)– गाठ पडली होती व भेट झाली होती या दोन स्वतंत्र प्रयोगांनी मनात गर्दी केल्यामुळे संकर (hybrid) प्रयोग झालेला सहज लक्षात येतो; पण,

जोगांची ओळख करून देताना मी अगदी जीव घालून ओळख करून दिली (पृ. २३४) या ठिकाणी मात्र जीव घालणे हा प्रयोग मराठीला अनोळखी नसला तरी या संदर्भात तो अपेक्षित आहे असे वाटत नाही. 'करून देताना' हे शब्दही गाळायला हवेत.

या महिना–दोन महिन्यात (पृ. १८८)– या ठिकाणी अशाच प्रसंगी वरेरकरांनी महिन्याभरात असे प्रयोग केल्याचे आठवते. महिन्या–दोन महिन्यात हाच प्रयोग मराठीला अभिप्रेत आहे.

एक महिनाभराने (पृ. २०३)– या ठिकाणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मात्र योग्य प्रयोगच केलेला दिसतो. कोणत्या वर्तनाला मी कृत्रिम म्हणेन, कोणत्याला मी मी पाश्चात्य अनुकरण म्हणेन, कोणत्याला मी भावविवशता म्हणेन, कोणत्याला भावनाशून्यता म्हणेन याचा नेमच नसल्यामुळे...(पृ. २६३)– या ठिकाणी पहिल्या वाक्यखंडाप्रमाणे पुढेही प्रत्येक 'कोणत्या' शब्दापुढे तद्विशिष्ट विशेष्य पुनः वापरणे अपेक्षित आहे; कोणत्याला असा नामाप्रमाणे स्वतंत्र प्रयोग मराठी कानाला रुचत नाही.

निर्णय घेणे (पृ. २७७), नोंद घेणे (पृ. २७६) हे प्रयोग स्वत: क्षीरसागरांना रुचले नसते असे वाटते. आंग्लप्रभावामुळे हे प्रयोग सर्रास रूढ झाले असले तरी मराठी कानाला निर्णय करणे, लक्षात घेणे किंवा नोंद करणे हेच प्रयोग स्वाभाविक वाटतात. 'माझे स्वत:चे भाषण मला क्वचितच पूर्ण संतोष देई (पृ. २३४) या ठिकाणी मात्र पूर्ण संतोष होत नाही तरी 'चालेल' असे वाटते.

मोठ्या आदबीने आमच्या सारख्याच्या सूचनांना आवाहन करतानाही त्यांचे (=रेडियो अधिकाऱ्यांचे) मन त्यांना नकळतच मिटून जाते (पृ. २४४) याही ठिकाणी असाच हिंदीचा दुर्लक्षणीय प्रभाव मराठीचा पराभव करताना दिसतो. त्याचप्रमाणे, 'खरेदी करण्या'ला मराठीचा विरोध नाही (पृ. ४२४) हे माहीत असूनही 'संदर्भग्रंथही खरीद केले' (पृ. ४२१) असा एखाद्या मध्यप्रदेशी हिंदी–मराठी बोलणाऱ्याप्रमाणे प्रयोग होऊनच जातो.

गुह्य जीवन (पृ. ४८२) हा प्रयोग सर्व दृष्टीनी योग्य असूनही 'गुह्य संस्कार' या शब्दांच्या अनाहूत साधर्म्यामुळे कसासाच वाटतो. तथापि भाषेचे वरील सर्व प्रयोग क्षणभर दुर्लक्षित केले तरी, सामाजिक जीवन म्हणजेही औचित्यपूर्ण आत्माविष्कारच असते' (पृ. ५१०) ही वाक्यरचना मात्र मराठीला अद्याप तरी मंजूर झालेली नाही. आत्माविष्कारच असतो असेच म्हणावेसे वाटते. तरीही अशी वाक्यरचना मराठीला अपरिचित नाही.


सहज वाचता-वाचता कानाला न मानवणारा प्रयोग 'strike' झाल्यावर जो विचार मनात येतो तो या ठिकाणी प्रतिपादनाचा आधार आहे. भाषा हा व्यक्तीच्या तसाच समाजाच्या मनाचा आविष्कार असल्यामुळे, कपड्यामुळे जसे व्यक्तीचे 'रूप' लक्षात राहते, तसेच भाषेमुळे लेखकाचे, व लेखक जितका प्रातिनिधिक असेल त्या मानाने त्यावरून त्याच्या समाजाचे अंतरंग ओळखू येते, यामुळे साहजिकच संशोधनामध्ये लेखकाची भाषा हा एक स्वतंत्र निकष बनू लागतो. हा निकष अर्थात् त्याच्या वैयक्तिक शैलीचा विचार असतो. क्षीरसागर आणि सावरकर यांची वेगळी शैली आपणाला चट्कन् समजते. परंतु हा फरक बराचसा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आहे. दोघांनी मराठीला आपणाला आवडणारा पेहराव घातला आहे परंतु सावरकरांनी हेतूपूर्वक एक विशिष्ट 'फॅशन' निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

समाजात ज्याप्रमाणे वेळोवेळी कपड्यांच्या फॅशन्स बदलतात, त्याप्रमाणे शैलीचेही काही भेद आपोआपच पडतात. परंतु सर्वच लोक काही नवी फॅशन आली की ती स्वीकारायची असे करीत नाहीत. त्यामुळेच प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या लोकांचे विशिष्ट व्यक्तित्व स्थिर झालेले असते. या कारणाने आपल्या मनात काही Associations तयार झालेल्या असतात. वेषरचना अगदीच अनपेक्षितपणे केली तर ती तत्कालीन फॅशनला अनुरूप असूनही पुष्कळ वेळा संभ्रमात पाडते. अशा वेळी त्या व्यक्तीचे हे नवे रूप पाहावयास आपण सरावलेले नसतो. परंतु हाही विचार बराचसा वैयक्तिक शैलीचा बनण्याची शक्यता असते.

अशा अनेक व्यक्तींच्या समुदायावरून, गणिताच्या भाषेत बोलावयाचे तर, Lowest Common Denominator काढल्यावरच आपल्याला त्या भाषेचे व्यक्तित्व पूर्णपणे परिचित होते. त्या व्यक्तित्वाला कोणता शब्द किंवा कोणती रचना मानवेल हेही आपण सांगू शकतो. ही जी एक अंत:प्रवृत्ती किंवा 'समज' तयार होते तीच त्या भाषेच्या अभिज्ञत्वाचे खरे गमक होय. या निकषावर आपण वैयक्तिक लेखन / भाषणाला प्रतिसाद देत असतो. हा निकष सकृत्दर्शनी विज्ञानाच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निकषाइतका दृश्य किंवा परीक्षणक्षम वाटणारही नाही कदाचित, पण प्रत्येकाला त्याची जाणीव असते. भाषेसारख्या गतिमान मानवी साधनाचा विचार अशा निकषावर व्हावा यात विसंगत वाटण्यासारखे काहीच नाही. भाषेचा प्रवाह अखंड असल्यामुळे, व समाजजीवनातील व्यवस्थान्तरामुळे, त्यात बदल होईलही पण त्या बदलाच्या तपशिलातील खुणा भाषेच्या अभ्यासकाला प्रतीत होतात, त्याच आधारावर साहित्यिकांचा वैयक्तिक परामर्श घेता येतो. ■



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य आणि संस्कृती मंडळाचे

" मराठी वाङ्मयकोश " खंड– २ संबंधी आवाहन

"मराठी वाङ्मयकोशा"चा दुसरा खंड दोन भागात प्रकाशित करण्याची योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने तयार केली आहे. दुसऱ्या खंडात ग्रंथकारांसंबंधीच्या नोंदी असतील. ग्रंथकार या संज्ञेच्या मंडळाने केलेल्या व्याख्येनुसार मराठी मातृभाषा असलेले परंतु अन्य भाषेतील ग्रंथलेखनामुळे ख्यातनाम झालेले लेखक (उदा. सखाराम गणेश देऊसकर, काकासाहेब कालेलकर, द. रा. बेंद्रे), मराठी ग्रंथांचे अन्य भाषेत अनुवाद करणारे भाषांतरकार, मराठी नियतकालिकांचे संपादक, मराठी भाषेचे व संस्कृतीचे परदेशी अभ्यासक, इत्यादींचा वाङ्मयकोशाच्या दुसऱ्या खंडात समावेश केला जाणार आहे.

दुसऱ्या खंडाच्या पहिल्या भागात इ. स. १८५८ ते ३० एप्रिल, १९६० या शंभराहून अधिक वर्षांच्या काळात दिवंगत झालेल्या ग्रंथकारांबद्दलच्या नोंदी असतील. दुसऱ्या भागात १ मे, १९६० ते १५ जुलै, १९९२ पर्यंतच्या कालखंडात दिवंगत झालेले ग्रंथकार तसेच हयात असलेले सर्व ग्रंथकार यांच्यासंबंधीच्या नोंदी असतील.

दिवंगत ग्रंथकारांच्या नातेवाईकांनी, मित्रांनी अगर चाहत्यांनी त्या ग्रंथकाराबद्दलची खालील माहिती मंडळाकडे पाठवून मंडळास उपकृत करावे ही नम्र विनंती–

(अ) दिवंगत ग्रंथकाराचे संपूर्ण नाव, दिवंगत ग्रंथकाराचा जन्म दिनांक, जन्मगाव, शिक्षण, व्यवसाय, प्रकाशित ग्रंथांची यादी, त्याचे वाङ्मयेतर क्षेत्रातील कार्य किंवा अन्य भाषेतील लेखन, मृत्यु जेथे झाला त्या गावाचे नाव आणि मृत्युची तारीख.

(ब) ग्रंथकार दत्तक गेला असल्यास त्याचे मूळचे नाव आणि दत्तक गेल्यानंतरचे नाव. त्याने टोपण नावाने लेखन केले असल्यास अगर त्याच्या नावाच्या आधी वापरल्या जाणाऱ्या विशेषणामुळे तो ओळखला जात असल्यास (उदा. महात्मा, लोकमान्य, स्वातंत्र्यवीर, महर्षि, कर्मवीर इ.) त्याबद्दलही माहिती द्यावी.

(क) ग्रंथकारास मिळालेले राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरचे मानसन्मान यांचाही थोडक्यात निर्देश करावा.

आज हयात असलेल्या सर्व ग्रंथकारांनी दुसऱ्या खंडाच्या दुसऱ्या भागासाठी आपल्याबद्दलची परिचयात्मक माहिती पाठविल्यास मंडळ त्यांचेही ऋणी राहील. वाङ्मयकोशासारख्या संदर्भ ग्रंथातील माहिती शक्यतो बिनचूक असावी म्हणून सर्व ग्रंथकारांनी तसेच दिवंगत ग्रंथकारांच्या कुटुंबियांनी किंवा मित्रांनी माहिती देऊन मंडळाशी सहकार्य करावे ही विनंती.

या संबंधीचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा–

सचिव– महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, "एन्सा हटमेंट", "डी" ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग बोरीबंदर, मुंबई– ४००००१

किंवा

सचिव– महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई– ४०००३२.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शैली : एक संवादशास्त्रीय विचार

श्रीपाद भालचंद्र जोशी

शैलीशास्त्रीय अध्ययन व समीक्षा पद्धती मराठीत रुजू पहात असतानाच शैलीशास्त्राच्या कक्षा दिवसेंदिवस अधिक व्यापक होत, विस्तारत जात व वेगवेगळ्या ज्ञानशाखांना स्पर्श करीत अधिक व्यामिश्र होत आहेत.

मुळात शैली ही संकल्पना केवळ भाषिक रूपापर्यंत बंदिस्त करून अध्ययन करण्याची बाब समजल्यास ते अध्ययन शैलीचे उरतच नाही तर संवादसाधनांपैकी केवळ भाषिक साधनांचे ते अध्ययन उरते आणि कोणतीही संवादकृती ही तर भाषिक व भाषेतर संवादसाधनांनी युक्त अशी संयुक्त-समग्र कृती असते.

अशा वेळी शैलीची मूळ संकल्पनाच अगोदर पुरेशी स्पष्ट करणारी चर्चा अत्यावश्यक ठरते.

आधुनिक संवादशास्त्राने तसेच 'प्रॅग्मॅटिक्स्'सारख्या ज्ञानशाखांमुळे शैलीच्या संकल्पनेच्याच कक्षा विस्तारताहेत.

त्या अनुषंगाने या प्रकाराने मराठीत संभवत असलेली बहुधा ही पहिली वहिलीच चर्चा. अभ्यासक व तज्ज्ञांनी यावर मते व्यक्त करून ती आकारास आणण्यास सहाय्य करावे या अपेक्षेसह सुरू करीत आहोत.

शैलीची शैलीशास्त्रीय दृष्ट्या करण्यात येणारी सर्वमान्य व्याख्या ही 'शैली म्हणजे विचलन' अशी केली जाते. 'विचलन' किंवा Deviation (from Norms) यात मुळातच 'चलन' (किंवा Norms) हे गृहीत पक्के अथवा 'स्थायी' असून 'चलना'पासून वळलेले ते 'विचलन' अशी संकल्पना गृहीत धरली जाते.

शैली म्हणजे विचलन नव्हे !

या गृहीतात सरळसोट व्याकरणिक रचना हे 'चलन' व या रचनेपासून वेगळे, वळलेले ते 'विचलन' हे पर्यायाने आलेच, जे Normal (वाक्य) नाही ते abnormal, जे सुकृत नाही ते विकृत या प्रकारे जे चलन नाही ते विचलन व ज्या कारणांनी हे विचलन घडले ती कारणे म्हणजे त्या त्या संदर्भातील शैली-उपाय असा त्याचा एक सरळ अर्थ लागतो.

या गृहीताची ही स्थिती, ही वस्तुस्थिती म्हणून मान्य केली तरी सत्यस्थिती काही वेगळीच असते. सत्य स्थिती अशी की एखाद्या व्यक्तीची (एखादी) शैली आपल्याला तिच्या वागण्यातून 'जाणवते' ते वागणे व, त्याचे हे 'जाणवणे' (Behaviour) पुनरावृत्त होत राहते, ती व्यक्ती तशीच वागताना जाणवली नाही तर त्या व्यक्तीस आज काय झाले आहे असा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो. अशावेळी त्या व्यक्तीचे तसे न वागल्या गेल्यामुळे जाणवलेले वर्तन हे 'विचलन', विचलित वर्तन समजायचे की ती व्यक्ती जशी एरवी वागायला हवी (असे आपल्याला तिच्या वागण्याच्या (शैलीच्या) सवयीमुळे वाटते) त्या तिच्या नेहमीच्या वागण्याला (त्या शैलीला) 'विचलन' समजायचे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जे ' चलन ' (किंवा Normal) नव्हे ते ' विचलन ' असे जर मान्य केले तर मुळात बव्हंशी वर्तन, व्यवहार हे ' नॉर्मल ' व्याकरणिक रचनेप्रमाणे एका भाषिक घटकानंतर नियोजित दुसरा घटक या पद्धतीने कधीच होत नसते.

भाषिक व्यवहार देखील कर्ता–कर्म–क्रियापद अशा सरळ रेषेतच तेवढा कधीच चालत नाही. म्हणजे बव्हंशी मानवी व्यवहार त्या अर्थाने मग मुळात ' विचलन 'च असते. व हे ' विचलन ' एवढ्याचकरता म्हणायचे की ते ' चलन ' किंवा भाषिक रचनेत जसे कर्ता–कर्म–क्रियापद या ' चलन ' वा ' क्रमिक ' भाषिक वर्तनाप्रमाणे नसते.

जे ' चलन ' नव्हे ते जर विचलन (व म्हणून शैली) तर एखाद्या व्यक्तीच्या वर म्हटल्याप्रमाणे वागण्याच्या शैली संबंधातील ' विचलन ' कोणते व ' चलन ' कोणते ?

ती व्यक्ती नेहमी ज्या पद्धतीने वागते (अर्थात ज्या शैलीत वागते) (त्यामुळेच ती त्या व्यक्तीची शैली असे आपण म्हणतो) ते, ती ' शैली ' हा त्या व्यक्तीचा स्थायीभावच असल्याने ते (' विचलन ' हे) चलनच (म्हणजे तिचे Norm, Normal) समजावे लागेल.

असे झाल्यास शैली म्हणजे येथे विचलन न ठरता चलनच ठरते. व ती व्यक्ती नेहमी वागते त्या पद्धतीने (शैलीत) न वागल्यासच नवल; असे आपल्याला वाटत असते. आता हे नवल म्हणजे (घडल्यास, म्हणजे ती व्यक्ती तशी न ' वागल्यास ' त्यास) ' विचलन ' म्हणायचे काय ? व तेव्हाच त्यास व्यक्तीची वागण्याची शैली म्हणायचे व इतर (म्हणजे नेहमीच्या त्याच्या जाणवलेल्या शैलीस) वर्तनास (Non–Style) ' शैली ' नसणारे, नॉर्मल, वर्तन म्हणायचे ?

थोडक्यात व्यक्तीचे वागणे, नेहमीचे वर्तन आणि तिची शैली या अभिन्न बाबी असल्याने तिचे (नॉर्मल वर्तन अथवा ' विचलन ' नसणारे) नेहमीचे वर्तन हे चलन असूनही ती तिची शैली असते.

व्यक्तीच्या वर्तनाच्या संबंधात त्यामुळे शैलीची ' शैली म्हणजे विचलन ' अशी व्याख्या फारशी लागू पडत नाही.

परंतु भाषिक वर्तनास मात्र हीच व्याख्या लावून बघितले जाते असे आपल्याला आढळते. कारण भाषिक वर्तनात व्याकरणिक घटकांच्या वापराच्या जागा वा ते घटक कशानंतर कोणते आल्यास सर्वसाधारणपणे न्यूट्रल भाषिक रचना (स्ट्रक्चर) उद्‌भवते हे त्या त्या भाषेतील (' नेटिव्ह ') भाषिकास अवगत असल्याने त्या चलनापासून ढळलेली रचना ही ' विचलन ' म्हणून बघता येते.

भाषेतर वर्तनाचे काय ?

भाषिक वर्तनाच्या बाबत शैलीची म्हणूनच जी विचलन सापेक्ष व्याख्या केली जाते ती भाषिक वर्तनाच्या संदर्भात मान्य केली तरीही भाषेतर वर्तनाच्या संदर्भात ती व्याख्या मान्य करता येणे शक्य होत नाही. याचे कारण भाषिक चिन्हव्यवस्थेद्वारे साधल्या जाणाऱ्या व भाषेतर चिन्ह-व्यवस्थेद्वारे साधल्या जाणाऱ्या संवादाच्या व या प्रक्रियेतील संकेतांच्या स्वभावातच व त्यामुळे प्रक्रियेच्या स्वरूपात मूलभूत स्वरूपाचा फरक असतो तसा यात आहे.

त्यामुळे भाषिक वर्तनाला लागू पडते असे वाटणारी शैलीची आधुनिक व्याख्या भाषेतर (उदा. व्यक्तीची वागण्याची शैली) वर्तनास लागू पडणे शक्य नाही. जाहिरातीसारखा संवाद प्रकार हा भाषिक व भाषेतर अशा चिन्हव्यवस्थांच्या सुनियोजित व प्रभाव व परिणाम साधण्याच्या हेतूने हेतुपुरःस्सर घडवून आणलेल्या संकरातून प्रकट होणारा संवाद प्रकार असल्याने जाहिरातीतील केवळ भाषिक वर्तनाचे केलेले अध्ययन हे जाहिरातीच्या शैलीचे अध्ययन म्हणवून घेतले तरी ते जाहिरातीच्या शैलीचे अध्ययन न ठरता जाहिरातीतील केवळ भाषिक चिन्हव्यवस्थेच्या शैलीच्या अध्ययनापुरतेच तेवढे मर्यादित उरते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाषिक संवादातही भाषेतर साधने महत्त्वाचीच !

भाषिक चिन्हव्यवस्था देखील प्रत्यक्ष उपयोजन होताना केवळ भाषिक चिन्हांद्वाराच तेवढी संप्रेषित होत नसते तर भाषेतर संकेतांच्या सहितच तिचे उपयोजन होत असते व भाषिक व भाषेतर चिन्हसंकेत एकमेकातच मिसळलेले असतात. व्यक्तीच्या वागण्यात जसे भाषिक वर्तनाशिवाय 'इतरही काही' असल्याने व त्या 'इतरही काही' द्वारादेखील त्या व्यक्तीच्या वागण्याची पद्धती ठरत गेल्याने व्यक्तीच्या शैलीचे अध्ययन म्हणजे केवळ व्यक्तीने उच्चारलेल्या भाषिक चिन्हांच्या व्यवस्थेच्या शैलीचे अध्ययनच तेवढे असून भागणार नाही. व्यक्तींच्या शैलीस सुमारे साठ वर्षापूर्वीच्या अध्ययनात 'मॅनरिझम' म्हणून निकालात काढले गेले होते. आज त्याचा विचार आपण केवळ 'मॅनरिझम' म्हणून करीत नाही. तसेच जाहिरातींच्या संदर्भात देखील भाषिक संदेशांव्यतिरिक जे 'इतर काही' द्वारा संदेशवहन मोठ्या प्रमाणावर होत असते ते वगळून केवळ भाषिक चिन्हव्यवस्थेचेच तेवढे अध्ययन केल्यास ते जाहिरातींच्या शैलीचे अध्ययन ठरणार नाही. हे 'इतरही काही' म्हणजे भाषिक चिन्हव्यवस्थेशिवाय असणारी इतर प्रकारची संवाद साधणारी चिन्ह व्यवस्था व त्या व्यवस्थेच्या वापराचे हेतू व त्यांची सिद्धता. संवाद समग्रपणे साधण्यात, संदेश पोहचवण्यात व ग्रहणात या साऱ्यांचाच (भाषेतर संवाद साधने) वाटा हा फार मोठा असतो.

जाहिरातींसारख्या विषयांचा अभ्यास त्यामुळेच केवळ व निव्वळ भाषाशास्त्रीय भाषिक घटकाच्या आधारावर होऊच शकत नाही. त्याकरता संवादकृतीचा समग्रपणे अभ्यास करू इच्छिणाऱ्या आधुनिक संवादशास्त्राच्या आधारे देखील अध्ययन होणे आवश्यक ठरते. जाहिरातीं'चे शैलीशास्त्रीय अध्ययन हे त्यामुळेच शैलीच्या (भाषिक कल असलेल्या) परंपरागत शास्त्रीय व्याख्येत न मावणारे असे अध्ययन आहे.

शैली : भाषेची की संवादाची ?

जाहिरातीतील भाषेचे केलेले अध्ययन एवढ्याचपुरते जाहिरातींचे शैलीशास्त्रीय अध्ययन आजवर झालेले असून असल्या अध्ययनाचा आद्य पुरुष समजल्या जाणाऱ्या ब्रिटनमधील लीच यांच्या जाहिरातीच्या शैलीशास्त्रीय अध्ययनापासून तर भारतीय इंग्रजीतील पंड्या काय, हिंदीतील सुरेशकुमार काय किंवा मराठीतील डॉ. आश्विनी धोंगडे काय यांनी केलेले जाहिरातींचे शैलीशास्त्रीय अध्ययन हे जाहिरातीतील भाषिक घटकांच्या वापराच्या शैलीचेच तेवढे अध्ययन करते हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच या अध्ययनांमधून निश्चित होणारी जाहिरातींसारख्या संवादप्रकाराची शैली व तिचे स्वरूप हे जाहिरातींसारख्या संवाद प्रकाराची समग्र शैली व्यक्त करण्यास असमर्थ ठरते असे दिसते. या साऱ्याचा अर्थ इतकाच की शैलीची 'शैली म्हणजे विचलन' अशी करण्यात आलेली व्याख्या शैलीशास्त्रीय अध्ययनाचा केवळ भाषिक कल दर्शविते. शैलीशास्त्रीय अध्ययनाला बऱ्याच मर्यादा त्यामुळे पडून ते समग्र कृतीतील केवळ भाषिक पातळीपुरते मर्यादित असे शैलीचे अध्ययन उरते. समग्र कृती अथवा संवादव्यवहार हा केवळ भाषिक पातळीवरून चालत नाही. तर भाषिक पातळी ही संवादव्यवहारातील एक महत्त्वाचे 'साधन' असलेली पातळी आहे. सामुग्री आहे. परंतु संवाद केवळ याच व एवढ्याच साधनाने तेवढा घडत नाही किंवा भाषिक पातळीनेच तेवढे त्याचे समग्रत्वदेखील ठरत नाही.

मानवी वर्तन ही मुळात बरीचशी संवादकृती असते. संवादात भाषिक स्तर असला तरच तो संवाद व तो भाषिक नसला तर संवाद नव्हे असे नसते.

भाषिक चिन्ह व्यवस्थेपुरते शैली अध्ययन मर्यादित नको

शैलीशास्त्रीय अध्ययनाच्या कक्षा विस्ताराच्या झाल्यास शैलीशास्त्रीय अध्ययन हे संवाद कृतीतील भाषिक चिन्हापुरते मर्यादित करून उपयोगाचे नाही. ते समग्र संवादकृतीचे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्ययन व्हायला हवे. त्याचे स्वरूप हे संवादशैलीचे अध्ययन असे निश्चित करावे लागेल. भाषा ही संवादार्थ म्हणून साधन स्वरूपात वापरावयाची बाब आहे. म्हणून ज्या संवादाकरता ज्या ज्या संवादकृतीत हे भाषिक वर्तन घडत असेल त्या संवादकृतीतील भाषेव्यतिरिक्तऱ्या अन्य साधनसामुग्रीचे; इतर चिन्हव्यवस्थांचे व त्यांचे त्या त्या संवादकृतीत भाषिक पातळीशी (चिन्हव्यवस्थेशी) असलेल्या नात्याच्या स्वरूपाचे अध्ययन करावे लागेल. असे अध्ययन झाले तरच त्या त्या संवादकृतीतील शैलीचे ते अध्ययन ठरेल. अन्यथा समग्र संवादकृतीतील केवळ भाषिक वर्तनाचे अध्ययन म्हणजे शैलीअध्ययन एवढीच शैलीशास्त्राची कक्षा मर्यादित राहील व तसे झाल्यास या मर्यादित स्वरूपाच्या अध्ययनातून वर्णिलेल्या उपायांना शैली उपाय समजत राहून शैलीचे भाषेतर संदर्भात असणारे (मोठ्या प्रमाणावरील) अस्तित्वच आपल्याला जाणवणार नाही. थोडक्यात, शैलीचे अध्ययन केवळ संरचनात्मक भाषाशास्त्राधारे केले गेल्यास जाणवणाऱ्या या मर्यादा आहेत.

दृश्यमाध्यमातील शैलीचे काय ?

नाटकाचे शैलीशास्त्रीय अध्ययन करताना ते नाटकातील केवळ संहिता अथवा संवादांचेच तेवढे करून ते संपूर्ण नाट्यकृतीचे शैलीशास्त्रीय अध्ययन ठरवता येणार नाही. चित्रपट, चित्रवाणी अथवा दूरचित्रवाणी या माध्यमातील कृतींच्या शैलीशास्त्रीय अध्ययनाबाबत देखील असेच म्हणता येईल.

विशेषत: दृश्य माध्यमातील भाषेची संकल्पना ही भाषिक चिन्हव्यवस्था म्हणजे या माध्यमांची भाषा एवढीच नसते. त्यामुळे या माध्यमातील केवळ भाषिक चिन्हव्यवस्थेच्या शैलीचे अध्ययन म्हणजे या माध्यमातील संवादशैलीचे अध्ययन ठरणार नाही.

केवळ भाषिक चिन्हव्यवस्थेच्या शैलीपुरते अध्ययन मर्यादित करावयाचे झाल्यास ते श्राव्य माध्यमांच्या संदर्भातच सर्वाधिक लागू पडेल. त्यातही भाषेतर अशा संवादसाधनांच्या उपयोजनांचा वाटा दुर्लक्षिता येणार नाहीच.

केवळ भाषिक चिन्हव्यवस्था हेच प्रमुख संवाद माध्यम असणाऱ्या संवादकृतीपुरतेच केवळ भाषिक चिन्हव्यवस्थेच्या शैलीचे अध्ययन हे त्या संवादशैलीचे अध्ययन ठरू शकेल. उदा. लिखित वाङ्मयकृती, पत्रव्यवहार व तत्सम श्राव्य अथवा दृश्य माध्यमेतर संवादाकरिता असणारी लिखित (Written word) सामुग्री.

शैलीशास्त्रीय अध्ययनात संवादशास्त्रीय अध्ययनाची गरज

या चर्चेचा हेतू एवढाच की शैलीच्या अध्ययनाची संकल्पना ही भाषिक चिन्हव्यवस्थेपुरती मर्यादित मानायची की शैली ही एखाद्या संवादकृतीतील समग्र मानवी वर्तनाची संवादशैली अशी मानायची ?

(Whether style should be perceived as a matter of Communication as a whole or whether as satter of use of lingiuistic code alone in a particular communicitive act behevier ?) आधुनिक संवादशास्त्राचा मराठी भाषेत अद्याप अध्ययनाच्या – संशोधनाच्या पातळीवर हवा तसा परिचय नसल्याने हे विवेचन कसे जाणवेल हे सांगता येणार नाही. (जिज्ञासुंनी आधुनिक संवादशास्त्रासंबंधाने अतिशय प्राथमिक स्वरूपाच्या माहितीकरता प्रस्तुत लेखकाचे 'संवादशास्त्र' हे पुस्तक बघावे.)


शैली : संवाद साधनांच्या संकरांची निर्मिती

शैलीच्या अध्ययनाचा मूळ हेतूच एखाद्या (Communication behaviour) मानवी कृतीतील संवादाचा समग्र हेतू, प्रयोजन, त्याच्या सूक्ष्मतर छटांसहित आकलन करून घेण्याचा व

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्या कृतीचा समग्र बोध (त्यातील सौंदर्यबोधासहित) अधिकाधिक करता येईल तेवढा सूक्ष्मपणे, अचूकपणे करून घेण्याचा असतो. हा बोध घेणे हे केवळ एखाद्या कृतीतील भाषिक चिन्हव्यवस्थेच्या समग्र आकलनावर तेवढे अवलंबून नसून एखाद्या संवाद कृतीत निहित वेगवेगळ्या चिन्हव्यवस्था, चिन्हांच्या परस्परातील नात्याची वीण, (Code matrix) ज्या हेतूंनी (संवादार्थ कामी येणारे सारेच घटक) उपयोजलेली ती तशी जाणवण्यावर अवलंबून असतो. (तसेच तो बोधनाच्या व्यक्तिगत पातळीवर चालणाऱ्या प्रक्रियेवर देखील अवलंबून असतो) ही वीण त्यामुळे (संवाद) कृतीतील भाषिक घटकांचीच केवळ विणलेली नसते अथवा भाषिक घटकांनाच तेवढे प्रधान मानून त्यांच्याभोवती देखील विणलेली नसते [Use of other (or no-verbal) Codes in a Commnnication act is not subsidiary or supplementry to language Code] तर विशिष्ट कृतीतील संवादाच्या हेतुपूर्तीकरता ही वीण ज्या घटकांची, चिन्हांची; चिन्हव्यवस्थांची गरज 'जाणवते', त्यांच्या उपयोजनाने विणली जाते. (हे सारे नेमके कसे होते यावर एकमत व्हावे असे या बद्दलचे संपूर्ण शास्त्रीय ज्ञान आपल्याला अद्यापही पुरेसे प्राप्त झालेले नाही) शैली ही त्यामुळे या उपयोजनाच्या आंतरक्रियेची (Interaction) निर्मिती असते. (अथवा असू शकते असे म्हणू या).

शैलीचे स्वरूप व स्वभाव त्यामुळे मुळात केवळ भाषिक चिन्हव्यवस्थेने ठरविल्या जाणे शक्य नाही कारण मुळातच शैली ही भाषिक व भाषेतर संवादसाधनांच्या तसेच संवादहेतूंच्या संकराची 'समग्र' निर्मिती असते. ■



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ आयोजित
एक दिवसीय दलित साहित्य संमेलन

अध्यक्षीय भाषण : प्रा. डॉ. भाऊ लोखंडे

विदर्भ साहित्य संघाने प्रथमच आयोजित केलेल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. भाऊ लोखंडे यांचे अध्यक्षीय भाषण वर्तमानपत्रांमधून प्रकाशित होण्याचे राहून गेलेले असल्याने त्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेले हे भाषण 'युगवाणी'तून क्रमशः प्रकाशित करीत आहोत. त्याचा हा पुढील भाग.

(मागील अंकावरून पुढे)

काव्यशास्त्र

काव्य आणि साहित्याची भरतापासून तर भामह, मम्मट, दण्डि, राजशेखर, आनन्दवर्धन, कुन्तक, भोज, रुद्रट, वामन, उद्‌भट, अभिनवगुत इत्यादि भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या दृष्टिकोणातून व्याख्या केली आहे. काव्यास्वाद घेणाऱ्या रसिकाला 'नागरक' म्हटले आहे. नागरक म्हणजे सुखवस्तू मनुष्य. काव्य म्हणजे कवींची कृती. बौद्ध अमरसिंहाने आपल्या 'अमरकोषात' "तर्थेव कवते श्लोकान् ग्रंयते वर्णयति वा" अर्थात् सर्वज्ञ तसेच सर्वविषयांचे वर्णन करणाऱ्याला कवी म्हणतात अशी व्याख्या केली आहे. भरताच्या नाटयशास्त्रात,

मृदुललितपदाढयं गूढशब्दार्थहीनं । जनपदसुखवोध्यं युक्तिमनृत्ययोज्यम ।
वहुकृतरसमार्गं संधिसंधानयुक्तं सभवति शुभकाव्यं नाटक-प्रेक्षकाणाम ।

नाटयशास्त्र १६/११८

अर्थात् जे सुकुमार आणि मनोज्ञपदांनी युक्त आहे, ज्यात गूढ शब्द आणि अर्थाचा अभाव आहे, जे सर्व लोकांना सहज कळू शकेल आणि ज्याची पदावली सरळ व युक्तीयुक्त असेल आणि नृत्यात वापरण्यास योग्य असेल आणि जे रसाच्या अनेक स्रोतांना प्रवाहित करणारे आणि संधीच्या संधानाने युक्त आहे, तेच शुभकाव्य होय असे म्हटले आहे. भामह "शब्दार्थौ सहितौ काव्यं" शब्द आणि अर्थ दोहोंच्या सहभावाला काव्य मानतो. रुद्रट, त्यालाच दुजोरा देतो, "ननु शब्दार्थौ काव्यम्" दण्डि मात्र हृदयाल्हादक अर्थाला अभिव्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला काव्यशरीर, "शरीरं तावद् इष्टार्थं व्यवाच्छिन्ना पदावली", (काव्यादर्श) म्हणतो. भामह, काव्यामध्ये रसाला परमावश्यक मानतो, "युक्त लोकस्वभावेन रसैश्च सकलैः पृथक" (काव्यालंकार) वामन, "रीतीला काव्याचा आत्मा", "रीतिरात्मा काव्यस्य" मानतो. मात्र आनन्दवर्धन, शब्दार्थाला काव्यशरीर व ध्वनीला आत्मा "शब्दार्थशरीरं तावत्काव्य, काव्यस्यात्माध्वनिरिति" (ध्वन्यालोक १.१) मानतो. विश्वनाथ मात्र रसात्मक वाक्याला काव्य "वाक्यं रसात्मकं काव्यं" म्हणतो. जो आस्वादित होतो "रस्यते इति रसः" असा भावार्थ ग्रहण केला आहे.

ॲरिस्टॉटल काव्याला कला आणि कलेला प्रकृतीचे अनुकरण मानतो. ड्राइडन काव्याला स्फुटसंगीत मानतो. जॉनसन, काव्याला छन्दोमयी रचना व कला मानतो. कार्लाइल, गेय विचाराला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्य मानतो. शेली कल्पनेच्या अभिव्यक्तीला काव्य मानतो. भामह आणि मम्मट हे धर्म, अर्थ, काम, मोक्ष, यश, व्यवहार, कल्याण, सदुपदेश व आनंदप्राप्ती हाच साहित्याचा हेतू मानतात.

धर्मार्थकाममोक्षेषु वैचक्षण्यं कलासुच ।
करोति कीर्ति प्रीति च साधुकाव्य निबन्धनम् ।। काव्यालंकार १.२
काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतररक्षतये ।
सद्यः परिनिवृत्तये कान्तासम्मिततयोपदेशयुजे ।। काव्यप्रकाश ११२

बौद्धांचे योगदान

काहींनी दण्डी आणि भामहाला बौद्ध मानले आहे. सीलमेघसेन आणि संघरक्षित हे बौद्ध होतेच. रामशर्मा, मेधावी आणि धर्मकीर्तीचा उल्लेख काव्यशास्त्रात येतो पण धर्मकीर्ती खात्रीने बौद्ध असल्याचे कळते. बौद्धांच्या तत्त्वज्ञानाचा काव्यशास्त्रावर पुष्कळ प्रभाव पडला होता. स्वभावोक्ती हा अलंकार काव्यशास्त्राला बौद्ध मध्यमाप्रतिपदेची देण मानली जाते. 'यथाभूतप्रत्यवेक्षा' या अर्थाने "स्वभावोक्ती" अलंकार मान्यता पावला आहे. "वस्तुध्वनी" हा काव्याचा आत्मा मानल्या गेलेल्या ध्वनीचा एक प्रकार मानला जातो. आणि भरतमुनीने फक्त आठच रस वर्णिले आहेत. 'शान्तरस' हा भारतीय काव्यशास्त्राला मिळालेली बौद्धसाहित्याची देणगी आहे. बौद्धांच्या 'प्रतीत्यसमुत्पाद' या मूलभूत कल्पनेशिवाय रसास्वादाची प्रक्रिया समजणे कठिण जाते. याशिवाय बौद्धांचे महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे मोक्षसिद्धीची अभिलाषा. प्रारंभी काव्याचे तीनच हेतू होते. धर्म, अर्थ आणि काम. हे तीनच आदर्श प्राप्त करायचे असत. वाल्मिकी रामायणातही तीनच आदर्शांचा उल्लेख आहे.

अभिरामस्य रामस्य चरितम् कर्तुम्युद्यतः ।
कामार्थगुणसंयुक्तम् धर्मार्थ गुण विस्तरम् ।। १,३.७.८

परंतु नंतर बौद्ध प्रभावाने धर्म, अर्थ व कामाबरोबर मोक्षाचाही अंतर्भाव करण्यात आला. आचार्य संघरक्षितांचे नाव पाली साहित्यात काव्यशास्त्राच्या संदर्भात उपलब्ध होते. मेजर जी. ई. फ्रेअर यांच्या मते संघरक्षित हे पालीचे महान व्याकरणकार मोग्गल्लान हेच होत.

" Acharya Sangharakkhita is no other than the great Pali grammarian Moggalana."

स्वर्ग नको की नीरस मोक्षही नको

बौद्ध काव्यात संस्कृतीदर्शन आणि धर्मभावना काठोकाठ भरली आहे. बौद्धकाव्यातील बोधिसत्वाला राज्याची अभिलाषा व स्वर्गाची लालसा नाही. दुःखसंतप्त आणि आर्तजनांचा कष्टनाश हाच त्याचा उद्देश आहे.

न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं न पुनर्भवं ।
कामये दुःखतप्तानां प्राणीनां आर्तिविनाशनम ।

जर माझ्या हातून काही पुण्य घडले असेल किंवा सदाचरण घडले असेल तर त्याच्या प्रभावाने संपूर्ण जगातील प्राण्यांचे दुःख दूर व्हावे अशी तो कामना करतो,

एवं सर्वमिदं कृत्वा यन्मयासादितं शुभम् ।
तेन स्यां सर्वसत्वानां सर्वदुःखप्रशान्तिकृता । बोधीचर्यावतार १.६

बोधिसत्वाच्या रोमारोमातून एकच ध्वनी उच्चारला जातो तो हाच की, कोणीही दुःखी, रोगी, पापी, हीन, परिभूत आणि दुर्मना न राहो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मा कश्चिद् दुखितः सत्वो, मा पापी मा च रोगितः।
मा हीनः परिभूतो वा मा भूत कश्चिच्च दुर्मनः ।। बो. च. १०.४१

जगात जे काही दुःख असेल ते माझ्या एकट्याच्याच वाट्याला यावे.

यत् किंचीज्जगतो दुःखं तत्सर्वं मयि पच्यताम् ।

तो म्हणतो, ".इतर प्राण्यांना दुःखापासून सोडविण्यात जो मला आनंद मिळतो तोच भरपूर आहे. स्वतःसाठी मोक्षप्राप्त करणे नीरस आहे..."

मुच्यमानेषु सत्वेषु येते प्रामोद्यसागराः ।
तैरेव ननु पर्याप्तं मोक्षेणारसिकेन किमा । बोधीचर्याविचार

अशाप्रकारे ज्या बौद्ध साहित्याने आठच रस असलेल्या साहित्यशास्त्राला नववा "शान्तरस" दिला आणि आठच अवतार असलेल्या धर्माला बुद्धाचा "नववा अवतार" म्हणून अंगीकार करावा लागला, अगदी तसाच इतिहास विसाव्या शतकात पुनरावर्तित झाला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रातःस्मरणीय-वंदनीय महापुरुषात अंतर्भाव करावा लागला. त्यांना भारतरत्न पदवीने अलंकृत करावे लागले आणि दलित साहित्याला मान्यता देऊन बाबांनी समाजपरिवर्तनासाठी दिलेला क्रान्तीचा मंत्र "क्रान्तीरस" म्हणून मान्य करावा लागला असे नम्रपणे म्हणावे लागते.

व्युपशान्तये न रतये

महाकवी अश्वघोष, मातृचेट, आर्यशूर, शान्तीदेव, धर्मकीर्ती, नागार्जुन यांच्यासारख्या महान बौद्ध कवींनी आपल्या काव्यकृतींनी जनतेला फार मोठ्या प्रमाणात जागृत आणि लाभान्वित केले. कविकुलगुरु महाकवी अश्वघोष म्हणतात, "माझे काव्य दार्शनिक आणि धार्मिक तत्त्वाच्या महौषधीचे कडूपण दूर करणारे गोड असे मध आहे. ज्याप्रमाणे अपेय परंतु पथ्यकर औषधीला मध मिसळून तयार केल्यावर मनुष्याला आरोग्य व आनंदाचा लाभ होतो, त्याप्रमाणेच दर्शन आणि धर्माच्या गहनगंभीर तत्त्वांचे माझ्या काव्यमधावरोबर सेवन केल्यावर त्याला लोकद्वयाची प्राप्ती होऊ शकते. मोक्षधर्माच्या व्याख्येने परिपूर्ण अशी ही कृती शान्ती प्रदान करण्यासाठी आहे. नुसता आनंद देण्यासाठी नाही. अन्यमनस्क श्रोत्यांना आकर्षित करण्यासाठी ही कृती काव्याच्या कमनीय शैलीत रचिली आहे. ह्यात मोक्षधर्मव्यतिरिक्त माझ्याकडून जे काही सांगितले गेले आहे, ते काव्यधर्मानुसार सरस बनविण्यासाठीच आहे, जसे कडू औषधात मध मिसळून ते ग्रहण केले जाते अगदी त्याप्रमाणेच हे आहे.

इत्येषा व्युपशान्तये न रतये मोक्षार्थगर्भाकृतिः
श्रोतृणां ग्रहणार्थमन्यनसां काव्योपचाराकृता ।
यन्तोक्षात् कृतमन्यदत्र हि मया तत्काव्यधर्मात्कृतं
पातुं तिक्तमिवौषधं मधुयुतं हृद्यं कथं स्यादिती ।। सौन्दरनन्द १८.१६३

संत तुलसीदासाप्रमाणे "स्वान्तसुखाय तुलसी रघुनाथ गाथा"

अशी स्वान्तसुखाय रचना महाकवी अश्वघोषांनी केलेली नाही. ते म्हणतात, मुनीश्रेष्ठ बुद्धाबद्दल सन्मानभाव ठेवून, मुनीबुद्धाच्या शास्त्रानुसार मानवाच्या कल्याण व सुखासाठी विद्वत्ता किंवा कौशल्य दाखविण्यासाठी नव्हे, हे काव्य रचिले आहे." (बुद्धचरित्र २८.७४) आणि हाच संपूर्ण बौद्धकाव्याचा उद्देश आहे आणि त्याचे ध्येय व सारही हेच आहे की जे दलित साहित्याला दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करीत असते. यातूनच दलित साहित्यिकाला मार्ग सापडणार आहे. आपली विश्वात्मक कारुण्यात न्हावून निघालेली अमर्याद अस्मिता गवसणार आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यशास्त्रात क्रांती

असा वैभवशाली वारसा ज्याला लाभला आहे त्यांना दलित शब्दाने घाबरून किंवा गोंधळून जाण्याची गरज नाही. डॉ. मा. गो. देशमुख, जे स्वतः सौंदर्यशास्त्राचे अभ्यासक व गाढे विद्वान होते ते एकदा भाषणात म्हणाले, "बाबासाहेबांनी नुसती राजकीय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातच क्रान्ती केली नाही तर त्यांनी साहित्यशास्त्रातही क्रान्ती केली. कालपर्यंत स्वतःला ब्राह्मण म्हणवतांना अभिमान व अहंकार वाटत असे. परंतु आता मात्र ब्राह्मण म्हणवताना लाज वाटते आणि कालपर्यंत ज्यांना 'महार' किंवा 'दलित' म्हणायला लाज वाटत होती त्यांना 'महार' किंवा 'दलित' म्हणवतांना अभिमान वाटतो आहे." कठिण काळाच्या ओघात शब्दांचे आशय कसे बदलतात त्याचे "दलित साहित्य" हे जीतेजागते उदाहरण आहे.

त्यांनी बुद्ध शब्द बुद्धिमत्तेचा प्रतीक होता त्याला "बुद्धू" म्हणजे मूर्खपणाचा प्रतीक बनविले. पिंपळ पावित्र्याचे प्रतीक होते, त्याला अपवित्र पिशाच्चाचे निवासस्थान ठरविले. त्रिरत्न-त्रिशरण पूजनीय आकडा होता तीनचा, त्याला त्यांनी "तीनतिघाडा काम बिघाडा" असे अशुभ अंक ठरविले. "मुण्डक" शब्द भिक्षूसाठी होता, तो त्यांनी तिरस्कृत ठरविला. "देवानांप्रिय" म्हणजे देवतांना प्रिय असा शुभ अर्थ होता त्याला "देवानां इतिगर्दभः" म्हणजे "गाढवांना प्रिय" असा अशुभ अर्थ केला. लंबकर्ण म्हणजे बुद्ध त्यांनी "लंबकर्ण इति गर्दभः" असा निर्णय दिला. म्हणून नुसत्या शब्दाने घाबरून जाण्याची गरज नाही. नाव केवळ व्यवहारासाठी असते.

बौद्ध साहित्यात एक जातक कथा आहे. एक "पापक" नावाचा भिक्षू बुद्धाकडे जाऊन आपले नामांतर करवून देण्याची विनंती करतो. बुद्ध त्याला चांगले नाव निवडून आणायला सांगतात. तो नाव शोधायला निघतो. तेवढ्यात त्याला प्रेतयात्रा दिसते. तो मृतमाणसाच्या नावाची चौकशी करतो, तेव्हा त्याला उत्तर मिळते "जीवक." त्याला आश्चर्य वाटते. नाव "जीवक" असूनही मृत्यू पावतो. पापक तसाच पुढे सरकतो. एक जण रस्ता चुकून त्याला वाट पुसतो. रस्ता सांगितल्यावर पापक त्याला नाव विचारतो. "पन्थक" वाट चुकलेला उत्तरतो, "पन्थक" नाव असूनही रस्ता चुकतो. पापकाला धक्काच बसतो. पुन्हा पुढे चालू लागतो तो पापक एक गलेलठ्ठ मालकीण मोलकरणीला बदडत असतांना पाहतो, पापक मध्यस्थी करून दासीचे नाव विचारतो. "धनवंती", उत्तर मिळते. ते ऐकून पापक थक्कच होतो. धनवंती नाव असूनही मालकिणीचा मार खाते दारिद्र्यामुळे. तो तसाच तडक बुद्धाकडे परत येऊन म्हणतो, "भन्ते भगवान ! मला नाव बदलावयाचे नाही."

"व्हॉट इज देअर इन द नेम" हे शेक्सपियरला, अलिकडे कळलेले सत्य पापकाला बुद्ध-काळातच कळून चुकले होते. "नाव फक्त व्यवहारासाठी असते." हा भदन्त नागसेनाने मिलिन्द राजाला दिलेला उपदेश आपण विसरू नये. नुसत्या नावाची चिंता न करता साहित्याचा कस व आशय लक्षात घेतला पाहिजे. त्याचे शक्तिस्थान शोधिले पाहिजे.

पहिला मान मराठीला

हे सामर्थ्य दलित साहित्यात असल्याची ग्वाही पद्मश्री पु. ल. देशपांडे ह्यांनी दिली आहे. ते म्हणतात, "दलित वाङ्मयाने मराठी साहित्यात प्रथम जर काही आणले असेल तर संतापातून चमकणारे अश्रू. अन्यायाविरुद्ध उठताना संतापातून फुटणाऱ्या अश्रूंचे मोल हे सर्वात मोठे असते. सामान्यांच्या भाषेतला हा तळतळाट असतो. ह्याचे एक उदात्त स्वरूप म्हणजे दलित साहित्य. हा भारतीय साहित्यात घडलेला एक अभूतपूर्व चमत्कार आहे". दलित साहित्याची प्रेरणाशक्ती असलेले बाबासाहेब म्हणायचे, "आम्हाला भीक नको, हक्क हवा, दया नको, न्याय हवा". ह्या सूत्राचे प्रतिबिंब उमटवतांना पु. ल. देशपांडे पुढे म्हणतात, "मराठी साहित्यात दैन्य किंवा कारुण्य यापूर्वी प्रकटले नव्हते असे नाही. परंतु त्यात कळत-नकळत दयेला आवाहन असायचे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इथे दयेला थारा नाही. कारण दयेला पात्र म्हणून जगत राहणे यासारखा माणसाचा अधःपात नाही; याची दलित साहित्याला पूर्णपणाने जाण झाली आहे. आणि ही जाण सामाजिक असल्यामुळे हा विद्रोह एक वेगळे तेज घेऊन प्रकटतो. दलित साहित्यिकांनी सुख आणि आत्मसंतुष्ट समाजाची सुखनिद्रा उडविण्याचे कार्य केले आहे. भारतात हा पहिला मान मराठीला मिळाला आहे. प्रस्थापित साहित्य, विषमतेची जबाबदारी वेद व ब्रम्हदेवावर टाकते पण दलित साहित्य बरोबर मर्मावरच बोट ठेवते. ते पुढे म्हणतात, "दलित साहित्याने समाजातल्या विषमतेची जबाबदारी देवावर न टाकता माणसावर टाकली. देवाच्या दारी सर्व समान आहे की नाही हा प्रश्न नाही. माणसाच्या दारी माणसे समान नाहीत हे सत्य आहे". उध्वस्त जीवनाची चित्रे माणसाच्या मनात बिंबविणे हे साहित्याचे कर्तव्य असते. जाणीवेच्या डोळ्यांनी पाहण्याचा अर्थ; साहित्य सांगत असते. घटनेतील सत्य सर्जनशील प्रतिभावान दाखवीत असतो. दलित समाजात अशा प्रतिभेला विलक्षण बहर आला आहे. भयंकर उन्हाळा भोगत पळसाचे बन फुलावे तसे हे साहित्य फुलले आहे".

दलित कोण ?

अशा या अर्थगर्भित दलित शब्दाची व्याख्या करताना विश्वात्मक वेदनेची जाण नजरेआड करता येत नाही. त्यात विशिष्ट जात, वर्ग किंवा धर्म अभिप्रेत नाही. दलित साहित्यातील भीष्माचार्य बाबुराव बागुल म्हणतात, "दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा. दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा. दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्याच्या-साठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत तो". या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो-एशियायी देशातील काळा, पिवळा येतात. आपल्या देशातील अस्पृश्य; आदिवासी, शोषित, पीडित येतात. दलित साहित्य माणसाला केन्द्रबिंदू मानते. ते माणसाच्या सुखदुःखाशी समरस होते व माणसाला सम्यक् क्रांतीकडे घेऊन जाते. म्हणजेच समाजाला समतेची शिकवण देते. माणसाला महान मानते. दलित साहित्य माणसा माणसात वैरभाव न पसरविता प्रेम पसरविते." कवी शरच्चन्द्र मुक्तिबोध येथे मनसोक्त दाद देताना भेटतात.

खरे शत्रु व मित्र कोण ?

माणसांच्या मुक्तिसाठी आणि जीवनाच्या नवनिर्मितीसाठी जेव्हा दलित साहित्यिक कटिबद्ध होतो. तेव्हा मात्र त्याला आपपरभाव न ठेवता परिवर्तनाच्या व क्रांतीकार्यात आडवे येणाऱ्या, आपले नाक कापून दुसऱ्याला अपशकून करणाऱ्या किंवा सामंजस्य वा समरसतेचे गोंडस घोंगडे पांघरून दांभिकपणे फुले, आंबेडकरी विचारांच्या मारेकऱ्यांचे लांगुलचालन करणाऱ्यांवर निर्भय व निर्दयपणे आघातप्रत्याघात करावेच लागतात. ते शत्रूपक्षीय असोत की आप्तस्वकीय असोत. याबाबतीत बाबासाहेबांनी आदर्श घालून दिलेला आहे. जेधे, जवळकर, ब्राह्मणेतर चळवळीचे धुरीण बाबांना म्हणालेत, "आपल्या चळवळीत काम करणाऱ्या ब्राह्मणांना आपण बाजूला सारले तर आम्ही सर्व ब्राह्मणेतर चळवळीतील लोक आपल्या चळवळीत येऊ" त्यावर बाबासाहेब म्हणाले, "नुसते ब्राह्मणेतर झाले म्हणून कुणाचा अंगिकार करणार नाही. माझ्या ध्येयधोरणाला व मानवमुक्तीच्या लढ्याला जे सहाय्यक व पोषक आहेत ते ब्राह्मण असले तरी ते माझे मित्र आहेत. आणि माझ्या ध्येयधोरणाविरुद्ध असलेले रक्ताचे स्वकीय असले तरी ते माझे शत्रूच होत". हा मानवतेला ललामभूत असा संकेत मनात बिंबवून ठेवत असताना निग्रो मुक्तीचा प्रणेता 'वुइल्यम लॉइड गॅरिसन' ह्यांचा आदर्श दलित साहित्यिकांनी आपल्या काळजावर कोरून ठेवला पाहिजे. महान निग्रो नेता गॅरेसन म्हणतो,...

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गर्भातच मृत्यू

"निग्रोंना दास्यमुक्त करणे हे प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे. या विषयावर मी सत्य व अकलंकित न्याय डोळ्यासमोर ठेवून लिहीन आणि बोलेन आणि तेही जळजळीत भाषेत, त्वेषात आणि अहोरात्र. याबद्दल मी दळभद्रेपणा करणार नाही. एखाद्याच्या घराला आग लागली असेल तर त्याला तुम्ही सांगा की, आग विझविण्यासाठी लोकांना हळूवार आवाजात पुकारा कर. एखाद्याच्या पत्नीवर एखादा नरपशू बलात्कार करीत असला तर, त्या पतीला सांगा की, त्या वासनांध नराधमाच्या तावडीतून तुझी बायको आस्तेकदम मुक्त कर. आगीत सापडलेल्या आपल्या अर्भकाला आगीतून बाहेर काढण्यासाठी धाव घेणाऱ्या मातेला तुम्ही सल्ला द्या की, बाई ग ! तू आपल्या मुलाला पायरीपायरीने आगीतून बाहेर काढ. परंतु निग्रोंच्या गुलामगिरींविरुद्ध मी जपून व सौम्य बोलावे व लिहावे असा हेका तुम्ही माझ्याजवळ धरू नका. मी माझे जीवनध्येय ठरविलेले आहे. त्यापासुन मी रेषभरही ढळणार नाही. मी त्याबद्दल कोणाशीही नरमाई घेणार नाही.

मी कोणावरही दयामाया करणार नाही अगर कुणाचीही गय करणार नाही. नाही. नाही. नाही. यापैकी एकही गोष्ट करणार नाही आणि माझा आवाज दाही दिशांना निनादत राहील आणि तुम्हाला तो ऐकावा लागेलच लागेल". या विधानातील तीव्रता ज्यांना बोचत असेल त्यांनी स्वतःला निग्रो गुलामाच्या ठिकाणी ठेवून विचार करावा म्हणजे मग त्यांना त्याचे मर्म आणि वेदनाजनक चीड कळू शकेल.—लोकमान्य टिळक अस्पृश्यात जन्मले असते तर त्यांनी 'स्वातंत्र्य माझा जन्मसिद्ध अधिकार आहे व तो मी मिळविणारच' असे म्हणण्याऐवजी "अस्पृश्यता नाश करणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे व तो मी मिळविणारच" असेच म्हटले असते. ह्या आंबेडकरी विधानातील मानसशास्त्र सहृदयाला सहज कळू शकेल. 'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो आपोआपच बंड करून उठेल', हे अब्राहम लिंकनचे वाक्य यासाठीच तर बाबासाहेबांनी दलितांच्या घरोघरी पोहचवून त्यांच्या मनात अन्यायाची चीड जागवली. त्यांच्या आयाबहिणींवर होणाऱ्या अत्याचाराचा मुकाबला करण्याची हिंमत निर्माण केली. त्यांना शेळीसारखे शंभरवर्षे जगण्यापेक्षा वाघासारखे क्षणभरासाठी कां होईना जगायाला शिकविले. बाबा म्हणायचे, "अरे तुम्ही आईच्या गर्भातच कां मेला नाही ?" ह्याच जागरणाचे पडसाद जोश मलीहाबादीच्या खालील काव्यपंक्तीत किती खतरनाक पद्धतीने उमटले आहेत पहा.

खल्क मे मेंहशर बर्पा है और तू मसरुफेख्वाब,
खून मे जिल्लत की मौजे खा रही हैं पेचो ताब।
तेरी गैरत को खबर भी है कि दुश्मन का अताब,
तेरी मा बहनो की राहों में उलटता है नकाब।
अब तो जख्मी शेर की सूरत बिफरना चाहिए,
यह अगर हिम्मत नहीं तो डूब मरना चाहिए।

अर्थात्, 'जनता अगदीच बेचैन, अस्वस्थ झाली आहे आणि तू मात्र झोपा काढतोस. अपमानाच्या लाटा रक्तात उसळताहेत आणि तुला ह्याची साधी जाणीवसुद्धा नाही ? शत्रूचे अत्याचार इतके वाढले आहेत की, तुझ्या आयाबहिणींची अब्रू, भररस्त्यात लुटली जाते आहे. आता तर तू जख्मी वाघाप्रमाणे चवताळून उठला पाहिजेस आणि जर एवढीही हिंमत तुझ्यात नसेल तर मग तू बुडून तरी मेला पाहिजेस.'


ते धन्य होत

हे करीत असताना दलित साहित्यिकाला आपल्या वाणी व लेखणीच्या सामर्थ्याची सतत जाणीव होत राहिली पाहिजे. आपल्या गळयात सोन्याची साखळी असली तरी तिला पितळीची

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठरवून दुसऱ्याच्या पितळाला सोने ठरवण्याची संभावना अधिक असते. म्हणून बाबासाहेब सावध-गिरीचा इशारा देत म्हणतात, " प्रगतीचे माप करणारी आणि इतिहास दर्शविणारी दोन प्रभावी अस्त्रे आहेत. एक लेखणी व दुसरी वाणी ! ही दोन्ही अस्त्रे व्यासंगीवृत्तीने कमविता आली पाहिजेत. जीवनात साहित्याला विशेष मोल आहे. तुमचे कर्तृत्व, विद्वत्ता व बुद्धिमत्ता सिद्ध करणारे तेच एकमेव साधन आहे. ज्ञान हे दुधारी तलवारीसारखे आहे. एखाद्याच्या हाती असलेल्या तलवारीचा सदुपयोग करायचा की दुरुपयोग हे त्याच्या शीलावर अवलंबून आहे. तो तलवारीने एखाद्याचा खूनही करील किंवा बचावही करील. ज्ञानाचेही तसेच आहे. शिकलेली माणसे नुसती पोटभरू असून भागणार नाही. मला शिकल्यासवरल्या लोकांनीच धोका दिला आहे. दु:खितांचे तप्त अश्रू पुसण्यासाठी तुमचे नेत्र झरले पाहिजेत. रंजल्यागांजलेल्यांच्या सेवेसाठी तुमचे हृदय पाझरले आणि संकटग्रस्तांच्या रक्षणासाठी तुमचे बाहू स्फुरले पाहिजेत." आणि जनकल्याणार्थ आपले बलिदान देणाऱ्यांचे स्मरण करताना ते गौरवाने म्हणतात, "पददलितांना हालअपेष्टांच्या अग्नीदिव्यातून गेल्यावाचून मोठेपण प्राप्त होणार नाही. आपला भविष्यकाळ घडविण्यासाठी त्यांनी वर्तमान काळातील सुखाचा आणि गरजांचाही त्याग करावयास तयार असले पाहिजे. अस्पृश्यांचे कार्य अत्यंत उदात्त आहे. 'ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्यांचा उद्धार करणे आपले कर्तव्य आहे' अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होत. गुलामगिरीवर हल्ला चढविण्यासाठी जे आपले तनमनधन आणि तारुण्य कुर्बान करतात ते धन्य होत ! आणि अस्पृश्यांना त्यांची माणुसकी पूर्णपणे मिळेपर्यंत बऱ्या-वाईटाची, सुखदु:खाची, संकटाची, वादळाची, मानाची, अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगडत राहतील ते धन्य होत."

(क्रमशः)



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अकसिदीचे दाने : वऱ्हाडी जीवनाचा वेध

डॉ. इंदूमती लहाने

विदर्भातील सुप्रसिद्ध वऱ्हाडी कथालेखिका प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनाने आणि कथनाने आगळ्या वेगळ्या शैलीने महाराष्ट्राला परिचित आहेत. आतापर्यंत त्याचे दोनशेच्यावर कथाकथनाचे कार्यक्रम झालेत. वृत्तपत्र व नियतकालिकांमधूनही त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचा पहिला कथासंग्रह "हजारी बेलपान"ला कै. यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार मिळालेला आहे. तर दुसऱ्या "अकसिदीचे दाने" ह्या कथासंग्रहास राज्यपुरस्कार लाभला आहे. 'सुगरनचा खोपा' हा तिसरा ग्रामीण कथासंग्रह नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. त्याला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा नी. स. गोखले पुरस्कार, स्त्रीमुक्ती कथांचा संग्रह असलेला "जावयाचे पोर" ह्याला बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त कल्याणच्या नागसेन मंडळाने परिवर्तनवादी व आंबेडकरवादी साहित्यासाठी "नागसेन" पुरस्कार दिला आहे.

प्रस्तुत कथा संग्रहात एकूण नऊ कथा आहेत. पहिली कथा आहे "अकसिदीचे दाने" स्वातंत्र्यानंतर खेड्यातील तळागाळातील माणसाच्या भल्यासाठी ज्या ग्रामपंचायती निर्माण झाल्या त्याचा परिणाम कसा विपरीत झाला, नात्यागोत्यातील माणसे राजकारणाने वैरी झालीत, पूर्वी समभावनेने व जिव्हाळ्याने वागणारे ग्रामीण आज माणुसकी गमावून बसले आहेत. तरीही "पुंडलीक पाटला"सारखे माणुसकीने वैरभाव विसरून वागणारी माणसेही आज आहेत. ह्याचा प्रत्यय दोन ग्रामीण पाटलांमधील वैराच्या संदर्भात आपल्याला ह्या कथेत प्रत्ययास येतो. "मोरे पाटील" हा वृथा अभिमानी तर पुंडलीक पाटील कष्टाने व माणुसकीने पुढे आलेला व ग्रामपंचायतीत निवडून आलेला. साहाजिकच "मोरे पाटलास" मत्सर वाटून त्याने सुडाने विचारांची खालची पातळी गाठून आपले बळ, पैसा वापरून "पुंडलीक पाटलाच्या" मुलांना हातकडी व कोर्ट कचेऱ्यास भाग पाडले. "मोरे पाटलांची" मुलगी जेव्हा बेजार होऊन बाळंतपणास तालुक्याला चिखलात गाडीला सहा बैल लावून मुश्कीलीने नेले. असे 'पुंडलीक पाटलास कळताच वैर विसरून तो स्वतः ट्रॅक्टर घेऊन गेला व पाटलांना म्हणाला पाटील ट्रॅक्टर घेऊन जा. मुलगी आमची पण आहे. आम्ही पण अकसिदीचे दाने तिच्यावर टाकले आहेत" राजकारणाने दुरावलेल्या माणसांना "पुंडलीक पाटलाच्या" माणूसकीच्या विचाराने जोडण्याचा प्रयत्न प्रस्तुत कथेत केला आहे. अजून माणुसकी जिवंत आहे. हे अतिशय तरल भावनांनी अभिव्यक्त झाले आहे.

"दारका" कथेत पोळा हा वैदर्भीय शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा व महत्त्वाचा सण, खांदेमळणीस बैलास आमंत्रण, पोळ्याला जेवण व करेला "दारका" भरविणे. "दारका" म्हणजे नंदीची (बैलांची) सजवून वाजंत्री लावून रात्रीची मिरवणूक काढणे. ह्या "दारके"च्या अनुषंगाने बैलाविषयी लोकांचा आदर जिव्हाळा व निष्ठा मांडल्या असून ग्रामीण जीवनातील अस्मिता, रुढी, परंपरा, श्रद्धा व प्रथावशेष इत्यादीचेही हृद्य म मनोहारी दर्शन लेखिकेने घडविले आहे. जावा कशा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असाव्यात ह्याचा आदर्श या कथेत आहे. कवी, लेखक हे मनकवडे असतात. दुसऱ्याच्या मनात डोकावून तळ शोधण्याचा मनकवडेपणा ते करतात. प्रस्तुत लेखिका ह्याला अपवाद नाही. दोन्ही जावांच्या मनात शिरून त्यांच्या अंतरंगातून त्यांना बोलते केले आहे. नव्या पिढीच्या व्यसनाची खंतही आहे.

"सर्वा" कथेत ग्रामीण अशिक्षित पण विधवा तरुण स्त्रीच्या, तिला भोगाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदना मांडल्या असून त्या दुःखाचे रंग अधिक गडद बोलके आहेत. ही कथा संपूर्ण विधवा स्त्री जातीचे दुःखी जीवनाचे प्रातिनिधिक ठरावी एवढी परिणामकारकता विच्यात आहे. तरुण गरीब विधवेच्या नवऱ्याच्या विम्याचा पैसा स्वकीयच कसे पचवितात. ती अशिक्षित असल्याने तिला समजत नाही. तेव्हा ती वारंवार आपल्या मुलीला शिकविले पाहिजे हे मनाला बजावत असते. यासाठी स्त्रियांनी शिकले पाहिजेच असा जीवन–मूल्यगर्भ संदेश त्या कथेतून मिळतो.

समाज जीवनाचे व कलावंताचे व्यक्तित्व साहित्यकलाकृतीत प्रगटत असते. त्याप्रमाणे विचार पात्रांमार्फत मांडलेले असतात. जीवनाविषयीचे अनुभवाचे कटूपण, सत्य व विविध म्हणीमधून येथे प्रगटले आहे. छत्तर गेलं म्हणजे बाईची जात फत्तर होते. "शेज्याशेवटी ज्याचा शेर त्याच्या पदरातच हायेच" ह्या तरुण विधवेला इतर स्त्रिया पुर्नविवाहाबद्दल म्हणतात, तेव्हा ती मार्मिकपणे म्हणते, "कुंकू पुसून शेण लावण्यात काय फायदा ?" "एका हांडीत शिजलं नाही तर दुसऱ्या हंडीत काय शिजन ?" असे निराशेने म्हणते. विधवेला तिच्या दडपणापलीकडील दुःखे लेखिकेने तिला बोलते करून पोटतिडीकेने मांडली आहेत. ग्रामीण स्त्री जीवन आणि समस्या मांडण्यात त्या समर्थ ठरल्या आहेत.

"गढी "मध्ये बापू गुरुजींच्या रूपाने कर्तव्यदक्ष सच्चा ग्रामीण समाजसुधारक उभा झालेला आ. आदर्श खेड्याची कल्पना कर्तृत्ववान गुरुजींच्या विचारातून प्रस्तुत कथेत मांडली आहे. गढी ज्याप्रमाणे गावाचे वैभव आहे. त्या गावाचं सुखःदुःख, ऊनपाऊस सहन करून ती दिमाखाने उभी असते. त्याचप्रमाणे त्या गावात विरोध सहन करीत कष्ट व संघर्ष करीत प्रसंगी स्वतःचा मुलगाही गमावून बापू गुरूजी गढीप्रमाणे ताठ आहेत. शिक्षणानंतर त्यांच्या मित्रांनी त्यांना नोकरीविषयी विनवण्या केल्या, पण नाही. "मला गावाकडे जायाचे आहे" असे ते मित्रांना म्हणत. "आपलं कर्तव्य आपून करावं, गाव सुदारलं पाहिजे. अरे ! पोटासाठी नासूकला, हाडलाही पिंडाले झोंबते. आपून शिकल्यावरही असच करावं काय ?" असे मौलिक विचार बोलत त्यांनी खूप खस्ता खाल्ल्या. सगळ्या गावात ते सगळ्यांनाच सहन होत नव्हतं. ते खंतावत. पुढे स्वातंत्र्य मिळाले बापू गुरुजीही हरीकले पण नव्या सुधारणांनी खेडं ढवळून निघालं, सटआ आला, माणसं शहरात गेलीत. गुरुजींच्या खेड्याचा चेहरा मोहराच बदलला. खेडं आपली मूलगामी जीवनमूल्येच हरवून बसले. ह्या स्थितीने गुरुजी खंतावले. गढी ढासळू लागली. "वान नदीला अकालीच खांड डोह पडू लागले. वडाची पाने अकालीच झडली. गुरुजींना कोरड पडायला लागली. ह्या सांकेतिक प्रतिकातून लेखिकेने खेड्यांची अधोगतीची स्थिती कल्पकतेने सूचित केली आहे.

"चाकोली"; "लोकावानी" या दोन्ही कथांमध्ये ग्रामीण स्त्रियांना भोगावा लागणारा सासुरवास, कष्ट, प्रसंगी मारही, नवऱ्याचा आधार असला तर ठीक नाही तर तिच्या जीवनाचे धिंडवडेच निघणार. ग्रामीण स्त्री अजून स्वतंत्र नाही. कौटुंबिक नाते, पतीपत्नी संबंध, तरल व सूक्ष्म भावभावनांची हळुवार गुंफण मोठ्या कलात्मकतेने येथे मांडली आहे.

"बळी" कथेत गरीब कर्जबाजारी जोडपे. पाटलाच्या कर्जाने "अंबाबाई व राम्या" त्यांची नुकतीच उमलू लागणारी मुलगी "नथी", उभयतांना आपणहून पाटलांच्या वासनेला बळी द्यावी लागली. आतडं तुटत असूनही पाटलाने कर्जापायी कंदेची आठवण करून त्याला पेचात गोवले.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पैशाच्या जोरावर निरपराध गरीबांची अब्रू लुटणारे "पाटील" गावोगांव आहेत. हृदयाला पीळ पाडणारी व्यथा आहे. तशीच समाजस्थितीवर प्रकाश पाडणारीही आहे. प्रत्येक कथा-वस्तू स्वंतत्र असून विषयाची विविधता आहे. निखळ ग्रामीण समाजजीवनाचा वेध घेऊन कलात्मक आविष्कार घडविणारा हा संग्रह वाचकास काही वेगळा आनंद देऊन जातो.

अकसिद्धीचे दाने :
डॉ. प्रा. प्रतिमा इंगोले

'महाद्वाराच्या पायरीशी' : एक उत्कृष्ट संपादन

मदन कुलकर्णी

'महाद्वाराच्या पायरीशी' हे हेमंत प्रकाशन, कोल्हापूर या प्रकाशनाने प्रकाशित केलेले पुस्तक. 'प्राचीन उपेक्षित संतांची वेचक अभंगवाणी' यात संकलित केलेली आहे. "ज्ञानदेव-नामदेवादी थोर संतांचे विचार, ज्यांनी आपले जीवन पाथेय बनविले, उपेक्षेचे दुःख गिळत गावगाड्यातील कठोर वास्तवाला जे सामोरे गेले आणि तरीही अंतरंगातील भक्तीची ज्योत तेवत ठेवून ज्यांनी मराठीतील भावकविता संपन्न केली, अशा प्राचीन मराठीतील उपेक्षित संतकवींच्या अभंग वाणीचे हे संपादन आहे", (संपादकीय निवेदन) याची जाणीव ठेवूनच 'प्रस्तुत कार्य संपादकद्वयांनी केलेले आहे, 'संतसाहित्यातील अनुभवाची कक्षा या कवितेने रुंदावली' या वास्तवाची नोंदही संपादकांनी आवर्जून केलेली आहे.

प्रस्तुत ग्रंथात अनुक्रमे चोखामेळा, सोयराबाई, बंका, निर्मळा, कर्ममेळा, भागू, कान्होपात्रा, जनाबाई अशा आठ संत मंडळींच्या अभंग संहिता दिलेल्या आहेत. त्याबरोबरच 'चंद्रभागातीरी' या शीर्षकाखाली बत्तीस पृष्ठांची विवेचक प्रस्तावनाही जोडलेली आहे, शिवाय अभंगातील कठीण शब्दार्थ व विवेचक टीपाही ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या असून त्या त्या संतांविषयी संक्षिप्त चरित्रात्मक मजकूरही दिलेला आहे.

ज्ञानवंचित, सामाजिक 'विषमतेने ग्रस्त आणि तत्त्वज्ञान, रूढी, सामाजिक संकेत यामुळे स्त्री-शूद्रादिकांची जी दुरावस्था झालेली होती, अशावेळी ज्ञानेश्वर-तुकारामांच्या भागवतधर्माने स्त्री-शूद्रादिकांना आत्मोन्नतीच्या महाद्वारात आणले. सारा समाज भक्तिसूत्रात बांधण्याचे कार्य या उभय संतांनी केले. भक्तिमार्गात कूळ, जाती, वर्णांना महत्त्व नाही अशा प्रतिपादनामुळे संपूर्ण समाज भक्तिसन्मुख झाला. 'अध्यात्मावर आधारित मानवतावाद' हा त्यांच्या भक्तीचा गाभा होता (पृ. २). हा संपादकांचा अभिप्राय योग्यच म्हणावा लागेल. याचा परिणाम म्हणून सारा उपेक्षित समाज या वारकरी पंथाकडे – भागवत धर्माकडे आकर्षित व्हावा हे सहाजिकच होते.

अठरापगड जातीचे संत-स्त्री-पुरुष आपल्या भक्तीच्या भावनेला मुखर करू लागले. ज्ञानोबा-नामदेवांची अभंगवाणी त्यांच्याही अनुभूतीच्या अभिव्यक्तीचे साधन बनले. परंतु संपादकद्वयांनी म्हटल्याप्रमाणे "चंद्रभागेच्या वाळवंटात सर्व संतांसमवेत हरिनामसंकीर्तनात दंग होऊनही या संताच्या मानसिकतेचे पोत कुठेतरी वेगळेच राहते." (पृष्ठ ४) त्यामुळेच चोखोबांसारख्या संताच्या अभंगात 'एक मूक आक्रोश' आढळतो. 'चोखा म्हणे श्रेष्ठ। ज्ञानदेवी ग्रंथ। वाचिता सनाथ। जीव होती' असे म्हणत असताना त्याच ज्ञानेश्वराच्या काव्यजाणिवेने प्रभावित चोखोबांना वर्ण-जाती, श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व याची बंधने ओलांडली जायला हवीत याची तीव्र जाणीव झाली. पण हे जेव्हा अशक्य वाटले तेव्हा ते परंपराशरण बनले. व्यवस्थेला शरण गेले. 'चोखा म्हणे विटाळ। आम्हा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पूर्वीचे हे फळ ' म्हणून त्यांनी स्वतःचे समाधान करून घेतले असले तरीही त्यांच्या अनेक अभंगातून त्यांच्या जातीकनिष्ठतेचा ठणका ठसठसताना दिसतो.

सोयराबाईच्या स्त्री सुलभ रसाळ अभंगवाणीमधूनही ही अस्पृश्यतेची विटाळ वेदना व्यक्त होते. " विटाळावाचोनि उत्पत्तीचे स्थान / कोणी देह निर्माण नाही जगी।" असे सडेतोड उद्गार तिने काढले आहेत. वंका हा सोयराबाईचा भाऊ, त्याची अभंगवाणी काव्यात्म असल्याचा अभिप्राय योग्यच आहे. वंकाच्याही पारमार्थिक वाटचालीत ' हीन जाती दीन पतित आगळा ' असा सामाजिक संदर्भ चोखोबांची धाकटी बहीण निर्मळा हिच्याही अभंगातून येतो. चोखोबांचा मुलगा कर्ममेळा हा तर खरोखरच ' सात्विक संतापाचा वंडखोर आविष्कार आहे.' (पृ. २२) पण त्यांची अभंगसंख्या अत्यल्प असल्याने त्याच्या आध्यात्मिक, लौकिक स्थितीगतीवर पुरेसा प्रकाश पडत नाही. ' जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमच्या चित्ता ' ही प्रखरता मात्र कर्ममेळ्याच्या भाषेतच आढळते.

' भागू ' महारीण ही तेराव्या शतकातील स्त्री किंवा चौदाव्या शतकातील ' कान्होपात्रा ' या उपेक्षित परिघातील स्त्रिया असून त्यांचे फारच थोडे अभंग उपलब्ध आहेत. या दोघींपेक्षा ' नामयाची जनी 'चे व्यक्तिमत्त्व भावमधूर आहे. तिची अभंग संख्याही भागू, कान्होपात्रा यांच्या तुलनेत बरीच आहे. अनन्य ईश्वरभक्तीत गुंतलेल्या जनाबाईलाही आपल्या कनिष्ठ जातीची जाणीव असावी. ' मज ठेवियले द्वारी। नीच म्हणोनी बाहेरी ' ही उक्ती लक्षणीय आहे. पण नामदेव कुटुंब आणि वारकरी संप्रदायाशी ती समरस झालेली असून परमेश्वराचे सान्निध्य ती अनुभवते. ' स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास। साधुसंता ऐसे केले जनी ' हा तिचा आत्मविश्वासही बोलका आहे. पण नामदेवाने तिची दखल केवळ एका अभंगात घ्यावी याबद्दलचे आश्चर्य संपादकाप्रमाणे सर्वांनाच वाटणे स्वाभाविक आहे. चोखाबा, जनाबाई वगळता या सर्व संतांचा पारमार्थिक प्रवास सलग आढळत नाही.

एका अर्थाने सामाजिक विषमतेच्या अंधार यात्रिक असलेल्या या संतांनी जन्महीनत्व, संस्कार-अभाव, दारिद्र्य, अज्ञान इत्यादी गोष्टींच्या पार्श्वभूमीवर राखलेली नैतिकता त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून टाकणारी आहे. पारमार्थिक श्रेष्ठत्व लाभलेल्या या व्यक्तींना सामाजिक हीनत्वामुळे जी मानसिक कुंठा जाणवत होती, वाट्याला उपेक्षा येत होती तरीही सहिष्णुता, सदाचरण, नैतिकता, भक्तिनिष्ठा या गुणावर स्वत:च्या जीवनाची उंची त्यांनी सांभाळली. त्यामुळे त्यांच्या अभंगातून विद्रोही स्वर आला तरी कटुतेपासून त्यांचे अभंग दूर राहिले.

" अध्यात्मप्रवणता आणि सामाजिक विषमतेचे वातावरण यामधून या संतांची मानसिकता आकाराला आली आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेचे पोत तत्कालीन इतरांच्या कवितेपेक्षा वेगळे जाणवते." (पृ. ३२) हा संपादकांचा निष्कर्ष कोणालाही मान्य होईल असाच आहे.

या उपेक्षित संतांची अभंग संहिता निश्चित आहे असे नाही. सकलसंत गाथा व अन्य अभंग गाथा यामधून अभंगांची संख्या वेगवेगळी आढळते. प्रस्तुत संपादित ग्रंथात सर्वांचे मिळून एकूण ३२२ अभंग आहेत. या सर्व उपेक्षित संतांच्या अभंग संहिताचा पुन्हा शोध घेतला गेला पाहिजे अशी प्रेरणा या ग्रंथाने संशोधकांना मिळू शकेल. तसेच या संपादनाचा उपयोग विद्यापीठ पातळीवरील अभ्यासक्रमात केल्यास उपेक्षित संतांच्या अभंग साहित्याच्या अभ्यासाला व संशोधनाला चालना मिळेल असे वाटते. एरव्ही ' ज्ञानोबा–तुकाराम ' हा मध्यमपदलोपी समास आहे असे सांगून वारकरी पंथातील या उपेक्षितांची उपेक्षा केल्यासारखे होईल, म्हणून प्रस्तुत संपादन मला मोलाचे वाटते.

महाद्वाराच्या पायरीशी : संपादक-हेमंत इनामदार/ऊ. रा. नसिराबादकर
हेमंत प्रकाशन, २७, प्रतिमा मार्केट,
कोल्हापूर-१९९०. मूल्य- रु. ५५/-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' पाणीपुरी '...निखळ, निर्व्याज विनोदी लेखन

शामकांत कुळकर्णी

शरद कोलारकर हे इतिहास विषयाचे प्रपाठक व गाढे अभ्यासक. त्यांनी इतिहासविषयक अभ्यासपूर्ण विपुल लेखन केलेले आहे व अजूनही त्यांचे लेखन चालते. असे असले तरी त्यांचा मूळ पिंड ललित लेखकाचा आहे. त्यातही त्यांना जीवनातील विनोद हुडकण्याची दृष्टी लाभलेली असल्यामुळे त्यांनी हलकेफुलके पण निर्व्याज रंजक विनोदनिर्मिती करणारे ललितलेखनही वेळोवेळी केलेले आहे. ' पाणीपुरी ' या त्यांच्या अलिकडेच प्रकाशित झालेल्या पुस्तकात निवडक आठ विनोदी भाषणांचे / लेखांचे संकलन करण्यात आलेले आहे.

तसे पाहिले तर स्कूटर, टेलिफोन, टेलिव्हिजन, पाण्याची समस्या, महाविद्यालयीन स्नेहसंमेलनातील नाट्यप्रयोग, जाहिराती व प्रसिद्धी तंत्राचे आज माजलेले प्रस्थ हे दैनंदिन जीवनातील नित्याचे अनुभवाचे विषय. पण रोजच्या रटाळ व्यावहारिक जीवनाकडे लेखक खेळकरवृत्तीने बघतो आणि विसंगती व विरोधाभास यांवर नेमके बोट ठेवून कोटिबाजपणा व माफक अतिशयोक्ती यांच्या साहाय्याने तो लेखातील नर्मविनोद खुलवितो. डॉ. कोलारकर यांना जीवनानुभवातून मार्मिक विनोद हेरण्याचे कसब प्राप्त झालेले असल्यामुळे प्रस्तुत पुस्तकातील त्यांच्या लेखातील विनोद हा सकस व रंजक असल्याचे जाणवते.

' चौकाच्या कोपऱ्यावर उभं राहून कुरकुरीत पाणीपुरी चाखताना जी मजा येते तशीच मौज हे लेख वाचल्यावर वाचकांना यावी ' असे निवेदनात लेखकाने अपेक्षित केले आहे. मनोगतातील ती अपेक्षा ' पाणीपुरी 'तील लेखांच्या वाचनातून पूर्ण होते.

विसावे शतक हे गतीचे (घाईगर्दीचे) आहे म्हणून सध्या रोजच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी द्रुतगतीवाहन स्वतःजवळ असायलाच हवे. पण अनेक वाहनांतून ' लॅम्ब्रेटा 'चीच निवड कां करावयाची ? तर मध्यमवर्गीयाला तिच्यामुळे ' रेप्युटेशन ' मिळते म्हणून. (खरे तर तीच त्याला परवडू शकते म्हणून). प्रथम प्रेमविवाहाची स्वप्नं पहायची पण नंतर वडीलधाऱ्यांनी पक्कं केलेल्या स्थळाचा सहर्ष स्वीकार करावयाचा तशीच कथा त्याच्या ' लॅम्ब्रेटा ' निवडीची. ' स्कूटर ' या लेखात, ' उत्तमगती ', ' गिअर्स बदलणे ', ' क्लच वायर ', ' प्लग साफ करणे ', ' साईड देणे ', ' रिव्हर्समध्ये जाणे ', ' स्टेपनी ', ' किक् ', ' कर्मगती ', ' अगतिक ' इत्यादी शाब्दिक कोटयांमुळे लेख खुसखुशीत व बहारदार झाला आहे. ' थांबा, शाळा समोर आहे ' व ' सायलेन्स झोन ' या रस्त्यातील लेखी आदेशांचे वाचन करून लेखक चक्क स्कूटर थांबवून व बंद करूनच शब्दशः पालन करतो, ते मौजेचे वाटते.

' टेलिफोन ' लेखात टेलिफोनमुळे दूरची माणसे जवळ येण्यापेक्षा जवळचीच माणसे कशी दूर होतात, शेजारधर्म पाळावा म्हणून त्यांना पैसे न घेता ट्रंककॉल साठी फोन वापरू देणे, त्यांचे निरोप पोहचविणे इत्यादी अनुभव येतात. फोनच्या अति हव्यासापायी घरचीच माणसे बाहेरून परस्परांशी घरी फोनवरच बोलतात. मुलगा फोनवरच कॉलेजचं इलेक्शनचं कॅन्व्हासिंग करतो. मुलगी फोनवरच मैत्रिणींशी गणिताच्या डिफिकल्टीज सोडवते. मैत्रिणींकडून फोनवरच सिनेमा / ट्रिपसाठी आईवडिलांची ' हमखास परवानगी ' शिताफीनं मिळवून घेते. सौ. फोनवर मैत्रिणींशी पाककृतीबद्दल बोलून घेते. लेखकाच्या वाट्याला फोन फारसा येतच नाही. टेलिफोन डायरेक्टरी म्हणजे विनोदाचे मोहोळच. ती कधीच अद्ययावत् नसते. शिवाय अपौरुषेय असते. शिवाय नको ती बातमी नेमकी देणे व हवी त्यावेळी मात्र मौन धरणे हाही टेलिफोनचाच प्रताप.

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'आमचा (पण) नाट्यप्रयोग' व 'आमचे महाविद्यालयीन नाटकाचे अनुभव' हे लेख म्हणजे कॉलेजात स्नेहसंमेलनप्रसंगी नाट्यप्रयोग उभा करताना काय काय मजेशीर अनुभव येतात याची मोजदादच आहे. प्राध्यापकांसाठी नाटक कसे हवे? तर ते छचोर नको, विनोदी नको, गंभीर नको, नुसतीच कॉमेडी, नुसतीच ट्रॅजिडी नको, त्यात काही तरी भव्यदिव्य तेजस्वी अनुभव हवा. त्यात भरतमुनीच्या नाट्यशास्त्रातील तत्त्वे असावीत. अशा 'नेतिनेति'च्या दृष्टीने मराठीतील कोणतेच नाटक प्राध्यापक संघटनेच्या कसोटीस उतरत नाही. परिणामी, 'हॅम्लेट' किंवा 'चेअर्स' हे विदेशी नाटक निवडण्याची वेळ येते. बरे, विद्यार्थ्यांसाठी नाटक निवडायचे म्हणजे ते विनोदी व खेळकरच असायला हवे. (नाहीतर ते उधळले जाण्याचा संभवच अधिक!) स्त्रीपात्रांसाठी कॉलेजात मुली मिळण्याची मारामार. म्हणून मुलींचे मन वळविण्यासाठी करावी लागणारी खटपट तसेच एकवीस मुले एकदमच 'हीरो'ची भूमिका करायला तयार. त्यातून एकाची निवड करणे म्हणजे युक्तीनेच करावी लागते. विशेष म्हणजे जास्तीत जास्त मुलांना सामावून घेण्यासाठी नाटक 'अकोमोडेटिव्ह' ठेवावे लागते. ते उधळले जाऊ नये म्हणून मुद्धा बऱ्याच 'क्लृप्त्या' योजाव्या लागतात. या साऱ्यांची मिस्कील नोंद लेखक घेतो.

'एक 'पाण'चट लेख' या लेखात शाब्दिक विनोद व कोटयांची अतिशय रेलचेल असल्यामुळे लेखाची उभारणी ओढूनताणून झाल्यासारखी वाटते.

टेलिव्हिजन घरात आला आणि घराला थिएटरचेच स्वरूप प्राप्त झाले. टी. व्ही. वरील कार्यक्रम पहायला शेजाऱ्यांची होणारी गर्दी व त्यांचे खाणेपिणे हे सांभाळावे लागतात. पुढे शेजाऱ्यांच्या घरी टी. व्ही. आला तरी घरच्याच मंडळीची 'विविध' कार्यक्रमांची आवड इतकी प्रबल की तिच्यापायी टी. व्ही. सतत चालू ठेवल्याशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे साखरपुड्यासारखे (क्षुल्लक) कार्यक्रम सोयीस्कर पुढे ढकलावे लागतात. भरीस भर म्हणजे टी. व्ही. वरील एकूण एक जाहिराती साऱ्यांना मुखोद्गत म्हणजे कोरसाने म्हणण्याजोगत्या...निवेदिकेची केश/वेषभूषा तिच्या खाजगी बाबी यावर घरात चर्चा होऊ लागते. 'टेलिव्हिजन' या लेखात अखेर लेखकाला स्वतःला मात्र कोपऱ्यात बसूनच घरात घडणाऱ्या या साऱ्या बाबी (मुकाटयानं) पहाव्या लागतात.

'मी प्रसिद्धी मिळवतो' या लेखात प्रसिद्धी व जाहिरात करणे यामुळे आज समाजात 'प्रतिष्ठा' मिळते म्हणून झटपट प्रसिद्धी मिळवण्याचे उपाय लेखक सांगतो. ते म्हणजे 'आपुली आपण स्तुती करी तो एक मूर्ख' किंवा 'आधी केले मग सांगितले' अशा तऱ्हेच्या जुनाट तत्त्वज्ञानाचा त्याग करणे. जास्तीत जास्त सभांना हजर राहणे (शोकयात्रेला सुद्धा!) विषयाची तमा न बाळगता वक्ता म्हणून सभेत भाषण करणे. सामाजिक संस्थांमध्ये घुसून विरोधमूल्य प्राप्त करीत राहणे. साहित्य संघातील कार्यक्रमांमध्ये आभार प्रदर्शनाचे(च) काम घेणे. विदेशी कल्पनांचा आधार घेऊन त्यांवर स्वतःचे नाटक लिहिणे वगैरे. थोडक्यात 'येनकेन प्रकारेण प्रसिद्ध पुरुषो भवेत्'. आपण गुणवान् नाही आणि खरे गुणी लोक तर समूहात कुठेतरी (उपेक्षित) बसलेले आहेत ही खंत लेखकाला कुठेतरी अंतःकरणात टोचणी देते. पण ती क्षणभरच! कारण प्रसिद्धीच्या मोहस्रोताची लाट सतत टिकवून धरावी असेच लेखकाला वाटत राहते.

'स्टाफ रूम' मात्र लेख नसून विनोदी लघु एकांकिका आहे. तीत नवकवी प्रा. कुळकर्णी, प्रेक्षकांसाठी नव्हे तर फक्त लेखकांसाठी नाटक लिहिणारा प्रा. देशपांडे, जे. कृष्णमूर्तींचा परम भक्त प्रा. नहातकर, क्रांतिकारक प्रयोग करणारा प्रा. शेणोलीकर नाटककार, प्रा. कु. दमयंती चिखणीकर ही नवखी प्राध्यापिका, नवकला व नवजीवन यांतील अन्वयार्थ भाष्याने लावणारा नवा भाष्यकार, चपराशी नारायण (हा मोहिनी अंक वाचत राहतो), इत्यादी मासलेवाईक पात्रे आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेळेवर क्लासला जाऊन पिरेड न घेणे, जे शिकवायचे त्याची तयारी न करणे पण पगाराकडे मात्र नेमके लक्ष ठेवणे इत्यादी प्राध्यापकांच्या स्टाफरूममधील 'प्रवृत्ती'वर लेखकाने व्यंगात्मक निर्देश केला आहे.

सात लेख व एक एकांकिका असे हे 'पाणीपुरी'तील विनोदी लेखन आहे. निखळ, निरामय विनोदनिर्मिती करण्याच्या हेतूने हे लेखन घडलेले असल्यामुळे ते नितांत रंजक झालेले आहे. 'स्कूटर', 'टेलिव्हिजन', 'टेलिफोन' हे विनोदी लेख त्यातील सहजतेमुळे जो खुसखुशीतपणा त्यात आलेला आहे त्यामुळे वाचकांच्या लक्षात राहतील असेच आहेत. पुस्तकाची छपाई उत्कृष्ठ असून मुखपृष्ठ आकर्षक व समर्पक आहे. ■

पाणीपुरी—लेखक : शरद कोलारकर
विजय प्रकाशन, नागपूर
पृ ६८, मूल्य २५ रुपये

साभार पोच

मुल्ला नसरुद्दीनच्या गोष्टी / सत्यजीत राय / अनुवाद-विलास गिते, साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. १५/– [पृ ६६]

औटघटकेचे राज्य / ज्ञानदा नाईक / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. २०/– [पृ. ८३]

सामर्थ्य कुणाचे गर्व कुणाला / ज्ञानदा नाईक / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. २०/– [पृ. ७८]

फकिराच्या अभंगांचे पारायण / संपा. लिला शिंदे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४५/– [पृ. १२७]

फळबाग लागवडीचे तंत्र आणि मंत्र / बागवान / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४०/– [पृ. ११०]

वनशेती / बी. पी. वांगीकर / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४०/– [पृ. १२४]

कलासलेण्यातील कारस्थान / सत्यजीत राय / अनु. विलास गिते / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४०/– [पृ. १०४]

जीवविज्ञान व कृषी तंत्रज्ञान / आ. दि. कर्वे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ५०/– [पृ. १४५]

विज्ञान कथा / रेखा वैजल / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ५०/– [पृ. ११४]

यशवंतराव चव्हाण / ना. धो. महानोर / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४०/– [पृ. ९७]

या मुलांनो या / लिला शिंदे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ५/– [पृ. २४]

न्यूटन विरुद्ध विश्वामित्र / सूर्यकांत सराफ / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. १२/– [पृ. ५६]

चंचल झाड चांदीचे / सूर्यकांत सराफ / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. १५/– [पृ. ७२]

जेसलमेर कुठाय आणि इतर कथा / डॉ. आ. दि. कर्वे / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ४५/– [पृ. ११२]

रक्कासा / काका विधाते / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ८०/– [पृ. २५१]

म. विठ्ठल रामजी शिंदे आणि ब्रह्मसमाज / रा. कृ. बाबर / साकेत प्रकाशन, औरंगाबाद / रु. ६५/– [पृ. १४५]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वृक्षसंपदा / डॉ. वी. पी. वागीकर / साकेत प्रकाशन, औरंगावाद / रु. ७० /– [पृ. १६४]

शेतीसाठी पाणी / ना. धों. महानोर / साकेत प्रकाशन, औरंगावाद / रु. ६० /– [पृ. १३३]

दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन / डॉ. प्रकाश देशपांडे /साकेत प्रकाशन, औरंगावाद / रु. ४० /–[पृ.१००]

पांढऱ्या हत्तीची गोष्ट / बाबा भांड / साकेत प्रकाशन, औरंगावाद / रु. ३० /– [पृ. ५२]

महात्मा फुले आणि धर्म / प्रा. आ. ह. साळुंके / लोकवाङ्मय गृह, मुंबई / रु. ३०/– [पृ. ६९]

गुढी / द. सा. बोरकर / वंदन प्रकाशन, अमरावती / रु. २० /– [पृ. ६४]

संतांनी वाळीत टाकलेला संत चक्रधर / प्रभाकर वैद्य / लोकवाङ्मयगृह, मुंबई / रु. ३० /–[पृ. ६९]

स्त्रीस्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तन / विनया खडपेकर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. १२५ /– [पृ. २४२]

गोष्टी आंबेडकरांच्या / वसंत मून / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. २५ /– [पृ. ६०]

वज्रसूची / रूपा कुळकर्णी / लोकवाङ्यगृह, मुंबई / रु. ३० /– [पृ. ६१]

पुनःश्च रामायण / वनश्री विद्यारण्य तुळजापूरकर / श्रीविद्या प्रकाशन, पुणे / रु. १०० /– [पृ. २५७]

चिरंजीव सौभग्यकांक्षिणी / विजय तेंडूलकर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. ५० /– [पृ. ९५]

कथा एका वकुळाची / निर्मला देशपांडे / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. १२५– [पृ. ३००]

स्त्री अस्मितेचा आविष्कार भाग ३ रा / ताराबाई शिंदे–जनाक्का शिंदे / मृणालिनी जोगळेकर / पॉप्युलर प्रकाशन, मुंबई / रु. ७५ /– [पृ. १३०]

जान्हवी / वा. रा. जहागीरदार / मंदार प्रकाशन, सोनपेठ जि. परभणी / रु. ३० /– [पृ. ७६]

ऋतू शहरामधले / अरुण म्हात्रे / अक्षर चळवळ प्रकाशन, मुंबई / रु. २६/– [पृ. ६४]

तीन रंगांचे इंद्रधनुष्य / गोविंद कुळकर्णी / स्वयंप्रभा प्रकाशन, नांदेड / रु. ६० /– [पृ. ७२]

उन्हातलं झाड / भगवान भोईर / स्वप्नील प्रकाशन, भिवंडी / रु. २५/– [पृ. ४५]

प्रेमनगर / सुभाष कड / रामराव कड, पिंपळगाव / रु. १० /– [पृ. ४८]

अक्षरवेध / डॉ. जुल्फी शेख / जुल्फी प्रकाशन, नागपूर / रु. २५ /– [पृ. ५६]

विचार / शेखर / मध्यमा प्रकाशन, नागपूर / रु. ३५/– [पृ. ७२]

आठव ज्ञानदेवांच्या ज्ञानदेवीचा / डॉ. यू. म. पठाण / मधूराज पब्लिकेशन्स, पुणे /रु. ५०/–[पृ. ९२]

एडस् : समज गैरसमज / चित्रा वेडेकर / लोकवाङ्मयगृह, मुंबई / रु. ५० /– [पृ. ९४]

दिल्ली ते मास्को / दंगल झाल्टे / दंव बिंदू प्रकाशन, नासिक / रु. ३२/–[पृ. १०२]

फुलांचे गाव / विलास मोहिते / इंद्रजीत प्रकाशन, कराड / रु. ५०/– [पृ. ११२]

प्रिय आईस / वसंत कानेटकर / पॉप्युलर प्रकाशन; मुंबई / रु. ५० /– [पृ. ६२]

विश्वात्मयोगी / प्रा. ब. ल. सोनार / गायत्री परिवार ट्रस्ट, अमळनेर / रु. ४०/– [पृ. २००]

जयवंत दळवींच्या कथांचा कानडी अनुवाद/रत्नाकर शेट्टी/कन्नड साहित्य संगम, मुंबई/रु. ३०/–[पृ. १३५]

नाल नसलेल्या घोड्यांचा मालक / महावीर जोंधळे / अनुपम प्रकाशन केंद्र, औरंगाबाद / रु. ३५/– [पृ. १००]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संमेलन विशेष

विदर्भ साहित्य संघाचे जनसाहित्य संमेलन

एका महत्वपूर्ण चळवळीची यथायोग्य दखल

विदर्भ साहित्य संघाने नागपूरला रविवार दिनांक १९ एप्रिल रोजी धनवटे मंदिरात एका एक दिवसीय जनसाहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. भाऊ लोखंडे यांनी भूषविले होते. तर जनसाहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक व जनसाहित्य चळवळीचे प्रवर्तक प्रा. या. वा. वडस्कर होते. आणि या संमेलनाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, डॉ. द. भि. कुळकर्णी यांच्या हस्ते झाले होते.

जनसाहित्याची स्पष्ट परिभाषा काय आहे? त्याचे कार्यक्षेत्र किती प्रमाणात व्यापल्या गेले आहे? तसेच इतर साहित्य प्रकारापासून त्याचे वेगळेपण? आजच्या स्थितीमध्ये त्याची निकड यावर सखोल परिचर्चा या विदर्भ साहित्य संघाच्या पहिल्याच जनसाहित्य संमेलनांच्या आयोजनामुळे घडून आली.

या संमेलनातील तीन परिसंवाद हे या संमेलनाचे मुख्य वैशिष्टच. यातील पहिला परिसंवाद होता जनसाहित्याच्या संदर्भात लेखकाची असलेली भूमिका. दुसरा परिसंवाद 'जन साहित्याचे विविध आयाम' आणि तिसरा परिसंवाद 'साहित्यातून चळवळीकडे' या परिसंवादाचे अध्यक्षपद डॉ. विमल भालेराव, डॉ. भा. ल. भोळे आणि प्रा. जेमिनी कडू यांच्याकडे होते.

या संमेलनाच्या विविध कार्यक्रमांत एक आगळावेगळा आणि उत्साहपूर्ण कार्यक्रम म्हणजे लेखक–वाचकांच्या भेटीगाठी या कार्यक्रमामुळे संमेलनाला आगळीच शोभा प्राप्त झाली होती. आणि वाचकांच्या मनातील असंख्य प्रश्नांची लेखकांनी उत्तरे देऊन समाधान केले.

विदर्भाचे ख्यातकीर्त लेखक' धग'कार कै. उद्धव शेळके यांच्या स्मृतीस समर्पित या संमेलनातील कविसंमेलनासोबत अकोल्याचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. गो. रा. वैराळे आणि सुप्रसिद्ध कवी श्री. तुळशीराम काजे यांच्या कार्याच्या सत्काराचे देखील आयोजन केले होते. याशिवाय जनसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. या. वा. वडस्कर, यांच्या एका ग्रामीण कथेवर आधारित 'सोताचे घर' ही सादर केलेली एकांकिका 'मेड इन इंडिया' या श्री. पुरुषोत्तम बोरकर यांच्या कादंबरी वरचा एकपात्री प्रयोग श्री. दिलीप देशपांडेनी उत्कृष्टपणे सादर करून संमेलन यशस्वी करण्यास मदत केली.

विदर्भ साहित्य संघाच्या शिवाजी संदर्भ ग्रंथालयाने एक वैशिष्ठ्यपूर्ण ग्रंथ प्रदर्शनही लावले होते. श्री. चंद्रकांत कुळकर्णी, सौ. कुंदा केळापुरे आणि शुभांगी संत यांनी हे प्रदर्शन आयोजित केले होते. त्यात लक्षवेधी ग्रंथ व पुरस्कारप्राप्त ग्रंथ हे प्रदर्शनाचे दोन विभाग लक्ष वेधून घेत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होते. सदर ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन संमेलनाध्यक्षांच्या हस्ते झाले.

अध्यक्षीय भाषण

जनसाहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. या. वा. वडस्कर यांनी आपल्या भाषणात महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून धग कार कै. उद्धव शेळके यांना श्रद्धांजली अर्पण केली. जनसाहित्याची संज्ञा स्पष्ट करताना ते म्हणाले की– 'जनसाहित्य या संज्ञेचा जन्म अलिकडचा म्हणजे वीसबावीस वर्षापूर्वीचा, एकोणवीसशे सत्तरच्या आसपासचा. या कालखंडात विदर्भाच्या अनेक भागात लहान मोठे जनसाहित्य मेळावे आणि जनसाहित्य संमेलन इत्यादींचे आयोजन झाले.– 'जनसाहित्य म्हणजे जननिष्ठ जाणिवेतून घेतलेला जीवनाचा वेध. या विधानात जननिष्ठ शब्दाला कळीचे महत्त्व आहे. वरवर पाहता उपेक्षितांसंबंधीचे, वंचित शोषित–अन्यायग्रस्त समाजघटकांना मध्यवर्ती स्थान देऊन या घटकांमधील लेखक–कवींनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे जनसाहित्य होय. असा आपला समज सहजच होऊ शकतो. यापेक्षा जरा अधिक जागरूकपणे विचार करणारे लोक एक पाऊल आणखी पुढे जातील. ते म्हणतील हे चित्रण जननिष्ठ जाणिवेतून झालेले असणे–म्हणजे शोषित वंचित बहुजनांच्या योगदानाचे उदात्तीकरण करणारे, त्यांना न्यायच नव्हे तर नायकत्व देणारे असेल तरच ते जनसाहित्य होईल. अन्यथा ग्रामीण साहित्य निर्मितीच्या नावाखाली ग्रामीण समाजाचा उपहास करणारे किंवा दलितांच्या जीवनाचे विकृत चित्रण करणारे लेखनही जनसाहित्यच म्हणावे लागेल. असे त्यांनी स्पष्ट केले.

'जननिष्ठ' संज्ञेसंबंधी अधिक सखोल विचार मांडताना ते म्हणाले– 'जननिष्ठ जाणीव म्हणजे मानवनिष्ठ जाणीव किंवहुना, मानवाच्या सारभूत मानवीयतेचे सुयोग्य भान बाळगणारी जाणीव. असे सांगून त्यांनी आपल्या भाषणाची सांगता साहित्याविषयी बोलताना त्यांनी पुढील उद्गार काढून केली. 'साकल्याने विचार करता आमचे साहित्य समग्रतेचे, सखोलतेचे, अर्थपूर्णतेचे दर्शन घडवणारे असेल, ते मग केवळ जनसाहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य, कामगार साहित्य किंवा पुरोगामी साहित्य राहणार नाही. ते श्रेष्ठ साहित्य असेल. तेच विश्वसाहित्यही असेल"–

परिसंवाद : जनसाहित्य : माझी भूमिका

जनसाहित्य संमेलनाचे उद्घाटन झाल्यानंतर लगेच 'जनसाहित्य : माझी भूमिका या विषयावर परिसंवाद झाला. अकोल्याच्या डॉ. विमल भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्री. रवीन्द्र शोभणे यांच्या संचलनाने झालेल्या या परिसंवादात भाग घेणारे वक्ते होते. श्री. नाना ढाकुलकर, डॉ. सुभाष खंडारे, प्रा. प्रमोद मुनघाटे इत्यादी. जनसाहित्यातल्या आपल्या भूमिकेविषयी मत मांडताना श्री. नाना ढाकुलकर यांनी प्रस्थापित साहित्य आणि दलित साहित्य या दोन टोकाच्या साहित्या मधल्या दुव्यामधून जनसाहित्य निर्माण झाले असावे.' असे मत मांडले. श्री. ढाकुलकर पुढे म्हणाले, 'वास्तवतः साहित्य लेखन करताना आपण कुठल्याच साहित्य प्रांतात नव्हतो, केवळ साहित्यच जगत होतो.'– पुढे त्यांनी जनसाहित्याची व्याख्या अशी केली– 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, यांच्या विचारांशी समन्वय साधणारे सर्वसमावेशक साहित्य म्हणजे जनसाहित्य होय'.

डॉ. सुभाष खंडारे यांनी आपले मत मांडताना वाचक–लेखकाप्रमाणे संपादक व प्रकाशकांनी देखील जनसाहित्याच्या चळवळीस आधारभूत व्हावे असेही सांगून जनसाहित्य ही वेगळी चूल मांडणारे साहित्य नसून वाङ्मय प्रकाराच्या विविध प्रवाहासारखा एक उपघटक होय असे ते' म्हणाले. तर प्रा. मुनघाटे यांनी जनसाहित्याविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की साहित्य समाजाचा आरसा नसून ते एक वाहणाऱ्या पाण्यासारखे प्रवाही साधन आहे. म्हणूनच त्यातून नित्य आणि नूतनतेचे दर्शन होते.

या परिसंवादाच्या अध्यक्षा डॉ. विमल भालेराव यांनी जनसाहित्य या शब्दाची फोड करून त्याची तात्त्विक परिभाषा करण्याचा प्रयत्न केला. जनसाहित्य हे गणसाहित्य असावे असा 'जन'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या शब्दाशी 'गण' या मूळ शब्दांचा संबंध जोडला आणि उत्पादक व उपभोक्ता यांच्या परस्पर संबंधाला जोडणारे, माणूसपणाला घेऊन चालणारे साहित्य म्हणजे जनसाहित्य होय, असे मत मांडले. जनसाहित्य हे सर्वस्पर्शी असून मार्क्स, दलित व ग्रामीण साहित्याच्या उणिवा पूर्ण करणारे ठरते, असेही आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. भालेराव यांनी सांगितले.

एकांकिका : सोताचं घर

पहिल्या परिसंवादानंतर विदर्भ साहित्य संघाच्या नाट्यसमितीतर्फे 'सोताचे घर' ही एकांकिका सादर झाली. संमेलनाध्यक्ष श्री. था. वा. वडस्कर यांच्या युगवाणीत प्रकाशित याच शीर्षकांच्या एका कथेवर ती आधारलेली होती. नाट्यरूपांतर श्री. अरविंद पाठक यांनी केले तर दिग्दर्शन श्री. मुकूल खोत यांनी ! सुमारे अर्धा तास रंगलेल्या एकांकिकेला श्रोत्यांनी दाद दिली.

परिचर्चा

जनसाहित्याचे दुसरे सत्र अर्ध्या तासाच्या मध्यांतरानंतर सुरू झाले. 'जनसाहित्य : विविध आयाम' या विषयावरील परिचर्चा. अध्यक्ष होते डॉ. भा. ल. भोळे, सहभाग होता प्रा. प्रदीप आगलावे, प्रा. माधवी जुमडे; श्री. बाबा मोहोड, प्रा. मधुमती वानखेडे; शैल जेमिनी इत्यादीं वक्त्यांचा.

प्रा. प्रदीप आगलावे यांनी मार्क्सवादी दलित साहित्याप्रमाणे जनसाहित्यात सुद्धा व्यापकता गवसते, त्याला कुठल्याही एका विशिष्ट परिभाषेत बसविणे कठीण आहे. मात्र जनसाहित्याविषयीच्या संकल्पना स्पष्ट होण्याची आज गरज आहे असे आपले मत अत्यंत आवेशपूर्ण रीतीने व्यक्त केले, तर प्रा. माधवी जुमडे यांनी आपल्या निबंधवाचनातून जनसाहित्याची उपयोगिता प्रा. वडस्कर आणि शरद्चंद्र मुक्तिबोध यांच्या साहित्याच्या आधाराने स्पष्ट केली. श्री. बाबा मोहोड यांनी परिचर्चेत भाग घेताना जनउन्नतीसाठी उदात्त विचार देणारे कुठल्याही विशिष्ट जातीधर्माशी चिकटवून न राहणारे साहित्य हे आज आवश्यक असून, ती गरज जनसाहित्य भागवू शकेल, असे मत मांडले.

जनसाहित्याची चळवळ गेल्या दशकभराची

'जनसाहित्य : विविध आयाम' या परिचर्चेतील जनसाहित्यातील स्त्री–चित्रण या उपविषयावर आपले वक्तव्य करताना प्रा. मधुमती वानखडे म्हणाल्या की, जनसाहित्याची खरी चळवळ ही गेल्या दशकापासून सुरू झाली, मार्क्सवादी आणि दलित साहित्यासून प्रेरणा घेऊन ही चळवळ उभी झाली–असून त्याआधीच्या बहिणाबाई चौधरी, कै. उद्धव शेळके यांच्या साहित्यातील स्त्री–चित्रण जनसाहित्याची भूमिका स्पष्ट करणारे आहे. असे सांगून 'धग'कार उद्धव शेळके यांच्या 'माय' या स्त्री चित्रणाचा त्यांनी उल्लेख केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पंजाबराव देशमुख आणि मार्क्स यांची त्याला प्रेरणा लाभलेली आहे. जनसाहित्यातील स्त्रीने या तिघांना प्रेरणास्थाने मानले तर नक्कीच तिची प्रतिमा उंचावेल असा विश्वास व्यक्त करून जनसाहित्यातल्या स्त्रीत्वाचे चित्रण केले. शैल जेमिनी यांनी आपल्या निबंधवाचनात देशीयता या शब्दाचा अर्थ स्पष्ट करीत जनसाहित्यातून देशीयतेला पूरक असे वातावरण निर्माण होईल अशी आशा व्यक्त केली.

परिचर्चेचा समारोप अध्यक्ष डॉ. भा. ल. भोळे यांनी केला. ते म्हणाले, 'राजकारणाप्रमाणे साहित्यात देखील दूषित वातावरण निर्माण झाले असून साहित्य मूल्याची अवहेलना रोखली पाहिजे. असे सांगून जनसाहित्याविषयी आपली भूमिका त्यांनी थोडक्यात श्रोत्यांसमोर ठेवली. या जन साहित्य संमेलनाचा एक आगळावेगळा कार्यक्रम म्हणजे 'लेखक वाचकांच्या भेटीला' हा होता. यात श्री. नाना ढाकुलकर, पुरुषोत्तम बोरकर, सौ. प्रतिमा इंगोले, डॉ. रवीन्द्र शोभणे, सौ. सुरेखा ठक्कर- (सरोदे) श्री. वसंत वाहोकार, इत्यादी लेखकांना श्रोत्यांनी बोलके केले.

हा कार्यक्रम प्रगट मुलाखतीपेक्षाही अभिनव व दाद देणारा ठरला. यात प्रामुख्याने डॉ रवींद्र शोभणे आणि सौ. सुरेखा ठक्कर–सरोदे यांनी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्रोत्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. लेखकांच्या अनेक गुणदोषांवर श्रोत्यांनी मनसोक्त चर्चा केली, वेळेची मर्यादा लक्षात घेऊन कार्यक्रम आटोपताच घ्यावा लागला. इतका चांगला प्रतिसाद या कार्यक्रमाला मिळाला.

साहित्यातून चळवळीकडे


सत्र पाचवे होते 'जनसाहित्य : साहित्यातून चळवळीकडे' या परिसंवादाचे अध्यक्ष होते. प्रा. जैमिनी कडू आणि सहभाग होता भगवान ठग, हरीश देशमुख, छाया नाईक यांचा. प्रत्येक वक्त्याने जनसाहित्यातील चळवळीकडे श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतले आणि शेवटी अध्यक्षीय भाषणात प्रा. जेमिनी कडू यांनी जनसाहित्य हे साहित्यातून चळवळीकडे कसे गेले हे पटवून दिले.

कवी संमेलन

जनसाहित्य संमेलनाचे शेवटचे सत्र म्हणजे 'कविसंमेलन'. अध्यक्षा सौ. श्रद्धा पराते, आणि सूत्रसंचालन—बबन सराडकर, कविसंमेलनात सहभागी होणारे कवी आणि कवयित्री होते ललित सोनोने, कृष्णा चौधरी, सुखदेव ढाणके, शंकर विटणकर, मृणाल चिचाळकर, वसुधा घुरडे, रेवती करमरकर, मेघना वाहोकार, भगवान ठग, सुरेश गांजरे, ज्ञानेश वाकुडकर, हिरामण लांजे, डॉ. विवेक पाखमोडे, सदानंद देशमुख, रत्नाकर भेलकर, अर्चना प्र. काळे, शालिनी मदनपुरी, विजय दळवी, नागेश कांकणे, विष्णु सोळंके, प्रा. मधुमती वानखेडे.

कविसंमेलनात अनेक उत्साही कवींनी भाग घेतला होता. मंचावर यांची उपस्थिती तशी जाणवतही होती. किरकोळ रसिकांच्या उपस्थितीत कविसंमेलन पार पडले. ■

— प्रा. मधुमती वानखेडे



अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य सूची

जानेवारी १९९० ते डिसेंबर १९९१

संकलक : केशव जोशी

लेख / संशोधन / प्रबंध

अयाचित डॉ. स. मो.	स्मरण-संतवाङ्मययोपासक ह. भ. प. पांगारकराचे	पृ. ५३ / सप्टें-ऑक्टो-नोव्हे. १९९१
आडे आनंद	गझलचे छंदशास्त्र-एक अभ्यास (अभ्ययन) लेख १ ला	पृ. २८ / जा.फे.मा. १९९०
	लेख २ रा	पृ. २१ / ए.मे.जू. १९९०
	लेख ३ रा	पृ. ५१ / जुलै ९०-जुलै १९९१
कुळकर्णी डॉ. सु. बा.	ज्ञानेश्वरीतील शृंगारविश्व	पृ. ५९ / जुलै ९०-जुलै १९९१
	मराठी अभिलेखातील सांकेतिक अंक-लेखन व ज्ञानदेवांचा काळ (संशोधन)	पृ. ७४ / स. ऑ-नो. १९९१
कोलते डॉ. वि. भि.	म. म. दत्तो वामन पोतदार	पृ. ६ / जुलै ९०-जुलै १९९१
चितळे श्रीपाद केशव	दोन शिलाक्षरपट्ट (संशोधन)	पृ. ५३ / ऑगस्ट-सप्टेंबर १९९१
	विदर्भातील कृत्रिम व नैसर्गिक शैलाश्रय-संशोधन	पृ. ६८ / स. ऑ-नो. १९९१
	अडम-विदर्भातील मोहोंजोदडो-हडप्पा (संशोधन)	पृ. १३ / डिसेंबर १९९१
चिचाळकर वसंत	अनुभव एका कवितेचा	पृ. ४० / डिसेंबर १९९१
जहागिरदार डॉ. चंद्रशेखर	सर्जनशील साहित्याचा अनुवाद	पृ. २९ / डिसेंबर १९९१
जामकर मधु	मेंदी-(इंदिरा संतांचा काव्यकाल)-काही विचार	पृ. ३३ / जुलै ९०-जुलै १९९१
जोशी श्रीपाद भालचंद्र	भाऊ समर्थ : कलंदर चित्रव्रती	पृ. १०६ / जुलै ९०-जुलै १९९१
डोळके राजेंद्र	दलित कविता : एक स्वगत	पृ. १२ / ए. मे. जून १९९०
देशपांडे डॉ. गोविंद	युगवाणीचे आद्य संपादक कै. वा. ना. देशपांडे	पृ. ७५ / जुलै ९०-जुलै १९९१
धर्माधिकारी सौ. तारा	गीता साने : चिंतनशील, व्रतस्थ वंडखोर 'यती'	पृ. ६ / स. ऑ-नो. १९९१
नाईकवाडे डॉ. जगन्नाथ	डॉ. अ. ना. देशपांडे : बहुआयामी गुरुवर्य	पृ. ९ / ऑगस्ट-सप्टेंबर १९९१
पाटील प्रा. वसंत	धुळपाटी : एक भाषिक अभ्यास (अभ्ययन)	पृ. ४६ / जा.फे.मा. १९९०
पाटील डॉ. सुशिला	मराठी वाङ्मयेतिहास : स्वरूप आणि अपेक्षा	पृ. ४२ / ऑगस्ट-सप्टेंबर १९९१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टिपणे

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कथा

कविता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुस्तक / परीक्षण / परिचय

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

हेर्लेकर सुलभा	पूजा (आशा वर्ग)	पृ. ११६/जुलै ९०–जुलै ९१

मुलाखत

कुळकर्णी डॉ. मदन	बळवंत कांबळे : देवदासी मुक्ती चळवळीतील कार्यकर्ता	पृ. ५८/सप्टें. टॉक्टो. नोव्हें. १९९१

चर्चा

डॉ. योगेंद्र मेश्राम यांचे पुस्तक : 'माझं गाव कुठाय ?' यावर डॉ. मेश्राम यांचेशी प्रा. लिहितकर थांनी केलेली चर्चा पृ. ६४/ए. मे जून १९९०

परिषदा / संमेलन

कऱ्हाडे शंकर	वि. सा. संघ जिल्हा अधिवेशन बुलढाणा	पृ. ९०/ए. मे जून १९९०
जोशी सुधाकर	कै. वा. ना. देशपांडे स्मृती वाङ्मयीन नियतकालिक विकास परिषद	पृ. ५९/जुलै ९०–जुलै ९१
प्रतिनिधी	वैदर्भीय लेखिका संमेलन विदर्भ साहित्य संघ, नागपूर	१९९१–डिसें १९९१
पाटील डॉ. सुशिला	मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन (वृत्तांत)	पृ. ५४/जा. फे. मा. १९९०
बोरकर द. सा.	वि. सा. संघाचे दलित साहित्य संमेलन	पृ. ५१/डिसेंबर १९९१
स्वान प्रा. शा. वा.	वि. सा. संघाचे ४१ वे विदर्भ साहित्य संमेलन, चंद्रपूर	पृ. ८९/ए. मे जून १९९०

सूची

जोशी केशव	युगवाणी साहित्य सूची जाने. १९८८ ते डिसें. १९८९	पृ. १३४/जुलै ९०–जुलै ९१

■ ■ ■

अनुवादकांकरिता–

वाङ्मय अनुवाद म्हणजे खरे तर संस्कृतींचेच भाषांतर

युगवाणीतून विभिन्न संस्कृतींची ओळख अनुवादित वाङ्मयातून होणे युगवाणीस हवे आहे.

विभिन्न भाषेतील महत्त्वाच्या लेखनाचे अनुवाद मूळ लेखकाच्या परवानगी सहित पाठवावेत. अनुवादकविषयक लिखाणही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वा | च | की | य

स. न. वि. वि.

'युगवाणी'च्या संपादनासंबंधी, त्यात प्रकाशित होणाऱ्या लेखनासंबंधी आपण प्रतिक्रिया मागवून त्यातील निवडक प्रतिक्रिया 'युगवाणींतून प्रसिद्ध करता हा आपला पायंडा निश्चितच स्तुत्य आहे. अशाने सत्याप्रती जाण्यास अधिक मदत होते, हे निश्चित. अशीच एक प्रतिक्रिया डॉ. ज्योती लांजेवार यांनी माझ्या ए-मे-जू-९१ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या दलित कवितेच्या लेखावर व्यक्त केली असून डिसें. ९१ च्या अंकात ती प्रसिद्ध झाली आहे. मीही आपल्याला पाठविलेले पत्र त्याच अंकात प्रसिद्ध झाले आहे. मात्र माझे पत्र मी आपल्याला डॉ. लांजेवार यांची प्रतिक्रिया न वाचता पाठविलेले असल्याने त्यांची प्रतिक्रिया वाचल्यानंतर त्याला उत्तर म्हणून प्रस्तुत पत्र लिहित आहे.

डॉ. लांजेवार यांचे म्हणणे असे की डॉ. भालचंद्र फडके यांच्या 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह' या पुस्तकातील लेखात आणि माझ्या लेखात फारसा फरक नसून त्यांनी दिलेली उदाहरणेच मी उद्धृत केली आहेत. आपले पत्र मिळाल्यानंतर मी डॉ. फडक्यांचे पुस्तक व माझा लेख तौलनिक-दृष्टया अभ्यासला. त्यावरून माझ्या असे लक्षात आले की दलित कवितेचे स्वरूप स्पष्ट करण्या-करिता मी एकूण २३ उदाहरणे दिली आहेत. यातील ४-५ च उदाहरणे फडक्यांच्या पुस्तकातील आहेत. २३ पैकी ४ उदाहरणे म्हणजे 'फडक्यांनी दिलेली उदाहरणेच' हे लांजेवारांचे म्हणणे बरोबर नाही. दुसरे असे की, फडक्यांनी त्यांच्या दृष्टीने केलेले दलित कवितेचे मूल्यमापन व मी व्यक्त केलेले विचार यात फार फरक आहे. हे तपासून पहाण्याकरिता त्यांनी दोन्ही लेख पुन्हा बारकाईने वाचावेत.

याठिकाणी एका गोष्टीकडे लक्ष वेधणे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. द. भि. कुळकर्णी गौरव ग्रंथात डॉ. लांजेवार यांनी 'दलित साहित्य' हा लेख लिहिला आहे. या लेखात दलित कवितेचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिता त्यांनी एकूण २२ उदाहरणे दिली आहेत. यातील कमीतकमी १२ उदाहरणे डॉ. भालचंद्र फडके यांच्या उपरोक्त पुस्तकातील आहेत.

याच्याही पुढे जाऊन लिहायचे तर डॉ. लांजेवारांच्या याच लेखातील दलित कथेचा आढावा म्हणजे भालचंद्र फडके यांच्या पुस्तकातील दलित कथेवरच्या लेखाचे संक्षिप्त रूप आहे. या लेखात फडक्यांच्या पुस्तकातील लेखात जे कथाकार आहेत तेवढयाच कथाकारांचा विचार लांजेवारांच्या लेखात आहे. बंधुमाधव हा इतका महत्त्वाचा दलित कथालेखक आहे की या लेखकाचा विचार केल्याशिवाय दलित कथालेखनाचा आढावा पूर्ण होऊच शकत नाही. एवढया मोठया प्रसिद्ध कथा-लेखकाचा उल्लेखही त्यात आढळू नये हे आश्चर्य आहे ? फडक्यांच्या लेखातही बंधुमाधवाचा उल्लेख नाही.

डॉ. लांजेवारांचे पुढचे म्हणणे असे आहे की दलित कविता विशिष्ट टप्प्यावर आहे हे मी लक्षात न घेता केवळ पुनर्लेखनाचा प्रपंच केला, मी हे सांगू इच्छितो की मला झालेले दलित कवितेचे एक आकलन मी सादर केले. ते चूक की बरोबर हा मुद्दा निराळा आहे. पण, लांजेवार यांच्या दृष्टीने दलित कविता जर वेगळया टप्प्यावर उभी असेल तर तो टप्पा वाचकांसमोर उभा कर-ण्याची जबाबदारी त्यांची आहे. ती त्यांनी पार पाडावी म्हणजे त्यांचे म्हणणे तपासून पाहता येईल

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एखाद्याच्या लेखातील आशय चूक आहे हे केवळ 'तो चूक आहे' असे म्हणून चालत नाही. तो सिद्ध करावा लागतो.

११-८-१९९२ डॉ. राजेन्द्र डोळके

युगवाणीच्या मार्च-एप्रिल अंक मिळाला. मुखपृष्ठ एकदम आवडले.

डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या कविता चटका लावतात.

—सुरेश मयुरे

२२-९-९२ मयुरे बंगला, गावदेवी मैदान रस्ता, ठाणे, ४२०६२२

'युगवाणी'चा ताजा अंक (मार्च-एप्रिल ९२ चा) मिळाला. आधीचेही वेळोवेळी आपणांकडून आलेले आहेत. त्याबद्दल मी आपला मनापासून आभारी आहे.

येत्या तीन वर्षासाठी संपादक म्हणून आपली पुनर्नियुक्ती झाल्याचे वाचून आनंद झाला. हार्दिक अभिनंदन करतो.

आपली संपादकीय आवाहने आणि विश्लेषणे मनःपूर्वक आणि मार्मिक असतात. लेखही तसेच. 'युगवाणी'सारख्या निष्ठावान् मूल्याभिमुख नियतकालिकांची गेली कित्येक वर्षे चाललेली दुरवस्था महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला एका अंगाने उणेपणा देत आहे. याही स्थितीत 'युगवाणी' 'समुचित', 'अक्षरवैदर्भी', 'नवभारत' या नियतकालिकांना खंबीर, जिद्दीचे संपादन लाभलेले आहे ही वाचकांच्या दृष्टीने मोठ्या आशेची बाजू आहे.

—त्र्यं. वि. सरदेशमुख

२४-९-१९९२ ९७/८, नवी पेठ, सोलापूर ४१३००७

अनियमित परिस्थिती, अध्यक्षांचे बदल, युगवाणी अंकांची वर्षभराची प्रकाशन स्थगिती, अध्यक्षांचे बदल आदि विचारात घेता, श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी हे संपादक म्हणून सुयशस्वी ठरले व त्यांचे कारकिर्दीत युगवाणीचे अंक वाङमयीन दृष्टया भरभराटीस आले आहेत व येत राहातील हे नक्कीच.

—अनंत लिखितकर

२४-९-९२ मातृछाया, शिवाजी पुतळयाजवळ, केळकरवाडी, वर्धा ४४२५०१

कालच 'युगवाणी' चा अंक मिळाला. संपादकीय वाचले. ते मननीय आहेच. आपण आणखी तीन वर्षे संपादक असणार आहात हे वाचून आनंद झाला. आपल्या पुढील तीन वर्षांच्या काळात 'युगवाणी'ची प्रतिष्ठा आणखी वाढो हीच सदिच्छा ! दर्जेदार नियतकालिकांच्या दुष्काळात 'युगवाणी' सारखे अंक दुर्मिळ आहेत.

२४-९-९२ —पंकज कुरलकर

कै. काळाजी दप्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै.ना.रा. शेंडे : एक नोंद

जन्म ७ नोव्हेंबर १९१४, गणेशपूर जि. भंडारा

मृत्यु : १९ सप्टेंबर १९९२

कादंबरीकार, कथा लेखक व कवी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गणेशपूर येथे 'नॉर्मल स्कूल'मधून प्रशिक्षितव्यवसाय:प्रांतरचनेपूर्वीच्या मध्यप्रांत सरकारच्या समाजशिक्षण विभागात 'लेखक' व नंतर महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी विभागात नागपूर माहिती केंद्राचे 'माहिती सहाय्यक'. १९६० साली गणेशपूर येथे 'श्रीशेषाश्रम' ही लोकसेवा संस्था स्थापन केली. सेवानिवृत्तीनंतर येथे कायमचे वास्तव्य विदर्भ साहित्य संघाचे कार्यकर्ते चिटणीस आणि अध्यक्ष. तसेच वि.सा. संघाच्या सावरगाव (डुकरे) येथील वार्षिक संमेलनाचे अध्यक्ष (१९६०).

ह्यांनी लेखनाची सुरुवात लहानपणीच केली. 'सावली' (१९५६), 'डोंगरमाथ्यावरील दिवा' (१९६०), 'प्रतिध्वनी' (१९८०) हे कथासंग्रह आणि 'काजळी रात्र' (१९५६), 'तांबडा दगड' (१९५८), 'विलासिनी' (१९७४), 'अन्शुजा' (१९७४), 'शृंगारलेले प्रेत' (१९८०), ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'लोकसाहित्यसंपदा' (१९६४) हे लोकसाहित्याचे उत्कृष्ट संकलन-संपादन, 'दलितांचे जग वेदना आणि शिष्टाई' (१९६५) हे लेख व भाषणांचे संकलन आणि 'अतींद्रिय विश्वातील मंत्रच्छाया' (१९७४) हे भूतपिशाच्च-योनीसंबंधी विचारांचे संकलन ही पुस्तकेही प्रसिद्ध आहेत.

'काजळी रात्र' आणि 'तांबडा दगड' ह्या कादंबऱ्यांतून दलित व आदिवासी लोकांमध्ये कार्य करताना लेखकाला आलेले अनुभव व त्यांच्या भवितव्याविषयी लेखकाची ध्येयधोरणे साकार झालेली दिसतात. शेंडे यांच्या कादंबऱ्यांची कथानके गुंतागुंतीची, रहस्यमय व चमत्कृतिपूर्ण असतात. त्यांत वास्तवापेक्षा स्वप्रंजन अधिक असते. 'विलासिनी', 'अन्शुजा' व 'शृंगारलेले प्रेत' ह्या कादंबऱ्यांवर अतींद्रिय विश्वाचा प्रभाव जाणवतो.

नारायण गणेशपूरकर या नावाने लिहिलेली त्यांची कविता 'दुर्गादर्शन आणि काही कविता' (१९५६) ह्या संग्रहातून प्रसिद्ध झाली आहे. स्वातंत्र्य समता, भक्ती व अध्यात्मप्रणवता ह्यांचा उद्‌घोष करणारी ही कविता आहे. बहुजनसमाजाविषयीची कळकळ, मानवीय मुल्यांविषयी आस्था आणि आध्यात्मिक वृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष त्यांच्या साहित्यातून दिसून येतात.

— हरिश्चंद्र थोरात


— म. ना. लोही

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातून

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोस्टल रजि. एन.जी.पी. नं. /४११
PRINTED MATTER PERIODICAL



मे-जून ९२ चा युगवाणीचा हा अंक असला तरी प्रत्यक्षात तो ऑक्टोबर-नोव्हेंबर ९२ मध्ये आपल्या हाती पडतो आहे. या अंकाची छपाई सुरू असतांनाच विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष व कार्याध्यक्ष, दलित वेदनेचे संयत चित्रण करणारे ज्येष्ठ लेखक व मानव्याचे केवळ वाङ्मयीनच नव्हे तर प्रत्यक्ष वर्तनाच्या पातळीवरील निष्ठावान उपयोजक, प्रचारक-पुरस्कर्ते श्री.ना.रा. शेंडे यांचे निधन झाल्याची वार्ता आली.

'युगवाणी' व विदर्भ साहित्य संघातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१२

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ